१८५८

म. ग्रं. सं. ठाणें.
विषय प्र-प्रवास
सं. क्र. २५०

# मेरिकेत पहावं जाऊन




REFBK-0010798

अरविंद

सन १९५८



मनोहर ग्रंथमाला प्रकाशन १०१ वें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: प्रवास
क्रमांक ........ नोंः दि:

*
*
*
*

# अमेरिकेस पहावें जाऊन

REFBK-0010798

*
*
*

लेखक : अरविंद गोखले

*
*

*

किंमत ३ रुपये

# प्रकाशकाचे

अरविंद गोखले यांनीं अमेरिकेंतल्या तीनशे ऐंशी दिवसांच्या वास्तव्यावर लिहिलेले ललितलेख ही मराठी वाङ्मयांत मोलाची भर मानावी लागेल. पूर्वसुरींसारखे गोखले यांनीं ठराविक ठशाचे, हौशी प्रवासी म्हणून लेख लिहिले नाहींत. प्रवासचित्रें म्हणजे जुनाट शिल्प अगर नवी इमारत, एखादी संध्याकाळ अगर एखादे संमेलन यांचीं वर्णनें, किंवा तत्ववेत्त्याचा आव अगर प्रवासी टिपणें, असें मानलें नाहीं. त्यांनीं तेथील समाजांत मिसळून त्यांतील माणसांचें जीवनच टिपलें आहे. आणि त्याचबरोबर तेथील आयुष्यांतल्या अनोखी, अद्भुत अंगांचा शोध घेतला आहे.

जुगारी अड्डे, रेड इंडियन्स, विलासगृहें, नीग्रो समाज आणि त्याचबरोबर शेतकऱ्यांचें जीवन, विश्वविद्यालयांतील वातावरण, विवाहपद्धती कुटुंबांतले प्रसंग – हें सारें त्यांनीं समरसून रेखाटलें आहे.

लघुकथा, डायरी, ललितनिबंध, पत्रलेखन, प्रवासचित्रें – अशा अनेक लेखनप्रकारांना स्पर्श करणाऱ्या त्यांच्या लेखांचा हा संग्रह प्रसिद्ध करतांना आम्हाला आनंद होत आहे.

: मुद्रक : * * * * * प्रसिद्धि दिनांक

न. वा. लिमये
महाराष्ट्र मुद्रणालय,
२५२/अ/५, नारायण पेठ,
पुणें २.

# दोन शब्द

सुमारे पंधरा वर्षांपूर्वी पहिला कथासंग्रह प्रकाशित करून अरविंद गोखले यांनीं वाङ्मयाच्या दालनांत प्रवेश केला. ह्या कालावधींत त्यांनीं दोनशेचेवर कथा लिहिल्या व तेरा कथासंग्रह प्रसिद्ध केले. भारतीय भाषांतून त्यांच्या कलाकृतींचीं रूपांतरें झालीं. इंग्रजी भाषांतरांतल्या कथांचें पुस्तक निघालें. आंतरराष्ट्रीय कथा स्पर्धेत पहिलें पारितोषिक मिळवून त्यांनीं मराठी कथेला जागतिक मान्यता मिळवून दिली.

कथालेखनाव्यतिरिक्त अन्य लेखन गोखल्यांनीं फारसें केलें नाहीं. १९५७–५८ सालीं वृत्तपत्रव्यवसायाच्या शिक्षणासाठीं त्यांनीं अमेरिकेचा दौरा केला. तेथल्या अनुभवावर लिहिलेले लेख वाङ्मयशोभा मासिकांतून प्रसिद्ध होऊं लागले. वाचकांना त्या लेखांतला निराळेपणा व जिवंतपणा इतका आवडला कीं दोनतीनच लेख लिहिण्याची कल्पना सोडून वर्ष दीड वर्ष लेखमाला चालू राहिली. रसिकांच्या आग्रहामुळें त्या लेखांचा संग्रह आतां पुस्तकरूपानें प्रसिद्ध होत आहे.

◆◆◆

२७ सप्टेंबर १९५९ * * * * * : प्रकाशक :

मनोहर महादेव केळकर
मनोहर ग्रंथमाला,
१६०९ सदाशिव पेठ,
पुणें २

## अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | अमेरिकेस पहावें जाऊन ... | ६ |
| २ | अटलांटिक ... | ९ |
| ३ | अमेरिकन माणूस, अमेरिकन मोटार ... | १६ |
| ४ | अमेरिकेंतील भारतीय विद्यार्थी ... | २४ |
| ५ | हिमस्तोत्र ... | ३१ |
| ६ | दोन कुटुंबें ... ... | ३८ |
| ७ | डेटिंग ... ... | ४६ |
| ८ | घरकुल आणि घटस्फोट ... | ५३ |
| ९ | हिरवा कंदील ... ... | ६१ |
| १० | लेखनकामाठी ... ... | ७१ |
| ११ | हॉलीवुडची वारी ... ... | ७९ |
| १२ | लास् वेगास्चें जुगारी जग ... | ९० |
| १३ | शवानो ... ... | ९८ |
| १४ | नीग्रो ... ... | १०६ |
| १५ | विलासी लिंकन ... ... | ११४ |
| १६ | निरोप .. ... | १२५ |


लेख क्रमांक चार आणि सात 'रविवारच्या केसरी'त प्रसिद्ध झाले आहेत. उरलेले चौदा लेख 'वाङ्मय शोभा' मासिकांत जानेवारी १९५८ ते ऑक्टोबर १९५९ या कालांत क्रमशः प्रसिद्ध झाले आहेत.

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन.

क्र. १०७९८

# १ अमेरिकेस पहावें जाऊन

अमेरिकेस पहावें जाऊन—
अशा शीर्षकाखालीं लेख लिहावा
इतके त्रासदायक व हास्यास्पद अनुभव
अमेरिकेस जाण्याची तयारी करणाऱ्यास
येतात. मला वाटलं ह्या अडचणी मलाच आल्या. पण इकडे येणारा प्रत्येक विद्यार्थी तीच ( रड ) कथा सांगतो. ( आणि तरीहि एवढ्या गोंधळांतून इकडे येऊन पोंचतो. ) विश्वविद्यालयांशीं पत्रव्यवहार करून भली मोठी फाईल तयार होते. आई-वडिलांचे जन्मदिवस, आईचं लग्नापूर्वी कुठल्या गांवीं किती किती दिवस वास्तव्य इथपर्यंत कुळ विचारलं जातं. अशाच फाइली पासपोर्ट, व्हीसा, डॉलर मिळवितांना होतात. साध्या गोष्टीनेंहि पासपोर्ट अडतो, व अनेक पत्रं लिहून व्हीसा मिळतो तो पांच मिनिटांत. डॉलर मिळवणं ही लॉटरी मिळण्यासारखी अवघड व जुगारी बाब होऊन बसली आहे. हें सगळं साधावं तों वैद्यकीय तपासणी अखेरपर्यंत अडवते. रडवतेहि ! अनेक स्नेही जेवणाचीं निमंत्रणं देत असतात. अन् त्यांतच वैद्यकीय तपासणींत डॉक्टरची सुंदर नर्स पोटतपासणीसाठीं भर सकाळीं बोलावते व एरंडेलाचा पेला पुढें करते. सामानाची जमवाजमव ही अशीच गोंधळाची बाब. अमेरिका हिंडून आलेले दोन लोक अगदीं एकमेकां-विरुद्ध सल्ला देतात. 'खूप कपडे घेऊन चला हो ! तिथें सारं महाग आहे—'

एक सांगतो. तर दुसरा म्हणतो, ' कशाला नेतोय् कपडे ! तिकडे छान नि स्वस्त मिळतात–' सामानाची बॅग सारखी वजनाच्या कांट्यावर चढलेली असते. जराहि जास्त वजन विमानवाला घेणार नाहीं हें विसरतां येत नाहीं. त्यांतच कस्टमची वक्रदृष्टि. ऑफिसांतून रजा मंजूर होऊन आलेलीहि नसते एव्हांपर्यंत. घराचा उंबरठा ओलांडणं म्हणजे हिमालय ओलांडण्यासारखं होतं. विमा उतरणारे, प्राप्तीकर वसूल करणारे, प्रवासाची व्यवस्था करणारे, अनेक भुंगे मागं लागलेले असतातच. परदेशास जाणारा वीर ह्या सर्व सोहळ्यांनीं मेटाकुटीला येतो. एवढे कागदपत्रं, भेटीगांठी, सांभाळतांना धामाधूम होतो. सगळं जमत आणावं तर नवीनच कांहीं उपटतं. कुणीतरी खो घालतं. अमेरिकेस जायची खुमखुम, उत्साह संपुष्टांत येतो. अन् त्याच वेळीं लक्षांत येतं कीं, अखेर सगळी तयारी झाली व जाण्याचा दिवसहि उजाडला.

आपला देश सोडतांना माणसाच्या मनांत असंख्य विचार येतात ! आपल्या जवळच्या माणसांना तोडून दूर जातांना होणारं दुःख तर मोठंच, पण त्यापलीकडेहि स्वदेशाबद्दलच्या प्रेमानं तो किती अनावर होतो. देशाची सारी संस्कृति, सारीं मानचिन्हं त्याला बिलगतात. जबाबदारी वाढते. विमान सुरू झालं कीं पायांखालची भुई अक्षरशः डोक्याभोंवतीं फिरूं लागते... स्वदेश सोडून युद्धासाठीं जाणाऱ्या सैनिकांच्या भावना काय असतील ?... देशासाठीं कांहीं भव्य करायला निघालेल्या नरोत्तमाला काय वाटत असेल? खानखोज्यांना काय वाटलं...नि सावरकरांना काय वाटलं ?... " ने परत मायभूमीला, सागरा प्राण तळमळला " ही काव्यपंक्ति कशी स्फुरली... आपली जमीन सोडून निर्वासितांना ढोरासारखं हाकललं तेव्हां त्यांना काय झालं...नवा देश वसाहत करायला म्हणून मानव शोधायला लागतो तेव्हां त्याला आपल्या जन्मभूमीबद्दल काय वाटतं ?...लिव्हरपूलहून न्यूयॉर्कला जाणाऱ्या आमच्या बोटीवर बरेच आयरिश लोक होते. दारिद्र्याला कंटाळून कानडा-अमेरिका कुठंतरी कायम रहायला म्हणून निघाले होते. दरिद्री आयर्लंडमधून अनेक लोक असे प्रत्यहीं बाहेर जात आहेत ! देशप्रेमाचे धडेही देणाऱ्या आयर्लंडपुढें ही मोठी समस्या सध्यां आहे ! अमेरिकेचीं सोनेरीं स्वप्नं पहात मजेंत देश सोडणारे ते लोक पाहून वाटलं, ह्यांनीं आपल्या

मायभूमीबद्दल प्रेम बाळगावं कशाला–त्यांची तिथं उपासमार होते तर!– पण रात्र पडतांच बोटीचे कोपऱ्यांत, डेकवर जमून ते स्त्री-पुरुष आयरिश गाणीं म्हणतांना भान विसरत होते. आपल्या गांवल्याचा गजर करीत होते! ...आमचं विमान ग्रीसवरून झेपावत होतं व पायलट मला अथेन्स दाखवीत होता. अथेन्सजवळून एक रांग हलकेच सरकत असल्याचा भास झाला. तो मानवांचा जथा तर नसेल? सगळाच भास असेल. पण अथेन्सची संस्कृति–मुबत्ता आठवली व मग ग्रीकांचा पडता काळहि स्मरला. मनुष्य आपल्याला पोसणाऱ्या काळ्या भूमीला उन्हांत टाकून पुढें जात आहे असं सारखं वाटत राहिलं...आम्हीं मुंबई सोडली तेव्हां विमानांत एकाच्या कोटाला पान चिकटलं होतं! 'हिंदुस्थानांतल्या वेलीचं पान' कुणीं म्हटलं नि मग सर्वांनीं तें कुरवाळलं. माझं लक्ष त्याच्या बुटांना लागलेल्या धुळीकडे गेलं. धुळीलाहि एखादे वेळीं दिव्यत्व येतं! सारा मनाचा चाळा!–

एअर इंडियाचं विमान फार चांगलं आहे. तज्ज्ञांचे मतें इंडियाची यांत्रिक सामुग्री व एंजिनं श्रेष्ठ दर्जाचीं आहेत. आमचा नॅव्हीगेटर म्हणाला कीं, सगळ्या विमान कंपनींत जास्त पैसा एअर इंडिया कमावते. एअर इंडियाच्या आद्याक्षराला अनुसरून A 1 असा क्रम आमच्या एअर होस्टेसनें लावला. पुढें तिचे विनोद होतेच: एअर फ्रान्सला ऑल फूल्स; टी. डब्लू. ए. ला टू वीक्स आफ्टर (म्हणजे सदा उशीर करणारी कंपनी) वगैरे. थोडंसं ह्यांत तथ्यहि असावं. आमचा युनिव्हर्सिटी चेअरमन सम्नर म्हणतो कीं, अमेरिकेबाहेर प्रवास करायचा असला तर अमेरिकन विमानांत कधीं बसूं नये. तीं नेहमीं बिघडतात व परत येतात.

विमानांत बसल्यावर काचेंतून विमानतळ दिसतो. माणसं दिसतात. आपले नातलग व स्नेहीहि ओळखतां येतात. त्यांना मात्र आपल्याला बघतां येत नाहीं. आपल्याला त्यांचेशीं बोलतां येत नाहीं. विरहापूर्वीं फक्त उघड्या डोळ्यांनीं अखेरचं दिसेल तेवढं टिपायला मिळतं. ऑपरेशन टेबलवर भूल दिल्यावर माणसाला होतं तसं बधिर, असहाय होतं. मग इंजिनाचे भयंकर आवाज होतात. पोटांत तुटतं. सुंदर हातांनीं विमानवनिता पोटाभोंवतीं पट्टा बांधते. आपल्याला पोटांत घेऊन तो प्रचंड पक्षी आकाशाची वाट चालूं लागतो......

सगळे कसे गप्प होते. आपापल्या मित्रांची, कुटुंबियांची आठवण कुरवाळीत होते. सुभेदारचे डोळे अजून डबडबले होते. देसाईनं कुंकवाचा टिळा लावला होता. शाळेंतलीं व स्काऊटचीं मुलं बोलावून त्यानं स्वतःचा निरोप–समारंभ खूप रंगवला होता. बाजपायची चुळबूळ चालू होती कीं सिगरेटी व बीअर फुकटांत मिळते का नाहीं ? उषा रॉय व राजू कौर एकमेकींच्या अंगावर माना टाकून गुलगुल बोलत होत्या. साऱ्यांच्याच अंगावर फुलांच्या पाकळ्या व निरोपांचे ठसे उमटले होते.

आपापलीं जगं तोडून आलेले आम्ही सगळे साठ विद्यार्थी अर्ध्या तासांत एकमेकांचे दोस्त झालों. कामत चांगला टेबलटेनिस खेळतो, सिद्दीकीच्या बहिणीनं विणलेला रुमाल दिला आहे, सुधाला तिचा मामा लंडनला भेटणार आहे, ह्या साऱ्यांचीं जंत्री माझ्याजवळ जमत होती. आपलीं माणसं सोडून अधांतरीं आल्यावर लोक एकमेकांचा आधार घ्यायला धडपडतात हें पाहून गंमत वाटली. थोड्या वेळांत पत्त्यांचे अड्डे सुरू झाले. बीअरच्या बैठकी भरल्या. एकमेकांना घरचे फोटो दाखवणं, एकमेकांचे पत्ते उतरवून घेणं सुरूं झालं. तशांतहि डिसूझा आपल्या प्रेयसीला पहिलं पत्र लिहीत बसला...

विमानांतल्या 'क्रू'ची मनःस्थिति मात्र वेगळी होती. असे अनेक प्रवासी त्यांनीं आणले, पोंचवले असतील. निरोपाचे, विरहाचे अनेक प्रसंग पाहिले असतील. एक लहान मूल गळ्यांत चिठ्ठी अडकवून असंच एका खंडांतून दुसऱ्या खंडांत त्यांनीं सुखरूप पोंचवलं होतं नुकतंच ! धाडसाचे, मृत्यूच्या सलगीचे, अबोध आनंदाचे अनेक क्षण अनुभवले असतील. मिरांडा म्हणाली कीं, तिचं काम म्हणजे सौंदर्याचा व्यापार ! चुणचुणीतपणावर तिला विमानवनितेची नौकरी मिळाली. अधिकाऱ्यांची, सहकाऱ्यांची, श्रीमंत उतारूंची सलगी तिला त्रास देई. पण फार तत्परतेनें ती काम करीत होती. बिलिमोरिया मोठा धाडसी व अनुभवी पायलट आहे. त्याचं बोलणं ऐकत रहावंसं वाटतं. बोलतांना, कायरोला असं झालं...परवां संध्याकाळीं शांघायला मी केस कापणार आहे...उद्यां सकाळीं दमास्कसला अमुक करणार आहे...वगैरे ऐकलं कीं गंमत वाटे. काल टिळक रोडवर असं झालं... परवां कॅंपांत मी केस कापणार आहे...उद्यां सकाळीं बुधवारांत अमुक जण

मला भेटणार, असं आपण म्हणावं तसं तो सहज सांगे. सुब्रह्मण्यम् बड्या बाता करतो. पण त्याची पत्नी मला ठाऊक आहे. नवरा विमानांत बसला कीं तिची विरहावस्था सुरू होते. सारखे उपास व देवधर्म. बिचारी ! ‘ पायलटची पत्नी ’ हा आपल्याकडेहि कादंबरीचा विषय होऊं शकेल.

वीस हजार फुटांवरून फुलपांखरासारखं जगावरून बागडत जाण्यांत केवढं सुख आहे ! हवेचा दाब, उष्णतामान—कशाचाहि परिणाम विमानांतल्या खुर्चीवर जाणवत नाहीं. नकाशा पहावा तसा खिडकींतून भूभाग दिसतो. भूगोल शिकतांना, नकाशे पहातांना दिसतात तशा नद्या, डोंगर दिसतात. ढगांचे पुंजके धांवतात. धुक्यांचे धबधबे कोसळतात. लांबवरून नदीचा पाट नागमोड करीत येतो व संथ पडून राहातो, विचित्र रंगाचें जमिनीचें तुकडे गोधडी पसरतात, निळ्या समुद्राचं पाणी हलकेंच झुलत असतं. मध्येंच छोट्या, बैठ्या, खेळांत शोभणाऱ्या घरांचीं छपरं दिसतात. एका गांवापासून रस्त्याची पेन्सिलरेघ सुरु होते व नजर ओढीत दुसऱ्या गांवांत घुसते. कधीं खूप घरं दिसतात अन् कुठलं शहर असं दचकून विचारावंसं वाटतं. डोंगरांच्या रांगा ढगांच्या गर्दीत चढतात व खालीं उतरतात. शुभ्र पक्ष्यांचा थवा विमानाचे खालून, कोंबडीमागं पिलं धावावीं तसा जातो—तर दूरवर दुसरं एखादं विमान वाट कमीत असतांना दिसतं. आपल्या मागें जगाचा नकाशा जणूं गुंडाळला जात आहे असं वाटतं, इतक्या वेगांत देश ओलांडले जात असतात.

सांताक्रूझचा विमानतळ साधा आहे व तिथली व्यवस्था गचाळ आहे. रेल्वेच्या तिसऱ्या वर्गाच्या वेटिंगरूमची अवकळा त्या स्थानकाला आली आहे. नवी इमारत केव्हां बांधून होईल ती खरी. झाली तरी अधिकाऱ्यांनीं व उतारूंनीं ती नीट ठेवायला हवी. थुंकणं, खाणं झाल्यावर कागद तिथंच टाकणं, हार फेकून देणं—ह्या नेहमींच्या संवयींनीं नवी इमारतहि नीट राहणं कठीण वाटतं. युरप—अमेरिकेंतल्या इतर विमानतळावरची नीटस व स्वच्छ व्यवस्था पाहिल्यावर हें जास्तच जाणवतं. बेरूथ, रोम, प्राग, लंडन, न्यूयॉर्क, शिकागो—सारेच विमानतळ स्वच्छ व प्रशस्त आहेत. मला बेरूथचा विमानतळ आवडला. मोठ्या निऑन साईन्सनीं विमानतळाच्या इमारतींवर प्रवाशांसाठीं सुस्वागतम्च्या पाट्या

लावल्या होत्या. लावण्य–लतिका स्वागताला सज्ज होत्या. भव्य जेवणघरं, तऱ्हेतऱ्हेच्या पदार्थांचीं दुकानं, पोस्ट, बार–सारंच दिमाखदार व रेखीव होतं. फुलांची तर सर्वस्वी लयलूट केली होती. आणि संगीत सारखं झरत होतं. दमास्कसचा विमानतळ दरिद्री आहे. त्या देशाला पैसा हवा म्हणून विमानांना सक्तीनं तिथं उतरावं लागतं व उतरण्याबद्दल भाडं भरावं लागतं. तरीपण दमास्कस येतांच सगळ्यांना आनंद झाल्यासारखं झालं. सीरियाचं राजकारण समोर घडत होतं–सारखं बदलत होतं. आम्ही हिंदी विद्यार्थी आहोंत हें कळतांच विमानतळावरच्या सोजिरांनीं आनंदाचा गजर केला. रोमचे लोक थंड होते. प्रागचे लोक आम्हांला पहातांच खुशींत आले. पुन्हां चिमुकला देश–कम्युनिझमच्या कचाट्यांत सांपडलेला ! झेकोस्लोव्हाकियासारख्या छोट्या देशानं किती पाहिलंय् न् किती सोसलंय्. कलेंत व वाङ्मयांत केवढी तरी भर टाकली आहे. आणि ह्या देशाचं भवितव्य मात्र अस्थिर व गूढच राहाणार आहे—

प्रत्येक देशाचं पहिलं दर्शन मोठं गमतीचं, तसंच मन हेलावणारं असतं. मुंबई सोडली तेव्हां सारं शहर धुक्यांत लोटलं होतं. झुकलेल्या समुद्राभोंवतीं मान टाकून विसांवलं होतं आणि लक्षावधि दिव्यांनीं झांकलं होतं. दिव्यांच्या रांगा, टेकड्यांचे हिरवे काळे माथे, समुद्राच्या निळ्या शाली—सारं पहातांना वेगळाच परिणाम जाणवत होता. ही आमची मुंबई, हा माझा देश, असं वाटत होतं; नि नव्हतंहि ! हिंदुस्थानांत प्रथम पाऊल टाकणाऱ्या माणसाला काय वाटत असेल ? माझा इथला प्रोफेसर म्हणतो कीं, त्याचं विमान दिल्लींत प्रथम उतरूं लागलं तेव्हां महात्मा गांधी ‘ रोप ट्रिक ’ करीत आहेत व अनेक भिकारी व अस्पृश्य तें पहात उभे आहेत असं त्याला सारखं दिसत होतं. तर त्याची पत्नी म्हणते कीं, आपण मायभूमीस फारा जन्मांनीं आलों, असं तिला वाटलं. कधीं भव्य, दिव्य, कधीं चुकार वा सुमार, कधीं वाचलेल्या पाहिलेल्या कल्पना ह्यांचा पिंगा मनांत सुरू होतो हेंच खरं. रोमला आम्ही उतरलों तेव्हां रोमन साम्राज्य, ज्यूलियस सीझर व मुसोलिनी, पिसाचा मनोरा व अनेक अद्वितीय कलाकृति आठवायचा मी यत्न करीत होतों. माझा सहप्रवासी सिद्दिकी म्हणाला–‘ ओ,रोमन हॉलीडे ! ’ त्याला त्या चित्रपटाची याद आली !

आणि आश्चर्य हें कीं, आम्हांला प्रथम दिसले ते लँब्रेटा चालवणारे अनेक स्त्री–पुरुष ! प्रागला उतरलों पण लाल राज्याचा लवलेश कुठं दिसला नाहीं. उलट शिबनलाल सक्सेना धोतर कुडता घालून त्या विदेशी वातावरणांत मस्त उभे होते, त्याचीच गंमत जाणवली.

लंडन एखाद्या म्हाताऱ्या बाईसारखं वाटलं...प्रत्येक गांवाला एक व्यक्तिमत्व असतं. मानवी रूप असतं. एखादं गांव शिष्ट असतं. आपल्याच तोऱ्यांत असतं. एखादं खेडं उठवळ बाईसारखं असतं तर एखादं अर्धमुग्ध तरुणीसारखं मोहक, लाजरं असतं. इतिहासकालीन उज्जैन, संस्थानिकासारखं अस्सल घराण्यातलं पण दुर्दैव सहन करणारं वाटतं. बेळगांव बालवर्गांत पाटीपेन्सिल जवळ घेऊन बसणाऱ्या स्नेह्यासारखं. ठाणं अर्धवट माणसासारखं. पालघर घरांतल्या जुन्या इमानी चाकरासारखं. नाशिक बायकोच्या थोरल्या बहिणीसारखं प्रेमळ पण ढालगज...लंडनला पोंचलों तेव्हां संध्याकाळ संपत होती. अंधारून आलं होतं नि पाऊसहि झिमझिमत होता. लोक घाईनं घरांकडे धांवत होते. समोर पहात, ओठ घट्ट मिटून. कुणी बोलत नव्हतं. बैठीं घरं बंद होत होतीं. विमानतळापासून शहरापर्यंत रस्ते ओसाड होत जात होते. जगावर रुसलेली, चिडलेली स्वतःच्या दुःखांत व अभिमानांतहि मग्न असलेली, जुना दिमाख सांभाळणारी व अंगावर सहस्त्र सुरकुत्या पडलेली एखादी म्हातारी असावी तसं लंडन वाटलं. शहरावर विमान घिरट्या घालीत होतं तेव्हां मन आनंदानं चिंबलं होतं. लहान लहान लांकडी रंगीत घरं, प्रशस्त कुरणं–शेतं, मोठाले तलाव, सारं चित्रासारखं दिसलं. एखादा सुबक संसार पहावा तसं. पण तेंच लंडन म्हाताऱ्या बाईसारखं दिसलं जवळ आल्यावर ! दुसऱ्या दिवशीं फटफटलं व मोठालीं दुकानं, रस्ते, माणसं, इमारती नीट दिसल्या तेव्हां लंडनबद्दलची अढी दूर झाली. फणसासारख्या कठीण वाटणाऱ्या म्हाताऱ्या माणसाशीं सलगी झाली कीं त्याचं अंतरंग दिसतं, अनुभव कळतात, अन् तें माणूस आवडूं लागतं, त्याबद्दल आदर वाटतो–तसं लंडनबद्दल झालं. ह्या शहरानं साऱ्या जगावर अधिकार गाजवला. केवढं भोगलं, जिंकलं–अन् वेळ येतांच तितक्याच तत्परतेनें सारं दूर केलं. अनेक शतकांच्या संस्कृतींनीं,

साहित्यांनीं भारलेलं हें जगांतलं थोर शहर आहे हें सारखं जाणवत राहिलं...

न्यूयॉर्क असंच रात्रीं पाहिलं. पण विमानांतून नाहीं, तर समुद्रावरून. न्यूयॉर्क अद्‌भुत वाटलं. एखादी स्वप्ननगरी पहावी असं वाटलं. चांदण्याच्या वर्षावाखालीं, धुक्याच्या आवरणांत, असंख्य दिव्यांनीं चमचमणाऱ्या गगनचुंबी इमारती अति नाजुक व नखरेल वाटत होत्या. नजर खिळवून घेत होत्या. एखादी नग्न युवती गुलाबपाण्यांत स्नान करीत आपल्याशींच गाणं गुणगुणत असावी असं भासलं. जणूं आम्ही जमिनीवर खिळून होतों आणि सागरांतून लक्ष्मीच वर येत होती. मॅनहटनच्या भव्य इमारती आकाशाच्या पडद्यापुढें सारख्या थरथरत होत्या— उदयशंकरच्या नृत्यासारख्या. वास्तुशास्त्राचा उच्चांक तिथं सजीव झालेला दिसत होता. एका बाजूला स्वातंत्र्यदेवीचा पुतळा उभारलेल्या हातानं अमरज्योत दाखवीत होता. तर दुसऱ्या बाजूला रेडिओ सिटीचे मादक दिवे मिचमिचत होते. निळं पाणी सारखं खळखळत होतं अन् दूरवरच्या रेखीव मार्गांवरून मोटारी सारख्या सळसळत होत्या.

न्यूयॉर्कमध्यें दुसऱ्या दिवशीं भटकतांना जाणवलं तें मात्र मुंग्यांसारखीं माणसं नि माशांसारख्या मोटरी. शेंकडों निऑन साईन्स नि शेंकडों निग्रो माणसं !

●●●

*
*
*
*
*
*

# २ अटलांटिक

*

साडेपांचशें वर्षांपूर्वी ह्या दिशेनं कोलंबस गेला. त्या नाखव्याला आमचे पूर्वज शोधायचे होते. तुटपुंज्या साधनांनीं त्यांनीं काळोख्या भवितव्यांत ह्या पाण्यांत होडी सोडली. कसा नि किती काळ तो वहात जात होता... त्याला काय दिसलं...कांहीं दिसलं कां त्याला... पंचमहाभूतांनीं त्याचा केवढा छळ केला असेल...अटलांटिकच्या अवाढव्य जलाशयांत तो जगला तरी कसा ...

जमीन दिसेनाशी होऊन पाण्यानं पूर्ण वेढलेल्या जागीं आलं कीं हे सारे विचार मनांत येतात. जिकडे पहावं तिकडे पाणी. काळं पाणी नि काळं आकाश. निळं पाणी नि जांभळं आकाश. नुसते रंगाचे खेळ. लाटा गर्जत असतात, भरमसाट वारा वाहातो, धुकं अनावर होतं. बोट खळ-बळून हालते व मेल्यासारखी पडून राहाते. चारी दिशा एकदम बंद होतात इतकं वादळ, धुकं येतं. काळ थबकतो. सगळं सुन्न होतं. अटलांटिक फारच संतापी आहे. बोटींना चळचळ कांपवतो. डेकवर रेलून पाण्याकडे निश्चल नजर लावली कीं ह्या मार्गानं गेलेल्या मानवांची स्मृति येते. कितीतरी धाडसी जीवांचा इथल्या क्रूर माशांनीं फडशा उडवला असेल...आणि 'एकला चलो रे—' म्हणत कोलंबस, विस्तवावरून चालत जावं तसं, ह्या अजस्र

सागरावरून पैलतीराला गेला असेल...पंचमहाभूतांचं उग्र स्वरूप आणि मानवाची दुर्दम्य आशा—दोन्हींचं दर्शन घडतं अटलांटिकच्या प्रवासांत !

उबदार झोंपडींत निवारा घ्यावा तसे शेंकडों उतारू बोटीवरच्या सुरक्षित जगांत वावरत होते. बाहेरच्या प्रलयाकडे पाठ फिरवून दारूचा, संगीताचा, नव्या स्नेहाचा आधार घेत होते. हिंदी विद्यार्थ्यांपेक्षां आयरिश निर्वासितांची संख्या अधिक भरली होती; मुंबईकर माणूस पेशवेपार्कमध्यें तुच्छतेनं व ताठ्यानं हिंडेल तसे बोटीवर असलेले अमेरिकन नागरिक इतर प्रवाशांत वावरत होते...मनावरचीं बंधनं बोटीवर सैल कां व्हावींत कुणास ठाऊक ! अनेक जण अनीतीचे धडे घेतात, गिरवतात, तें बोटीवर !—हिंदी मनाला पाश्चात्यांच्या नीतिकल्पनेबद्दल हादरायला होतं तेंहि बोटींतच. चड्ड्या घातलेल्या, सिगरेट दारू पिणाऱ्या, सलगीनं बोलणाऱ्या गोऱ्या स्त्रिया पाहून चक्रवर्तीला धक्का बसला नि परत जावंसं वाटलं, तर जोसेफ अगदीं चेकाळून गेला.

स्वतःला बोट लागण्यापेक्षां दुसऱ्याला बोट लागलेली पाहाणं अधिक वाईट. जेवणाचे टेबलावर समोर बसलेला माणूस पाहतां पाहतां मान टाकतो. डेकवर मजेंत हंसणारी मुलगी घाईनं मान फिरवते व समुद्रांत ओकते. खेळण्याच्या जागा ओस पडतात व हॉस्पिटल भरतं. 'तुमचं नांव काय'—'कुठल्या गांवीं जाणार' वगैरे विचारणारे सहप्रवासी दोन दिवसांतच 'ताप कसा आहे' 'चक्कर येतेय् का', वगैरे विचारपूस करीत बसतात. दोन लहान मुलांना डेकवर सोडून एक बाई बिचारी पांच दिवस बिछान्यावर पडून होती, तें पाहून सगळ्यांनाच वाईट वाटलं. मुलं बिचारी सारा वेळ रडत गोंधळ करीत; अन् त्यांच्या आईला तर उठवत नव्हतं.

त्यांतच मागल्या डेकवर खुर्च्या रिझर्व्ह करायची लगबग सुरू होते. अंगावर रग, हातांत पुस्तक, शेजारी चांगला स्नेही घेऊन सारा वेळ डेकचेअरवर पडून राहण्यांत मोठं सुख असतं. उन्ह नि थंडी खाऊन अंग सुस्तावतं. असंच जगाच्या अंतापर्यंत पडून राहावं असं मनांत येतं; पण नकळत खुर्चीवरून उठून, डेकच्या कठड्याला रेलून, पाण्याचा खेळ पाहण्यांत जीव गुंतून जातो. बोटीनं दुभंगलेलं पाणी खळबळ करीत जोडलं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३५७२३ वि: मु-प्रवास
क्रमांक २५० नों: दि: २८.११.५८



जातं. अधिकच गडद होतं. दरून धुराचा पट्टा वहात असतो. पाण्यांतली मासळी मध्येंच उसळी घेते. पाणी इतकं जड दिसतं कीं, समुद्र अजिबात खोल नाहीं, नुसता चिखल आहे असं वाटतं— पण मध्येंच बोट झोंपेंत चालल्यासारखी बेताल होते नि गडबडींत डेकचेअर गांठली जाते.

सारा वेळ बारमध्यें बसलेली बेटी ही सुकाणूं सुटलेल्या, पाश्चात्य स्त्री–जीवनाची प्रतिनिधि वाटत होती. युद्धामुळें युरोपांतल्या स्त्री–जीवनाचं काय झालं असेल ह्याची कल्पना, त्या शिकागोला कांहींतरी काम शोधायला निघालेल्या आयरिश निर्वासितेमुळें अल्पशी येत होती. ऐंशी वर्षांची तिची मावशी बिचारी भांबावली होती. अमेरिकेंत आपला निभाव कसा लागणार ह्या विवंचनेंत ती होती. मूळची इंग्रज असलेलीं कुटुंबं उन्हाळ्याची सुट्टी इंग्लंडला काढून परत अमेरिकेंत जात होतीं. सानफ्रान्सिस्कोला वास्तव्य करून असलेल्या, तीन मुलांना जन्म दिलेल्या व तीन घटस्फोट पदरांत पाडलेल्या एका सुंदर तरुणीनं सगळ्यांना अमेरिकेबद्दल हवी ती माहिती पुरवायचा मक्ता आपणहून घेतला होता. म्हातारा एड् ऑस्ट्रिया, इंग्लंड,कॅनडा करीत अखेर अमेरिकेचा नागरिक झाला होता व बोटीवर एस्किमोंची माहिती वाचण्यांत रंगला होता.वयांत येऊं पाहणारी ॲन सारखे पोशाख पालटत होती,दोस्त पालटत होती, शफल् बोर्ड, पिंगपाँग, जंबोसारखे नवे खेळ खेळत होती; वॉल्टर्स दिवसभर डेकवर पडून राही, संध्याकाळ झाली कीं नाच–गाण्यांत रंगून जाई व रात्र बारमध्यें घालवी. माझा स्टुअर्ड एका बोटीबरोबर एकदां मुंबईस गेला होता; त्या सफरीची माहिती तो पुन्हा पुन्हा सांगे.फूटपाथवर झोंपणारीं माणसं हें मुंबईबद्दलचं त्याचं मुख्य वर्णन. बोटीवरचा मुख्य पर्सर म्हणजे पुरुषी सौंदर्याचा साक्षात्कार होता. पेगी नि ब्रायनचं लग्न होऊन दोन महिने झाले होते. आल्प्सजवळच्या खेड्यांत हनीमून उरकून तें जोडपं आतां लिव्हरपूल सोडून कॅलिफोर्नियाला शिकायला चाललं होतं. अनेक विषयांबद्दल माहिती, कितीतरी प्रवास केलेला, खूप खेळ येणारी, जगांतल्या सगळ्या गोष्टींबद्दल उत्सुकता असलेली पेगी व ब्रायन म्हणजे सुसंस्कृत पाश्चात्य स्त्रीपुरुषांचे नमुने होते. पेगीनं ट्रेड युनियनमध्यें काम केलं होतं, पण मजूर सरकार अधिकारावर येऊं नये असं तिला वाटे. नुकत्याच झालेल्या इजिप्तच्या स्वारीसाठीं खूप खटपट

करून सैन्यभरती होईना हें ती अभिमानानं सांगे—व नेहरूंना विनोदबुद्धि कशी नाहीं हें मनापासून विचारी. ब्रायन बराच अबोल आहे. चालतो गडबडीनं नि आतुरतेनं. उंच नि धिप्पाड. सगळं जग फुटबॉलसारखं खाकोटीला घेऊन जणूं हा कुठं तरी चालला आहे. हंसतो लहान मुला-सारखा; नि विवेक वृद्धाचा. हजार प्रवाशांत हें दृष्ट लागणारं जोडपं मनः-पटलावरून कधींच पुसायचं नाहीं.

...अपरात्रीं अचानक जाग आली. झुकांड्या खात केबिनबाहेर आलों. सगळे प्रवासी झोंपले होते. जिन्याजवळ खुर्ची टाकून बाथ् स्टुवर्डेस् विणकाम करीत बसली होती. इथल्या सगळ्याच बाया किती ताठ बसतात. एकाग्रतेनं काम करतात. सगळी तन्मयता व सारखा वेग. जाडजूड टॉवेलांत भरपूर स्नान केलं व वरती आलों. इतका वेळ अक्षरशः पाण्याच्या पृष्ठभागाखालीं होतों. वरती सगळं शांत होतं. बार ओसाडला होता. लुंजमध्यें बेटी कुणाबरोबर तरी पत्ते खेळत होती. जिन्यांत सिगरेटचीं थोटकं पडलीं होतीं. डेकवरचं पाणी पायरीवर शिडकाव करून गेलं होतं. डेक निर्मनुष्य होता. दूरवरून एक रेटिंग विजेरी फिरवून नाहींसा झाला. एखाद्या ओसाड रंगभूमीवर एखादं पात्र बिचकत यावं व थबकून उभं राहावं तसा मी त्या खुर्च्यांच्या ढिगांत, सरळसोट धुराड्या-जवळ, दोरखंडाच्या वेटाळ्यापाशीं खिळून राहिलों. मग नकळत रेलिंगला रेललों.

दर्यानं काळा रंग फासला होता आणि दशावतारांतल्या राक्षसासारखा नाच चालला होता. त्या पाण्यानं रंग, रूप, खोली, परिघ कसलींच परि-माणं जुमानायचीं नाहींत असं ठरवल्यासारखं वाटत होतं. चार-पांच दिव-सांच्या सहवासानं सागराबद्दल भीति कमी झाली होती. त्या झुलणाऱ्या अस्वलाकडे मी धिटाईनं पाहूं लागलों. हळूहळू त्या रौद्र स्वरूपाचं मला आकर्षण वाटूं लागलं. समुद्राबद्दल प्रेम वाटूं लागलं. दूरवर एक तारा दिसल्यासारखा वाटला. तिकडे मी डोळ्यानं खूण केली. समोर उंचावत आलेल्या लाटेआड सोनेरी कांतीची व नितळ अंगाची मत्स्यमाला असावी ह्या कल्पनेनं पुढें डोकावलों. गर्द साडीला वेगळ्या रंगाचा शेव असावा तसा त्या काळ्या समुद्राच्या मागच्या बाजूला बोटीनं टाकलेल्या प्रकाशाचा

पदर चिकटला आणि एकदम अनेक रंग उधळावेत असं वाटलं. ती मासळी त्या झोतांत डुंबूं लागली. उजेड बंद झाला व मग सगळं अंधेरं, गडद झालं. बावरून मीं उत्तरेकडे पाहिलं. त्या दिशेनं उत्तर ध्रुवाकडून बर्फांचे सुटलेले कडे हलकेच पण निश्चितपणें पुढें सरकत आहेत असं वाटलं. धुक्याच्या शहारत्या लाटा हवेंतून वाहात आल्या आणि अंगावर कांटा उठला. तेवढ्यांत एक अजस्र लाट उसळून डेकवर आली व अंग भिजवून गेली. आंत परतायच्याऐवजीं मी वेड्यासारखा वरच्या डेकवर गेलों. समुद्रापासून मी आतां कितीतरी सुरक्षित, उंचावर होतों. आणि पंच-महाभूतं माझ्याकडे अनावर क्रोधानीं पाहात होतीं. माशांना सहस्र पायांखालीं तुडवून सागराच्या विराट् लाटा माझ्यासमोर अधिकच विक्राळ नाच करूं लागल्या. बोटीभोंवतीं एकच गलका सुरू झाला. बोटीची दिशा जणूं हरवली व सगळी बोट कलंडूं लागली. लाटांना अतिमानुष आकार येतच होता. जणूं त्यांना डोळे फुटले होते. शेंकडों हात फुटले होते. विचित्र आयुधं घेऊन ते मानवावरचा राग माझ्यावर काढायला पाहात होते. आणि कोलंबसाचा वंशज मूढपणें, एकाकी उभा होता...उत्तरेकडे पाहायची सोय नव्हती. तिकडून बर्फास्त्र जणूं सुटलं होतं. समुद्राला सरकतां येईना म्हणून धुक्यांनीं, दर्दीवरांनीं वेढा घालायला सुरुवात केली. माझ्या जवळपासचंहि दिसेनासं झालं. रेलिंगचा हात सुटला. खालच्या डेकचा भाग जणूं बुडाला ! तिथले दोर, खुर्च्या, बाजूला पडलेलं ग्लास व कप, कांहींच दिसेना. आज सकाळच्या उन्हांतच त्या जागीं लाल रंगावर एक लहान मूल झोंपलेलं मी वरच्या डेकवरून आसासून पाहिलं होतं. त्या अर्भकाची मला आठवण आली. तेवढ्या कभिन्न, विक्राळ वातावरणांतहि माझे खारट ओठ विलग झाले आणि माझ्या मनावर मखमली कांटा आला. परत मीं आसासून त्या स्थळीं नजर टाकली... मला तें मूल दिसलं. प्रलयकाळीं प्रचंड वाहत्या जलावर, तांबूस वटपत्रावर आंगठा चोखीत पडलेल्या बाळकृष्णाची मूर्ति नजरेपुढं आली. पंचमहाभूतांच्या पालखींत तें बालरूप मिरवीत चाललं होतं ! मला एकदम धीर आला. शांत वाटलं. भोंवतीं उधळणाऱ्या लाटा, अंधार, धुकं, बर्फ, पाऊस-सारं असामान्य वाटलं. पुन्हां एकदम सर्व नाच बंद झाला जणूं. सागराचं

तांडव–नृत्यासारखं साधं नृत्य होतं जणूं! वारा, पाऊस, धुकं, सृष्टिनियमानुसार जात येत होतं रहाटगाडग्यासारखं आणि मानव त्यामधून पुढें पुढें चालला होता...त्या उंचावरून सगळीच आगळी शोभा दिसूं लागली. पृथ्वीचा केवढा तरी तुकडा नजरेच्या टापूंत आला. चंद्राच्या आकर्षणाचा अर्थ उमगला. सागराच्या पोटांतला जाळ दिसला व समुद्राखालीं केवढी प्रचंड प्राणिसृष्टि आहे याचा अंदाज आला. भोंवतालच्या पाण्याच्या जागचें पूर्वकालीन डोंगर मोजावेसं वाटलं. आणि उषेचं खरं सौंदर्य समुद्राच्या अंत:पुरांतच बघायची संधि लाभली. धुळीनं भरलेल्या, नांगरानं बलात्कार केलेल्या, उंचसखल, उदासीन भूमीपेक्षां ही सागरी किती उत्कट, भावविवश, रजस्वला व अलंकारांनीं लवलेली आहे हें पटलं. मन निवलं. तें दृश्य, ती वेळ कधींच संपूं नये, संपणार नाहीं, असं वाटलं. काय सुख आहे तें उधाण आलेल्या अंधेऱ्या दर्यावर, उज्ज्वलित मनानं स्तब्ध उभं राहण्यांत!...

प्रवास संपत आला तेव्हां अनेक वर्षांच्या सहवासानं एखाद्या वास्तूबद्दल व तेथल्या माणसांबद्दल प्रेम वाटावं तसं त्या बोटीबद्दल व त्या उतारूंबद्दल वाटूं लागलं. ती बोट आपलीच आहे असं वाटूं लागलं प्रत्येकाला. त्या केबिनशीं, लुंजशीं, डेकवरच्या ठराविक कोपऱ्याशीं व जेवणघरांतल्या टेबलाशी आमचं नातंच जडलं होतं. शेवटच्या दिवशीं वेटरनं आग्रह करकरून वाढलं. एकमेकांच्या स्वाक्षऱ्या घेण्याची एकच घाई सुरू झाली. एकमेकांना सोडणं जिवावर आलं. सिद्दिकीला कांहीं अधिकार होता कां बेटीला उपदेश करायचा! पण त्यानं तिला चार गोष्टी सुनावल्या— नि बेटीनंहि त्या मुकाट ऐकल्या. एड्नं माझ्या केबिनमध्यें येऊन मनसोक्त गप्पा मारल्या. सारा वेळ न्यूयॉर्कबद्दल बोलणारी पेगी हट्टी मुलासारखी म्हणूं लागली, "मला नाहीं बोटीवरून उतरावंसं वाटत. मी इथंच राहणार!"

...पण मग धुक्याला चिरा पडून न्यूयॉर्कच्या दिव्यांची रेषा दिसूं लागली. रुखवताच्या घोड्यासारखी पायलट बोट दिव्यांच्या दारूकामानं खालीं उतरली व किनाऱ्याकडे गेली. अधिक बोटी दिसूं लागल्या. छोट्या बोटींतून सहलीला निघालेले अमेरिकन लोक समोरून रुमाल फडकावीत गेले.

सामानांचे ढीग केबिनबाहेर जमले. एकमेकांना सगळे जण विसरले व आपआपले व्हिसा, पासपोर्ट, कागदपत्र छातीशीं धरून धांवाधांव करूं लागले. स्वातंत्र्यदेवीचा पुतळा पहायला या डेकवर आणि मॅनहटनचे दिवे पाहायला त्या डेकवर असा हुतुतू सुरू झाला. कुणाला विद्यार्जनाची, कुणाला पैसा कमावण्याची, कुणाला चैन करायची, कुणाला आप्तेष्ट भेटायची ओढ होती. सगळे सुखांत होते. भांबावले होते फक्त शिक्षणासाठीं दूर आलेले हिंदी विद्यार्थी आणि कायम वस्ती करायला आलेले आयरिश निर्वासित!

स्वातंत्र्यदेवीचा पुतळा दूरून पाहून धन्य वाटलं. पण त्या एवढ्या अपरात्रीं, बोटीवर येऊन परदेशी विद्यार्थ्यांची वास्तपूस्त करायला आलेल्या, उत्साहानं निथळणाऱ्या स्त्रीनं अमेरिकन व्यक्तिमत्वाचं दर्शन घडवलं तें त्या पुतळ्याहून थोर होतं.

• • •

# ३ अमेरिकन माणूस....
# ....अमेरिकन मोटार

अमेरिकेंत आल्यावर एक गोष्ट लक्षांत येते आणि मग कुठंहि हिंडलं तरी जाणवत राहते, ती म्हणजे इथल्या जीवनांतला एकसारखेपणा. ह्या अवाढव्य देशांत कुठंहि जा—सगळीकडें सारखीं दिसणारीं—वागणारीं माणसं. थोडाफार फरक अर्थात् असतोच. न्यूयॉर्क, टेक्सास व कॅलिफोर्नियाची माणसं एकमेकांपेक्षां वेगळीं वाटतील.पण हा फरक एकंदरीनें अल्पच. एरवीं सगळ्यांच्या लकबी, आवडीनिवडी, आयुष्यक्रम एकसारखा. युरोपसारख्या छोट्याशा खंडांत अनेक वंश व जाती ठेचून भरल्या आहेत. त्याच्या पार्श्वभूमीवर हें फारच जाणवतं. हिंदुस्थानांत सांस्कृतिक एकता आहे वगैरे म्हणतांना थोडा जरी प्रवास केला कीं, किती वेगळालीं परिस्थिति आढळते. अनेक देशांचा हा समूह आहे, पुरातन संस्कृतीच्या चिवट पण सूक्ष्म धाग्यांनीं सारे भारतीय नाममात्र एकत्र राहिले आहेत, असं वाटतं. हिंदुस्थानापेक्षां उत्तर अमेरिका तीनपट मोठी. अनेक देशांतले व वंशांतले लोक इथें स्थायिक होऊन त्यांनीं हा देश नुकताच वसवला आहे. एवढा नवथरपणा, एवढं मिश्रण असूनहि सामाजिक जीवनांत व एकंदर राहणींत ह्या लोकांनीं एक समान सूत्र ठेवलं आहे—कुठल्याहि गांवाचा नकाशा साधारण ठराविक असतो. इतका कीं, एकदम कुठल्या

गांवीं आपण आहोंत हें सांगणं कठीण जातं. वेशीवर पेट्रोल विकणाऱ्या 'स्टँडर्ड' कंपनीच्या जाहिराती—मोटेल्स—ठराविक पद्धतीचीं दारूचीं दुकानं, ड्रग स्टोअर्स, हॉट डॉग्स, हॅंबुर्गर्स विकणारीं उपहारगृहं, मध्यवर्ती बाजारचा रस्ता. सगळे चौकोनी रस्ते. लाकडाचीं सुबक घरं...सगळीकडे सारखीच मांडणी. एक अमेरिकन गांव पाहिलं कीं इतर सर्व गांवं पाहिल्याचं श्रेय पदरांत पडावं. अर्थात् न्यूयॉर्क शिकागोसारखी पंधरावीस मोठालीं शहरं सोडून! गांवांची जी गोष्ट तीच अमेरिकन माणसाची. बहुतेक प्रत्येक जणच घाईत असणार. तरीहि भेटतांच तो स्वतःची ओळख करून देईल. तुम्हांला तुमच्या नांवानें हांक मारील, घरीं नेऊन कुटुंबियांसारखा वागवील! हंसतमुख, मदत करायला तत्पर. भेट संपतांच तितक्याच वेगानें सारं विसरून जाईल. मग तो न्हावी असेल, प्राध्यापक असेल, दुकानदार असेल, कीं विमा एजंट असेल. त्याच्या वागण्याचा व त्याच्या धंद्याचा संबंध कांहीं नाहीं. एका दृष्टीनं इथें साम्यवाद आहे. पोटासाठीं माणूस काय व्यवसाय करतो, त्यावरून त्याचा सामाजिक दर्जा फारसा ठरवला जात नाहीं. पोस्टमन प्राध्यापकाबरोबर पाठीवर थाप मारून कॉफी घेईल नि टॅक्सीहांक्या भगिनीसमाजाच्या अध्यक्षीणबाईबरोबर सिनेमाला जाईल. तुमच्या व्यवसायाकडे, तुमच्या कपड्याकडे, काकदृष्टीनें पाहण्याची शक्यता एकूण कमीच! सगळ्यांनीं जगावं, पैसे कमवावे व चैन करावी ही वृत्ति!

ब्लू जीन्स, हॅंबुर्गर व मोटार हीं अमेरिकन माणसाच्या जीवनाचीं तीन आवश्यक अंगें. तो ब्लू जीन घालील, हॅंबुर्गर खाईल व मोटारमध्यें निम्मे आयुष्य घालवील. ब्लू जीनइतकी कुरूप गोष्ट मीं पाहिली नसेल. जाड निळसर कापडाची, अनेक खिसे व ठिगळं असलेली ही पुंगळीसारखी विजार प्रत्येकाचे संग्रहीं असते. झाडझुड करायच्या कामाला ही मळखाऊ विजार वापरायची. पण अमेरिकन माणूस ती कधीं वापरील तें सांगतां येत नाहीं. स्त्रिया देखील ब्लू जीन्स घालतात! सुंदर तरुण स्त्रीनें ब्लू जीन्स घालून सौंदर्याचा अपमान चालवल्याचीं उदाहरणं पदोपदीं दिसतात. ही विजार कधीं धुवायची नसते म्हणे! ( इथले लोक एकंदर गलिच्छच!

तोंडाला चारदां स्नो पावडर लावतील, पण जुम्मेके जुम्मे दांत घासणार नाहींत) घरकाम करतांनाच नव्हे तर बाहेरहि ब्लू जीन्स घालून हिंडतील. अन् वर म्हणतीलहि, काय कुरूप चीज आहे ही ! इंग्रज लोकांसारखें कपड्यांचे बाबतींत हे लोक घोळ घालीत नाहींत, म्हणून ह्यांचे कौतुक करावें तर ब्लू जीन्स नजरेसमोर फडफडते. माझा हिंदी मित्र म्हणतो कीं, निदान जीन्स घालतात हें नशीब समज ! उन्हाळा आला कीं इथले स्त्रीपुरुष जे कपडे घालतात—म्हणजे कांहींच घालत नाहींत जवळजवळ—तें पाहिलं कीं ब्लू जीन्स परवडली असं म्हणायची पाळी येते.

एका नव्या आलेल्या जपानी विद्यार्थ्याला आमच्या प्राध्यापकानं घरीं जेवायला बोलावलं. टेबलावर तऱ्हतऱ्हेचे पदार्थ पाहतांच तो चकित होऊन म्हणाला, ' हे सगळं मिळतं इथं ? मी आतांपर्यंत नुसत्या हॅंबुर्गर्सवर राहतों आहे !' हॉट डॉग्ज् ऊर्फ गरम कुत्र्यांची जागा सध्या हॅंबुर्गर नांवाच्या खाद्य पदार्थानं घेतली आहे. लहानसहान हॅंबुर्गर स्टॅंडस् सर्वत्र दिसतात. लांबलचक टेबलासमोरच्या खुंटावर बसून लोक सारखे हॅंबुर्गर्स खात असतात. हे गरमागरम पावरोटींत ठेवलेले मांसाचे गोलाकार तुकडे अजून मशीन्स-मधून विकत नाहींत हें आश्चर्यच म्हणायचें ! कारण सिगरेट चॉकोलेटच काय, पण खाद्यपेयहि मशीनमध्यें नाणीं टाकून मिळायची सर्वत्र सोय झाली आहे. दहा पंधरा सेंटस् टाकले कीं दुधाचा, आईस्क्रीमचा, खाण्याचा डबा मशीन आपल्या हातीं देतं.

हे सारे प्रकार ड्रग स्टोअर्समध्यें पहायला मिळतात. ' ड्रग स्टोअर ' ही एक इरसाल अमेरिकन चीज आहे. प्रत्येक गांवांत दोनचार तरी अशीं दुकानं असायचींच व प्रत्येकाचा तोंडावळा एकसारखा असायचा. (ह्या औषधालयांत कोणतीं औषधं विकायची ह्याचे इथले नियम अजबच आहेत—) औषधं, सौंदर्य—साधनं तर मिळतातच, पण त्याखेरीज इतर हजार तऱ्हा असतात. नित्योपयोगी वस्तु मिळतात. पुस्तकं, मासिकं, स्टेशनरी, पोस्टाचीं तिकिटं, तंबाखू, सिगरेट, ताजीं वर्तमानपत्र—सारं कांहीं मिळतं. ड्रग स्टोअर्सचा एक कोपरा म्हणजे उपहारगृह. तिथे चहाकॉफीपासून जेवणापर्यंत सगळे पदार्थ मिळतात. सर्वसाधारण माणूस दिवसांतून दोनदां तरी ड्रग स्टोअरमध्यें जातोच. छोटीशी तुळशीबागच असते ती !

ड्रग स्टोअर्समध्यें जें मिळत नाहीं तें ( कपडे, कापड सोडून ) मार्केटमध्यें मिळतं. हीं अन्नधान्याचीं दुकानं अशींच प्रेक्षणीय असतात. सगळे पदार्थ रचून, मांडून ठेवलेले असतात. तांदूळ, डाळी, मसाले, मासे, मांस,फळें, भाज्या, लोणी हरतऱ्हेचे डबाबंद पदार्थ, एक ना दोन. नौकर ठेवणं परवडत नसल्यानं प्रत्येक पदार्थावर किंमत लिहून ठेवलेली असते. दाराजवळच्या शेंकडों बाबागाड्यांतली एक घेऊन आपण पुढं व्हायचं, पदार्थांच्या रांगांतून फेरी घालायची, हवा तो पदार्थ गाडींत टाकायचा, शेवटीं चक्कर संपवून परत दुकानाच्या टोकाशीं आलं कीं घेतलेल्या सामानाची किंमत देऊन सामान घेऊन जायचं. स्त्रीपुरुष अशा गाड्या ढकलीत आठपंधरा दिवसांची खरेदी एकदम करतात; बराचसा माल डब्यांत पॅक केलेलाच असतो. 'दोन मिनिटांचा तांदूळ', 'दोन मिनिटांची न्याहरी' वगैरे डबे उघडून आंतले जिन्नस गरम केले कीं जेवण तयार ! गेल्या दहा वर्षांत ताज्या भाज्यासुद्धां विकत घेण्याचें प्रमाण घटलं आहे. गार करून ठेवलेल्या भाज्या वाढत्या प्रमाणांत खपतात. सगळंच सोपं, तयार, ताबडतोबीचं, कमी श्रमाचं करण्याकडे कल !

ड्रग स्टोअर व सुपर मार्केट ह्यांच्यामध्यें व बाजूला बिअरचे गुत्ते ( टॅव्हर्न ) असतात. मंद उजेडांत हॅम, मिलर, बुडवैझर, ब्लाट्झ वगैरे पांचट अमेरिकन बीअर पाण्यासारखी खपते. छोट्या गांवांत वयस्के माणसं व मोठ्या गांवांतून तरुण पोरं पोरी टॅव्हर्नचा मासळीबाजार करतात. क्वचित् मारामारी होते. कधीं जुगार चालतो. पण एकंदर दारुविक्री, मादक संगीत व तरुण स्त्रियांची ये-जा पाहिली म्हणजे लोक बरेच सभ्यपणें मद्यपान करतात असं म्हणावंसं वाटतं. मोठ्या शहरांतून बार व नाईट क्लब्जचं प्रमाण वाढतं असतं. पण सर्वसाधारण अमेरिकन गांवांत बार कमी व रात्रीचीं क्रीडागृहं शून्यच !

ड्रग स्टोअर, टॅव्हर्न, चर्चेस, हायस्कूल्स, बाजाररस्ता ( डाऊन टाऊन— ) हे अमेरिकन गांवाचे कुठेंहि आढळणारे आवश्यक घटक. टेलिफोन, रेडिओ टेलिव्हिजन, वॉशिंग मशीन, फ्रिजीडेअर, लाइफ टाईमचे तसेंच टाइम मासिकांचे अंक हे प्रत्येक अमेरिकन घराचे घटक. कांचेच्या खिडक्यांच्या व कागद लावलेल्या भिंतींच्या लाकडी घराला बहुधा तळघर असायचंच.

घरमालकीण घर नीटनेटकं ठेवीत सारखी काम करते. नवरा बहुधा कामावर जातो. घरीं असला तर (नवीन लग्न झालं असेल तर) बद्दा विसळतो किंवा वर्तमानपत्र चाळतो. मुलं लहान असलीं तर तळघरांत नाहीं तर घराबाहेर चोरशिपाई, खून, रेड इंडियन वगैरे खेळ खोट्या बंदुका घेऊन खेळतात. मोठीं असतील तर फोनवरून मित्रांशीं बोलतील किंवा टेलिव्हिजनवर दर्दभरा अगर खुनांनीं खचलेला कार्यक्रम पाहतील. सगळंच कुटुंब अगदीं आंखीव व तरीहि आकर्षक आयुष्य चालवतं.

पण अमेरिकन जीवन संपूर्ण व्यापून टाकणारी व गतिमान ठेवणारी कोणती गोष्ट असेल तर ती मोटार गाडी ! चार चाकीनं इथल्या जीवनांत संपूर्ण क्रांति केली आहे. गांवोगांवीं विमानतळ आहेत. कित्येकांचीं स्वतंत्र छोटीं विमानंहि आहेत. पण मोटरची मिजास आगळीच ! त्यामुळें इथल्या रेल्वेला अवकळा आली आहे. रेल्वेनें फारच थोडे प्रवास करतात. रेल्वेवरून मालाच्या वाघिणीच बहुधा हिंडतात. पोमलवाडी किंवा विक्रोळी स्थानकाचं स्वरूपहि इथल्या रेल्वे स्टेशनांपेक्षां चांगलं म्हणावं लागेल. फलाट ही चीजच इथें नाहीं. इतकी दशा मोटारमुळें झाली आहे. खुद्द मोटारच्या रूपांत, गतींतहि दर दिवशीं बदल होत चालला आहे. अठ्ठावन साल उजाडतं न उजाडतं तों अठ्ठावनच्या मोटारगाड्या जुन्या बाजारांत विक्रीला येतात व नवीं मॉडेल्स तयार होऊं लागतात.

फेअरलेन, लिंकन, कॅडीलॅक, ब्युईक, डॉज, पोंटीॲक—हजार तऱ्हेच्या मोटारगाड्या रस्त्यानं दिसतात. जनरल मोटर्स कंपनी जगांत सर्व व्यापारी कंपन्यांहून अधिक पैसा जाहिरात खात्यांत खर्च करते. फोर्ड फॅमिली ह्या संज्ञेनें ओळखल्या जाणाऱ्या फोर्डच्या आठदहा वेगळाल्या मोटारगाड्या बाजारांत आहेत. सामान्य माणसाला परवडेल अशीहि मोटार मिळते आणि एखादा कुबेर असेल व मुख्यतः घरंदाज असेल तर त्यासाठीं फोर्ड कंपनी खास गाडीहि तयार करून देते. ह्या अमेरिकन गाड्यांत कांहीं युरोपिय गाड्याहि मध्येंच दिसतात. जर्मन व इंग्रजी गाड्या महाग—आणि त्यांना मागणीहि फार आहे. अमेरिकन गाड्या आठदहा वर्षे जेमतेम टिकतात. त्या फार काळ नीट राहूं नयेत अशीच त्यांची बांधणी असते. कारण इतकी जुनी गाडी कुणी वापरतहि नाहीं.

माझी कल्पना होती त्याप्रमाणें प्रत्येक अमेरिकन माणूस गाडी वापरीत होता असें नाहीं. मोटार नसणारे, मोटार घेणें न परवडणारे पुष्कळ लोक इथे आहेत. लिंकन नि कॅडीलॅक गाड्या कमी दिसतात. पण हेंहि खरें कीं, साठसत्तर टक्के जनता मोटारगाड्या वापरते. संधि मिळाली कीं माणूस मोटार घेतो. कांहीं घरांतून दोनतीन मोटारगाड्या असतात. बापाची वेगळी, पोराची वेगळी, आईची वेगळी. वयांत येणारा मुलगा मुलींबरोबर मोटारीहि हिंडवतो. लहान मुलें, मुली नि अगदीं वृद्ध स्त्रीपुरुष सहजपणें मोटार हांकतात तें पाहून गंमत वाटते. हाताशीं मोटार असल्यामुळें शहर नि गांव ह्यांतलं अंतर नाहींसं होत आहे. शहरांचा विस्तार वाढत आहे व खेडेगांवं एकेक दोन दोन घरांचीं बनत चाललीं आहेत. पन्नास अन् शंभर मैल रोजगारासाठीं लोक जातात. सकाळीं उठतांच कर्ता माणूस मोटारचें चाक हातीं घेतो. आणि मोटार जवळ असल्यामुळें तरुण मुलामुलींना नजरेच्या टप्प्यांत ठेवणंहि अवघड झालं आहे. टेलिव्हिजननं माणसाचं आयुष्य उथळ होत आहे तर मोटारमुळें तें अस्थिर बनत चाललं आहे.

दिवसाचा बराच वेळ मोटारमध्यें काढावा लागत असल्यानें खुद्द मोटारमध्यें अनेक सुखसोयी केल्या जातात. रेडियो, उबदार पांघरुणं, कपड्यांची पेटी व हँगर या गोष्टी कुठल्याहि गाडींत आढळतात. मोटारच्या चाकाजवळ छोटं चाक बसविलेलं कधीं कधीं दिसतं. त्या छोट्या चाकाशीं लहान मूल खेळतं, खोटं खोटं मोटार चालवितं व जवळ आई गाडी चालवीत बसते. पेट्रोल पाण्यासारखं स्वस्त मिळतं अन् कांहीं घरीं तर पेट्रोलची मोठी टाकीहि ठेवून देतात. जागेच्या अभावीं कांहीं जण तर सुखसोयींनें पूर्ण असलेल्या ट्रेलरमध्येंच राहतात. मोटारला ट्रेलर लावला कीं कुठेंहि विंचवाच्या बिऱ्हाडासारखें आपलं घर नेतां येतं.

मोटारींच्या या वाढत्या संख्येमुळेंच मोटेल्स ही संस्था अस्तित्वांत आलीं आहे. मोटार व हॉटेल यांच्या मिश्रणानें बनलेला हा शब्द. प्रत्येक गांवाबाहेर अशीं अनेक मोटेल्स असतात. दिवसभर प्रवास करावा, रात्र आली कीं मोटेल्समध्यें थांबावं, जेवण करावं व गाडी पुढें ठेवून रात्र खोलींत काढावी. सकाळीं उठून पुढचा मार्ग धरावा. गांवांतल्या गर्दींत जायची

कटकट नको. रात्रभर गाडी चालवायची दगदग नको. कधीं कधीं मात्र अशी मोटेल्स अनीतीचे अड्डेहि ठरतात.

मोटारमुळें ह्या देशभर मोठाले सुबक रस्ते तयार झाले आहेत. असे 'हायवेज' ही एक नेत्रदीपक गोष्ट आहे इथली. लाखों डॉलर्स खर्च करून व निर्दोष योजना आंखून अशा हायवेजचं जाळं अमेरिकेभर पसरलं आहे. करड्या रंगाच्या गालीच्यासारख्या पायघड्या पसराव्या असे स्वच्छ, सरळ रस्ते मोटारगाड्यांनीं सदा गजबजलेले असतात. सत्तरऐशीं मैलांचे वेगानें ह्या मार्गानें सहज जातां येतं. खड्डे पडूं नये, खडाहि राहिला जाऊं नये, म्हणून ह्या मार्गावर सारखी गस्त चालू असते. बर्फ पडतांच तो ओढून उचलून टाकला जातो व रस्त्यावर मीठ अगर वाळू टाकली जाते. बहुतेक हायवेज गांवाची गर्दी टाळून बाहेरून जातात. एका खालून एक असेहि रस्ते धांवतात. सगळीकडे नंबर व दिशा दाखवणाऱ्या पाट्या असतात, त्यामुळें मोटारवाला रस्ता चुकत नाहीं. एक्सप्रेस हायवेसारख्या मोठ्या रस्त्यावरून साठसत्तर मैलांच्या वेगानेंच जावं लागतं. शिकागो, न्यूयॉर्क-जवळ असे राजरस्ते वारंवार भेटतात व वायुवेगानं मोटारी एकसारख्या धांवत असतात. उंचावरून ही शोभा केवळ अवर्णनीय दिसते. जाणाऱ्या गाड्यांचे पाठीमागचे लाल दिवे व येणाऱ्या गाड्यांचे चकचकीत उजेड. काजव्यांची रांग किनाऱ्यावरच्या बनांतून पुढें येत आहे व लाल दिव्यांचीं ओळ खळखळणाऱ्या पाण्याच्या प्रवाहांतून दूर चालली आहे असा सारखा भास होतो.

इतक्या मोटारी व इतकी गति असल्यावर अनेक अपघात होणं अपरि-हार्य आहे. नुसत्या गेल्या नाताळांत हजारांवर माणसं नुसतीं मोटार-अप-घातांत मेलीं. अपघात न व्हावेत म्हणून सर्व तऱ्हेची खबरदारी घेतली जाते. पण अनेक कारणांनीं, विशेषतः अमेरिकन माणसाच्या धांवऱ्या व बेदरकार वागण्यामुळें, अपघात टळत नाहींत. इतिहासांतला सर्वांत भीषण अपघात गेल्या वर्षीं घडला. मोटार थांबवून एक बाई रस्त्यापलिकडे बघत होती. मागल्या बाजूला तिची पांच वर्षांची व तीन वर्षांची अशा मुली होत्या. खिडकीची कांच अर्धवट उघडी होती व त्यांतून मान बाहेर काढून धाकटी मुलगी बाहेर बघत होती. खिडकी उघडी आहे व वारा आंत येत

आहे ह्या जाणिवेनं आईनें बसल्या जागेवरून मागं न बघतां खिट्टी फिरवून कांच वर सरकवली. खिडकींतून बाहेर बघणारी पोर जरा वर उचलली गेली व तिचा गळा चेंचला गेला. क्षणांतच ती गतप्राण झाली. आई बाहेरच बघत होती. अखेर मोठी मुलगी भांबावून म्हणाली, "आई ही बघ–बोलत नाहीं, बाहेर बघतेय् नुसती–"

हायवेजवर दुतर्फा आकर्षक जाहिराती झळकत असतात. त्यांत अपघात कमी व्हावेत म्हणून सूचना देणाऱ्या व विनंती करणाऱ्या जाहिरातीहि आढळतात. शवपेट्या विकणाऱ्या एकानें हें दोन्हीहि साधून मोठी पाटी लावली आहे. 'आम्ही शवपेट्या बनवतों. पण तुम्ही गाडी नीट चालवा. आम्ही थांबू शकतों !' मला त्यापेक्षां मन हेलावणारी जाहिरात परवां दिसली. एका लहान मुलाची आकृति रेखली होती. तें मूल दोन्ही हात पुढें करून म्हणतं आहे—'बाबा, तुम्ही मला फार आवडतां ! गाडी हळू चालवा–तुम्ही मला हवे आहांत !'

एवढ्या गाड्या ठेवायच्या कुठें ही एक मोठीच समस्या आहे. फार थोड्यांजवळ 'गॅरेज' असतें. बहुतेकांच्या गाड्या रस्त्यावर उभ्या असतात. कचेरींत किंवा बाजारांत जायचें कीं गाडी कुठें उभी करायची हा प्रश्न डोकेदुखी निर्माण करतो. गाडी उभी करून मग बसनें कचेरींत जाणाऱ्यांची संख्या कमी नाहीं. कचेरीजवळ गाडी ठेवण्याबद्दल दरमहा पैसेहि द्यावे लागतात. सरकारच नव्हे तर खाजगी संस्थाहि गाड्या 'पार्क' करण्यासाठीं मोकळ्या जागा ठेवतात व त्यावर मीटर उभे करून गाडी ठेवण्याबद्दल भाडें घेतात. बाजाराजवळ घर बांधण्यापेक्षां मनुष्य जागा मोकळी ठेवून त्यांवर असे पैसेहि कमावतो. अनेक ठिकाणीं असे 'पार्किंग लॉट्स' आहेत. कांहीं ठिकाणीं मोटारी मजल्यामजल्यावर ठेवून देतात. इथें थट्टेनं म्हटलं जातं कीं, अमेरिकन माणूस चर्चमध्यें जातांना दोनदां प्रार्थना करतो. एकदां देवाची व एकदां मोटार ठेवायला जागा मिळावी म्हणून—

●●●

*
*
*
*

# ४ अमेरिकेंतील भारतीय विद्यार्थी

उच्च शिक्षण घेणारा प्रत्येक हिंदी विद्यार्थी एक तर अमेरिकेंत असतो, नाहीं तर अमेरिकेस जाण्याच्या खटपटींत असतो. नव्या दिल्लीच्या कर्झन रोडवरील सतरा नंबरच्या कोठींत जा आणि जॉय सायकेलला विचारुन पाहा. भारतीय विद्यार्थ्यांच्या परदेशास जायच्या धडपडींचीं वर्णनं, शिष्यवृत्त्यांचे अर्ज तपासणारी ती स्त्री तुम्हांस रंगून सांगेल. अमेरिकेंतल्या प्रत्येक विश्वविद्यालयाच्या कचेऱ्या दर हंगामाला अनेक हिंदी विद्यार्थ्यांशीं पत्रव्यवहार करण्यांत गर्क असतात. कॅनडाच्या खालोखाल भारताचेच विद्यार्थी ह्या देशांत शिकायला आले आहेत. बोस्टन २००, शिकागो २००, न्यूयॉर्क २००, विस्कॉन्सिन १५०, कॅलीफोर्निया १५०, इलि–नॉय १०० अशीं जवळजवळ तीनसाडेतीन हजार हिंदी मुलं निरनिराळ्या संस्थांतून शिक्षण घेत आहेत.

बरेचसे भारतीय विद्यार्थी सायन्सचे असतात आणि जवळ जवळ सगळेच अभ्यासांत चांगले ठरतात. सर्वसामान्य हिंदी विद्यार्थी सरळमार्गी, पापभीरु, काटकसरीनें राहणारा, अभ्यास न चुकवणारा म्हणून गणला जातो. चांगल्यापैकीं इंग्लिश बोलतां येतं, हा एक मोठाच फायदा आपल्या मुलांना मिळतो. चिनी, जपानी फार काय कांहीं युरोपीय विद्यार्थ्यांचीहि

इंग्रजी भाषेबद्दलची तिरपिट पाहिली कीं आपल्याला इंग्रजी चांगलं समजतं ह्याचं समाधान वाटतं. इतर परदेशी विद्यार्थ्यांना इंग्रजीची परीक्षा द्यावी लागते. वर्गांत काय चाललं आहे, पुस्तकांत काय लिहिलं आहे, हें कळणं कठीण होतं आणि अखेर अभ्यास अवघड जातो. हिंदी मुलांना ही अडचण भासत नाहीं. उलट अमेरिकन मुलांपेक्षां तो चांगलें बोलतो–लिहूं शकतो. इंग्रजी भाषेची आपल्या देशांत पिछेहाट झाल्यानंतर आपल्या मुलांना परदेशांत उत्तम शिक्षण देणं चांगलंच जड जाणार आहे. इंग्रजी कांहीं म्हटलं तरी आज जगाची भाषा, शास्त्रांची भाषा आहे. जगांत मानाचें पान मिळवतांना आपण इंग्रजीला अडगळींत टाकणार असलों तर आपली फार अडचण होणार. ज्ञानाच्या बाबतींत आपण तहानलेले राहणार. मग राष्ट्राभिमान, मातृभाषा, वगैरेबद्दलचे फायदे कांहींहि असोत—

वरवर सरळ अभ्यासू वाटणाऱ्या आपल्या मुलांना जवळून पाहिलं, अंतरंगांत डोकावलं, कीं खूप गमती दिसतात. सायन्सचा विद्यार्थी म्हणून ताठ्यानें चालणारा मुलगा हा मनांतून अस्वस्थ आहे. कित्येक मुलं इथें शिकायला आलीं आहेत तीं हिंदुस्थानांत कांहीं वर्षें नोकरी करून—अन् अखेर वरिष्ठांशीं भांडून! वरचे अधिकारी नीट वागवीत नाहींत, आम्हीं केलेलं काम स्वतःच्या नांवावर खपवतात, कामापेक्षा इतर उलाढाली करतात व आम्हांला त्यांत ढकलतात, अशा अर्थाच्या ह्या मुलांच्या हकीगती ऐकल्या कीं विचित्र वाटतं. हातातोंडाशीं आलेली डिग्री टाकून कांहीं जण धाडस करून इकडे आले आहेत. कां, तर त्यांचा वरिष्ठ ती डिग्री त्यांना मिळवूं देणार नाहीं, नुसतीं आमिषं दाखवून राबवून घेत राहणार हें त्या मुलांना कळलेलं असतं. ह्यांतला अतिरंजकतेचा भाग वगळला तरी वरिष्ठ व विद्यार्थी ह्यांचे संबंध आपल्या देशांत सलोख्याचे स्नेहभावाचे नाहींत हें जाणवतं व देशाबद्दल एक नवीन चिंता मनांत सलत राहते; कितीतरी विद्यार्थ्यांनीं त्यांच्या अशा कहाण्या सांगितल्या. मोठे गणले जाणारे अधिकारी व संस्थांचीं नांवं सांगितलीं. मत्सर, जातिवाद, राजकारण, नव्या कल्पना व धडपड ह्यांच्याबद्दल बेफिकीरी, स्वतःचें स्थान व महत्त्व ह्याबद्दल स्वार्थ हे पाहिलं कीं अस्वस्थता येते. ह्या पार्श्वभूमीवर, इथले वरिष्ठ व विद्यार्थी यांचे आपुलकीचे संबंध पाहिले कीं, आणिकच दुःख होतं. शिक्षण पूर्ण

करीत असलेले विद्यार्थीहि काळजीनें ग्रासलेले असतात. इतकें शिकलों, पैसे खर्च केले, एक प्रकारची वरची राहणी पाहिली—आतां परत गेल्यावर चांगली नोकरी तरी मिळेल कीं नाहीं ही भीति प्रत्येकाला वाटते आहे. कित्येक मुलं नोकरीची आशा नाहीं म्हणून मायदेशास जायचं पुढें ढकलीत इथें वेळ काढीत आहेत.

परदेशी विद्यार्थ्यांची देखभाल करणारा एक अमेरिकन म्हणाला, कीं बहुधा सरकारी शिष्यवृत्ति घेऊन आलेला विद्यार्थी सुमार बुद्धीचा असतो व इकडच्या शिष्यवृत्त्या अगर नोकरी मिळवून शिकणारा अधिक तल्लख असतो. हें विधान भारतीय विद्यार्थ्यांना विशेष उद्देशून होतं. भारत सरकारच्या, अमेरिकन विद्यापीठांच्या वेगवेगळ्या फौंडेशन्सच्या अनेक प्रकारच्या शिष्यवृत्त्यांतली एखादी पटकावून मुलं इथें येतात. कांहीं घरच्या पैशावर तर कांहीं मिळेल तें काम करून येथें राहात असतात. पैसे जसे व ज्या मार्गानें मिळतात त्याप्रमाणें त्यांचे गट बनतात. खेरीज गुजराथी, पंजाबी, बंगाली वगैरे वगैरे गट पडले जातातच. ' इंडिया असोसिएशन ' सारख्या संस्था काढून हिंदी पद्धतीचीं जेवणें, गांधीजयंति,होळी, स्वातंत्र्यदिन वगैरे साजरे होतात व एखाद्या भगिनीसमाजांत किंवा साहित्यसंस्थेंत भांडणें करावींत तशीं येथें भांडणें करतात. मिश्र मेळाव्यांत आपापल्या भाषेंत बिनदिक्कत गप्पा मारतात. वेळप्रसंगीं अमेरिकनांसमोर एकमेकांच्या जातीबद्दल, प्रांताबद्दल उखाळ्यापाखाळ्या काढायला भीत नाहींत. हिंदुस्थानबद्दल माहिती सांगणारा एखादा अमेरिकन अगर हिंदी विद्यार्थी भाषण करीत असला तर त्याला अडवणारा प्रश्न विचारणारा, हिंदी मुलगा निघतोच ! अभ्यासाइतक्याच आपल्या विचित्र वागणुकीनेंहि भारतीय विद्यार्थी अनेकदां उठून दिसतो.

अमेरिकेंत पाऊल टाकलें की प्रत्येकजण अनेक तऱ्हांनीं गोंधळून जातो. इथें त्याला ' सायकॉलॉजिकल शॉक् ' म्हणतात. अवाढव्य दुकानांतून मांडलेली प्रत्येक आकर्षक वस्तु विकत घ्यावीशी वाटते. आल्याबरोबर हें विकत घ्यायचं वेड कधीं कधीं अनावर होतं. असंख्य मोटारी, दबलेली शांतता व यंत्रासारखी धांवपळ पाहून चक्वा लागतो. पुरुषांच्या बरोबरीनें स्त्रिया हिंडतात, कामें करतात, सिगरेट, दारू पितात, तडफेने बोलतात-चालतात,

ह्यांनीं बहुतेक प्रत्येकजण चकित होतो. उघड्यावरचीं चुंबनं-आलिंगनं पाहिलीं कीं कांहीं चेकाळतात, तर कांहीं चिडतात. भ्रमिष्टासारखीं वागणारीं, अमेरिकनांपेक्षा सवाई वर्तन करणारीं, तर कांहीं कष्टी होऊन, भेदरून परत जाऊं इच्छिणारीं, अशीं कितीतरी भारतीय मुलं इथें भेटतात.

प्रत्येकजण हस्तसामुद्रिक, धर्म व राजकारण ह्यावरचा 'ॲथारिटी' असतो. हिंदुधर्म, सत्तावनचें बंड, पंचवार्षिक योजना ह्यांबद्दल देखील पुरी माहिती बऱ्याच जणांना नसते. हात पाहून भविष्य सांगायच्या युक्तीला आतां फारसं कुणी भुलत नाहींत. अमेरिकन माणूस जात्याच मनमोकळा व आतिथ्यशील. भेट झाली कीं, हिंदुस्थानबद्दल तात्पुरतं तरी कुतूहल दाखवतो. त्यांतून इथल्या लोकांना अमेरिकेबाहेरची माहिती कमी आणि हिंदुस्थानबद्दलच्या कल्पना अजूनहि विचित्र आहेत. आपले इतके विद्यार्थी इथें हिंडतात, शिकतात, पण आपल्या देशाबद्दलचं इथलं अज्ञान अजून फारसं कमी झालेलं नाहीं. एका घरीं पाहुणा म्हणून राहायला जाणार होतों तेव्हांची गोष्ट : मी येणार म्हणून त्या घरचे लोक विशेषतः मुलं, मला भेटायला उत्सुक होतीं. मी त्या घरीं जातांच मात्र त्यांची निराशा झाली. पिसांचा टोप घालून मी येईन अशी त्यांची कल्पना होती. इंडियन म्हणजे अमेरिकेंतला रेड इंडियन एवढेंच त्यांचें ज्ञान होतें !

मी पाहिलं आहे, इथल्या अमेरिकन माणसाशी बोलतांना अथवा संस्थेंत भाषण करतांना भारतीय माणूस फार एकांगीपणानें वागतो. तो एक तर आपल्या देशाची व संस्कृतीची हेटाळणी करीत आपल्याच लोकांना, रूढींना राजकीय प्रवाहांना दोष देईल. आपलींच व्यंगें सांगेल—आणि पाश्चात्य संस्कृतीला, अमेरिकन माणसाला गहिंवरून मिठी मारील. नाहींतर तो आपला अपमान होत आहे, आपल्या संस्कृतीवर आघात होत आहे, ह्या गंडाने कुणी कांहीं विचारतांच तुटून पडेल. कांहीं मुलं इथें येतांच अमेरिकनांसारखे उच्चार व हेल काढून आपलं इंग्रजी बिघडवून घेतात. आपला देश मागासलेला आहे, आपण इथेंच स्थायिक होणार, काय मोक्ष आहे तो अमेरिकेंतच आहे, अशा वृत्तीनें तीं वागतात. कांहीं हिंदी मित्रांसह कळप करून राहतात, कुठे फारशी मिसळत नाहींत. दर घांसागणिक आपल्या घरांतल्या मसालेदार अन्नाची आठवण काढतात. इथल्या लोकांची नीति

रसातळाला गेली आहे, भारतीय संस्कृतीच जगाचा आधार आहे इत्यादि, पल्लेदार भाषण करून भोंवतालच्या लोकांना अस्वस्थ करतात. प्रत्येकजण आपला, आपल्या देशाचा अपमान करायला टपला आहे, अशा संशयी वृत्तीनें वावरतात. ह्या जातींतले बहुतेक लोक संधि सांपडतांच वाटेल ती वाईट गोष्ट करायला मात्र तयार असतात !

मदिरा आणि मदिराक्षी ह्या दोन बिघडण्याच्या महत्त्वाच्या बाबीपैकीं मद्यपानाचा इथें विधिनिषेध नसल्यानें दारू घेतली न घेतली तरी त्याचें कुणाला कांहीं वाटत नाहीं. स्त्रियांबद्दल मात्र अनेक कल्पना बाळगून बहुतेक जण ह्या देशांत येतात. इथें येऊं घातलेल्या एकानें पत्रांतून पहिला प्रश्न विचारला कीं 'स्त्रियांबद्दलची काय परिस्थिति आहे तिकडे ? आमचं कुठं जमवून द्याल का ?' स्त्री–पुरुषसंबंधावर कडक टीका करणाऱ्या एका भारतीय वक्त्यानें आपलं भाषण आटोपतांच 'नाईट क्लब'ची वाट धरली. इकडे स्त्रीस्वातंत्र्य, स्त्री-पुरुष-संबंधाबद्दलच्या कल्पना, ह्यांची योग्य जाणीव न झाल्यानें अनेकजण घोटाळ्यांत पडतात. स्त्रीच्या मोकळ्या वर्तणुकीनें कुणी स्वतःच फसतात, तर कुणी दुसऱ्याला फसवतात. चुंबनादि प्रकार तुम्ही असें उघड्यांवर कां करतां, असं एका हिंदी इसमानें इथल्या परदेशी विद्यार्थ्यांत काम करणाऱ्या स्त्रीस विचारलें. तेव्हां ती म्हणाली कीं 'तुम्ही जे चोरून करतां तें आम्ही उघड्यावर करतों...तुम्ही चारचौघांत सभ्यासारखे वागतां असं वाटतं; पण जरा एकान्त सांपडला कीं तुम्ही लोक एवढे बावचळतां कां ?'

फार थोड्या हिंदी मुली इंकडे शिकायला येतात. पण त्यांत दोन प्रकार आढळतात. एक सभ्यमार्गी, सरळ मनाच्या; दुसऱ्या वहावत जाणाऱ्या, अमेरिकन तरुणींना लाजवतील अशा. अर्थात्, बिघडणाऱ्या मुली फार कमी. बहुतेक मुलींचा जीवनक्रम सरळ व सपाट जातो. कुंकू, साडी, विवाहपद्धति, सती वगैरे विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांनींच बिचाऱ्या हैराण होतात. कुंकू नि साडी यामुळें कौतुकाचा विषयहि होतात.

आपल्या घरीं किंवा प्रयोगशाळेंत मिळाल्या नसतील अशा सुखसोयी इथें मिळतात. पण सगळेच घरच्या ओढीनं अस्वस्थ असतात. 'होम

सिकनेस्' ची साथ सारखी पसरलेली असते. मधून मधून एकेकाला लागण होते व मग दिवसरात्र अभ्यास अगर कांहींच सुचेनासं होतं. कित्येक विद्यार्थी चांगले मोठे असतात. घरदार, बायकापोरें सोडून बारा हजार मैल यायचं हें एक दिव्यच असतं. अमेरिकन कुटुंबांचा प्रेमळ पाहुणचारहि मग अपुरा पडतो.

इथें राहणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांना अमेरिकन विद्यार्थ्यांच्याबरोबर इतर देशांतल्या विद्यार्थ्यांशींहि स्नेह संपादन करण्याची संधि मिळते. आमच्या विस्कॉन्सिन विश्वविद्यालयांत जगांतल्या जवळ जवळ प्रत्येक देशांतून मुलें आलीं आहेत. अलास्का, थायलंड, घाना, कोरिया, निकराग्वे, हांडुरास—कुठून कुठून येथें मुलं येतात. सगळ्याच मोठ्या विद्यापीठांत जगभरचीं मुलं येतात. अनेक देशांबद्दल, त्यांतल्या तरुणांच्या अडचणी व आकांक्षांबद्दल माहिती होते,फिलीपिन्समधील व कोरियांतील मुलं येथें घरजांवयासारखी वागतात. कोरियन मुलांना खूप सवलती व शिष्यवृत्त्या आहेत. त्यांचे लाड चाललेले पाहून दया मात्र येते ! चिनी मुलांची अवस्था चमत्कारिक झाली आहे. लाल चीन व चँग कै शेकच्या ओढाताणीनें हीं मुलं अस्वस्थ आहेत. आफ्रिकेंतला निग्रो, येथल्या निग्रोहून आपण निराळे आहोंत हें दाखवायचा यत्न करतो. अमेरिकनांचे वंशज युरोपांतले ! त्यामुळें नॉर्वेजियन, जर्मन, ब्रिटिश मुलांना येथें भाव आहे. अमेरिकन सोजिरांनीं जपानी युवतीशीं विवाह करावयाचा सपाटा चालवल्यानें जपानी विद्यार्थी मनांतून कष्टी आहेत. मध्यपूर्वेतले, विशेषतः इजिप्त-सीरियाचे विद्यार्थी ताठ मान करून चालतात. सगळ्यांत गडबडगुंडा होतो पाकिस्तानी पोरांचा ! आपण वेगळे आहोंत, हिंदुस्थानशीं आपला संबंध नाहीं असं दाखविण्याची त्यांची केविलवाणी धडपड चालू असते.

ह्याच मेळाव्याबरोबर हिंदुस्थानची वारी करून आलेले अमेरिकन लोक भेटतात. प्राध्यापक, प्रवासी, धर्मप्रचारक व बातमीदार. हिंदुस्थानमध्यें तीनचार वर्षें राहून आपल्या प्रश्नांचा निर्लेप मनानें अभ्यास करून आलेले लोक पाहिले कीं हर्ष वाटतो. आपल्या देशाशीं हे समरस होऊं शकतात ह्याचा अचंबाहि वाटतो ! असे लोक बहुतेक प्राध्यापक असतात. त्यांच्या घरांतून काश्मिरी गालिचे, मिन्याचें काम केलेल्या वस्तु, हस्तिदंताचे किंवा खादीचे

नमुने दिसतात. आपल्याला ते हिंदी पक्वानं करायला सांगतात व आपल्या बरोबर हातांनीं भोजन करतात. ह्या उलट हिंदुस्थानबद्दल विकृत मतं बनवून आलेलेहि भेटतात. तीन दिवस राहून आलेला एक अमेरिकन तज्ज्ञ 'भारत: काल, आज व उद्यां' नांवाचं पुस्तक लिहीत आहे, अशीहि बातमी कळतें. आपल्या देशांतल्या नेमक्या वाईट गोष्टी उचलून फुगवून त्या छापलेल्या बऱ्याच वेळां आढळतात.

परंतु, दुसऱ्या एखाद्या हिंदी विद्यार्थ्याला अगर हिंदुस्थानाला जाऊन आलेल्या अमेरिकनाला भेटण्यापेक्षा खरा आनंद, खरं 'थ्रिल्' इथें स्थायिक झालेल्या भारतीय माणसाला भेटण्यांत आहे. आपले कितीतरी लोक इथें स्थायिक झाले आहेत. कांहींनीं मोठं नांव कमावलं आहे. धन केलं आहे. अमेरिकन जीवनांत हे लोक मिसळून गेले आहेत. ह्या व्यक्ती वेगळ्या उठून दिसणं आतां कठीण आहे. त्यांच्यांत अमेरिकन रक्तहि आतां मिसळत आहे. पण त्यांच्याकडे बघतांना, त्यांच्याशीं बोलतांना भारतीय संस्कृतीची आगळी, ओळखीची मोहक झांक दिसल्यावांचून राहत नाहीं. स्वतंत्र व प्रगत भारताबद्दल त्यांच्या हृदयांत जिव्हाळा आहे, हें उमगलं म्हणजे मन अधिकच हर्षभरित होऊन जातं.

● ● ●

*
*
*
*
*
*

# ५ हिमस्तोत्र

*

निसर्गानें हिंदुस्थानला दिलेली सर्वांत मोठी देणगी म्हणजे हिमालय! भव्य, दिव्य, प्रचंड, उदात्त वगैरे सारीं विशेषणं त्या धवलगिरीसमोर साकार होतात. आपल्या जवळची ती सर्वांत सुंदर व अक्षर वास्तु. आपण मात्र त्याचें सौंदर्य ध्यानांत घेत नाहीं. आपली धांव ताजमहालापुढें !अजंठा वेरूळाभोंवतीं आरामांत हिंडणं आपण पत्करतों. फार तर गंगामाईच्या प्रवाहाचा परिचय करून घेतों. एखादे वेळीं कोणी शेरपा हिमालयाची आठवण करून देतो. एरवीं, वर्षें लोटतात आणि आपण त्या हिममूर्तीला विसरून जातों.......

इथल्या अतिथंड प्रदेशांत वास्तव्य केल्यावर हिमालयाची आठवण होते. हिमालय पाहिला नाहीं, त्याच्या परिसरांत बागडलों नाहीं, ह्याची खंत वाटते. हिमालयाहून जरी खूप छोटे हिमगिरी इथें असते तरी त्यांचं इथल्या लोकांनीं किती कौतुक मांडलं असतं असा विचार येत राहतो. बर्फाच्या टेकाडांतून ह्या लोकांनीं अनेक क्रीडास्थानं नि उत्सव तयार केले आहेत नि आपलें आयुष्य संपन्न व प्रसन्न केलं आहे.

इथें आल्यापासून बर्फ केव्हां पडेल ह्याची मी चातकासारखी वाट पहात होतों. वर्तमानपत्रांतले हवेचे अंदाज वाचीत होतों. जुन्या हिंदी

विद्यार्थ्यांना व नव्या अमेरिकन मित्रांना हिमवर्षावाबद्दल कुतूहलानं विचारीत होतों. बर्फ कधीं पडेल ? निसर्गाची ही अद्‌भुत किमया कधीं पहायला मिळेल ? सगळीकडे अति धवल व थंड झाल्यासारखं दृश्य कसं दिसेल ? हिमवर्षावांतून हिंडतांना काय वाटेल ? हिमसेक असतो तरी कसा ?...

आकाश उघडंबोडकं झालं होतं. कधींतरी अचानक पाऊस पडे व उगाचच्च ओला वारा उधळून जाई. झाडांचे खराटे बनले होते. उरलीं-सुरलीं पानं पटापट गळून पडत होतीं. वाळक्या, पर्णहीन, सडसडीत फांद्या उंचावून झाडांचे सांगाडे कसेबसे उभे होते. येऊं घातलेल्या थंड, जड दिवसांतून वाट काढण्यासाठीं सारा निसर्ग तयारी करीत होता. पक्षांचे कळप धांवत होते व उतरत्या आकाशाच्या पट्ट्यावरून नाहींसे होत होते. धीट खारी नि ससे जमिनीवर पडलेल्या पर्णभारांतून खाद्यपदार्थ धुंडाळीत होते. बर्फ पडण्यापूर्वीं पाचोळा उचलून टाकावा म्हणून लोकांची लगबग चालू होती. मोकळी, हिरवी हवा नि शुभ्र गोठलेलं वातावरण ह्यांमधली विचित्र पोकळी मन अस्वस्थ करीत होती.

निसर्गाचं व मानवाचं अभिजात वैर प्रकट होत होतं. वसंतांत जेव्हां फुलाफळांनीं, हिरव्या शालुशेल्यांनीं नटून निसर्ग मुरकत होता तेव्हां माणसाला कपड्यांचं ओझं झालं होतं. आदि मानवाची अवकळा आणीत तो उघडावाघडा वावरत होता. आणि आतां निसर्ग आपलीं आभरणं टाकून देत होता, तर लहानथोर स्त्री-पुरुष कपड्यावर कपडे चढवीत होते, अंग झांकून घेत होते. पावसाथंडींत, धुक्याच्या व बर्फाच्या वर्षावांत हिंडायला निसर्ग नग्न होत होता आणि माणसं घरादारांत, ऊबदार पांघरुणांत लपत होतीं.

दुकानांच्या दर्शनी कांचांतून बर्फांत घालायचे बूट व कानटोप्या यांचं प्रदर्शन मांडलं गेलं. वरकोटांची विक्री सुरू झाली. चर्चेसमधून उबदार कपडे फुकट वांटायला सुरुवात झाली. वय झालेले जॉन, केनथे, लिओ, मरीअम, लिंडा, मार्गारेट, रॉबर्ट घरामागें पक्षांसाठीं लाकडी घरं ठेवूं लागले नि त्यांत वाळकीं फळं नि कणसं भरूं लागले.

'ये ग ये ग हिमधार—तुला देतों डॉलर—' अशा तऱ्हेचं गाणं म्हणून हिमवर्षावाची आळवणी करावी असें मला सारखं वाटत होतं. कारण बर्फ

अनुक्रमांक २५७२३ दि: ५-१-७१
क्रमांक २५० नों दि: १८-१-७१


कांहीं अजून पडत नव्हता. माझी उत्कंठा शिगेला गेली होती. गरम कपडे, हातमोजे नि वरकोट घालून मी रस्त्यावर येत होतों. घरामागच्या उंचवट्यावर चढून क्षितिजाकडे बघत होतों. उत्तरेकडून थंडीची लाट येईल, अलास्का-कॅनडांतून हिमसेक उधळेल, एस्किमोंचं नृत्य हिमपरागांतून पहायला मिळेल...पण कांहीं घडत नव्हतं. पाचोळा उडत होता, पाऊस पडत होता, दबलेले, शहारलेले, दिवस नुसते जात होते......

अन् मग एका सकाळीं अंथरुणांत डोळे किलकिले करून खिडकीच्या तावदानांतून पाहिलं तों असंख्य कागदाचे तुकडे सर्वत्र उधळतांना दिसले. काल रात्रीं लिहिलेले कागद कुणी फाडून ते उधळले तर नव्हते ? पण ते कागद उशीखालीं सुरक्षित होते. मग एकदम आठवण झाली ती पुण्यांतल्या आमच्या घरासमोरच्या भुताच्या वाड्याची. चित्रशाळेनं तो वाडा साफ करायचं ठरवून उघडला तेव्हां कागदाचे कपटे असेच उधळले गेले होते व त्यांनीं आमची आळी भरून गेली होती. मी दचकून उठलों. डोळ्यांची उघडझांप करीत बाहेरचा पांढरा उजेड पाहूं लागलों. मोठ्या दिव्याभोंवतीं असंख्य पांढरे किडे उलटसुलट फिरत रहावे, तसं त्या कांचेंतून बाहेर पाहतांना वाटलं. पण ते किडे नव्हते. त्यांना आवाज नव्हता. वास नव्हता. वेग नव्हता. हलकेच खालीं गिरक्या घेणारीं लाखों पांढरीं पिसं होतीं तीं. अति मऊ, अति शुभ्र, फार नाजूक नि इवलीशी. मी नीट डोळे उघडून तें पिसांचं नर्तन पहात राहिलों. मला उमगलं होतं कीं ते कागदाचे कपटे, किडे, पिसं कांहीं नसून तो हिमवर्षाव होता. बर्फ पडत होता ! सारं आसमंत बर्फमय होत होतं. आकाशांत गिरक्या घेत, झोके काढीत, असंख्य अति छोटे हिमतुकडे खालीं येत होते. कौलारांवर, झाडांवर, गाड्यांवर, अन् माझ्या मनांत उतरत होते......

हिमवर्षावांतलें सौंदर्य कधीं संपत नाहीं. बर्फ पडत असतांना नुसतं पहात बसलं तरी वेळ कसा जातो हें कळत नाहीं. एकेक हिमपराग न्याहाळीत बसणंहि मोठं गमतीचं असतं. प्रत्येकाचं रूप वेगळं, प्रवास वेगळा. पण तरीहि त्याची बांधणी शास्त्रीय नियमानुसार ठराविक असते. प्रत्येक कपट्यास ठराविक बाजू, ठराविक कोन असतात. बऱ्याचदां अनेक

हिमतंतू एकत्र चिटकून त्यांचे घोस वहात येतात. ते घोस, लोंगर मोठे मोहक दिसतात. खालीं येणारा एखादा लोंगर कसा वहात येईल नि कुठं टपकेल हें सांगतां येत नाहीं. झाडाच्या अगदीं शेंड्याला तो लटकेल व तसाच लोंबकळत राहील. कधीं खालीं कोसळेल नि परत वाऱ्याबरोबर उशी घेऊन अंतराळांत नाहींसा होईल.

माझं मन आनंदानं चिंब झालं अन् मी गरम कपडे चढवून आलों. सणावारी लहान बहिणीनं दारापुढें रांगोळी घालावी, कुशलतेनं नक्षी काढावी नि मग धांदरटपणें रांगोळीची रोळी उपडी करावी तसं दाराशीं, घरासमोर झालं होतं. सारं प्रांगण व समोरचा मार्ग शुभ्र बर्फाच्या जाड थरानं भरला होता. ठुमकत नाचत पऱ्या याव्यात तसे बर्फाचे कपटे हल-केच येऊन पर्णहीन वृक्षांवर, चकचकीत मोटारगाड्यांवर उतरत होते. संथपणें, अविरतपणें. दूरवर तर बर्फाची रेती उधळत होती. जणूं तो कुणी दामाजीपंत आतां पिठाचीं कोठारं उघडून सहस्र हातांनीं धरणीवर पीठ उधळीत होता.

दारांतून रस्त्यावर व रस्त्यांतून टेकडीवर मी वागडूं लागलों. थंडीची जाणीव आजिबात नव्हती. अगदीं टवटवीत व हलकंहलकं वाटत होतं. जमिनीवर पसरलेल्या पांढऱ्या बर्फातून मी पावलं रोवीत चाललों होतों. माझ्या अंगावर बर्फ चिकटत होता व वितळून जात होता. हिमतंतूंचा अभिषेक वरून होत होता. क्षणकाल मला वाटलं कीं मीहि हिमपुंज आहे. आकाशांतून झोका काढून पृथ्वीवरून मजेंत हिंडत आहे. कितीतरी वेळ ह्याच कल्पनेंत, ह्याच नादांत, मी हिंडत राहिलों.

बराचसा बर्फ पडला कीं काळवंडलेले निष्पर्ण वृक्ष पांढरे होतात. पाईन-फरसारखीं कांहीं हिरवीं झाडंहि बर्फानं लवतात व त्यांना गहिरी शोभा येते. पाऊलवाटा, उतरणी, हमरस्ते, खांचखळगे सारे भेदभाव बर्फाच्या थरांत लपतात. सगळं धुतलं जातं. पांढरं पांढरं होतं. दृष्टि टाकावी तिथें पांढरा शुभ्र रंग पसरलेला दिसतो. सारखं पहात राहिलं कीं मनावर वेगळा परिणाम होतो. धांवऱ्या वृत्ती थबकतात. अंतर्मुखता येते. पांढऱ्या रंगाचं व शांततेचं सहकार्य उमगतं. पांढऱ्या रंगाचं मृत्यूशीं कां नातं

जुळवतात तेंहि कळतं. समानता, शांतता, शोक सुचवणारे विचार सोडून उबदार घरांतल्या शेकोटीशीं बसावंसं वाटतं. पेटत्या ज्वाळा, कढत कॉफी व रंगदार संगीत ह्यांची भूक अनावर होते.

बर्फाच्या जाड थरांतून चालायला मौज वाटते. पावलं स्पष्ट उमटतात व ठसे तसेंच राहतात. वाळूंतल्या पावलांसारखा बर्फातल्या पावलांचा संकेत रूढ आहे का ठाऊक नाहीं. पण बर्फात उमटलेले पावलांचे ठसे पाहात राहावंसं वाटतं खरं! घोटाभर अन् गुडघाभर बर्फ झाला तर मात्र चालणं जड जातं. चांगला दळलेला भुसभुशीत बर्फ बराच वेळ राहिला कीं गोठतो नि रस्ता विलक्षण निसरडा होतो. एक एक पाऊल जपून टाकावं लागतं. तरी देखील पहातां पहातां पाय सरकतो व निमिषार्धांत पाठ जमिनीला लागते. पण म्युनिसिपालिटीच्या गाड्या बर्फ खरवडून शक्य तों रस्ते साफ ठेवतात. पुढें प्रचंड ब्रश लावलेल्या गाड्या रस्त्यावरचा बर्फ साफ करूं लागल्या कीं गंमत वाटते. यंत्राला राबवणाऱ्या माणसाचं अधिक कौतुक वाटतं. मोठ्या रस्त्यावर वाळू, भुसा, मीठ वगैरे टाकून निसरडं होऊं नये म्हणून एकसारखी दक्षता घेतली जात असते. आपल्या घरापुढचा, फूट-पाथवरचा बर्फ काढून मार्ग साफ ठेवणं हें तर प्रत्येक घरमालकाचं कर्तव्य असतं. पोरं अशा कामाला एका पायावर तयार. लांब दांड्याचीं फावडीं, खोरीं घेऊन तीं थोड्या पैशांत कुणाच्याहि दारापुढचा बर्फ मजेनं दूर करतात.

पण बहुधा बाळगोपाळ मंडळी बर्फाचे चेंडू बनवून रप्पारप्पी करण्यांतच रमलेलीं असतात. पायापासून डोक्यापर्यंत रंगीबिरंगी गरम कपडे घालून, मोजे घातलेल्या हातांत बर्फचेंडू घेऊन पोरं धांवत धडपडत गल्लीबोळांतून खेळतात. कधीं मग बर्फाचा शिराळशेट करतात. गळ्याला बो, डोक्याला टोपी, तोंडांत चिरूट अशा थाटांत हे बर्फबुवा नाक्या-नाक्यावर दिसतात. अगदीं छोटीं पोरं बर्फात आडवी पडून हातपाय घासतात. उठलं कीं खालीं उरते ती पंख असलेल्या परीची आकृति!

बर्फवृष्टीमुळें घरांत अगर हॉटेलांत मोठी माणसं अडकून पडतात व मद्य किंवा कॉफी घेत वेळ घालवतात. गंमत वाटते ती लोक आईस्क्रीम खातात

त्याची. एवढी हिमवृष्टि चालू असते, पण लोक मजेंत थंड आईस्क्रीम खातात! तें पाहून हिमालयावर आइस्फ्रूटचा कारखाना काढण्याच्या कवि मनमोहनांच्या कल्पनेची आठवण होते.

बर्फवृष्टि चालूच राहते. थंडी वाढत जाते. टेंपरेचर शून्याचे आगेंमागें घोटाळतं. वादळं होऊं लागतात. तळीं गोठतात. मग मात्र मन भयचकित होतं. ह्या थंडीचा, अतिवृष्टीचा कंटाळा येतो. कृत्रिमपणें गरम केलेल्या बंद घरांत बसणं तापदायक होतं. मोटारींचीं यंत्रंहि गोठतात व मोटारी चालू होत नाहींत. ध्रुवाजवळ काय होत असेल, एस्किमो लोकांचं जीवन किती कष्टाचं, कंटाळवाणं व अस्थिर असेल हा विचार मनांत येतो. सूर्यप्रकाश, सुगंधित हवा, हिरवी पालवी, खळाळतं पाणी पहायला जीव आसुसतो...

साऱ्या हिमऋतूभर बर्फ पडतो असं नाहीं. बर्फ पडत नाहीं तेव्हां जास्तच थंडी वाजते. वारे सुटतात तेव्हां तर जीव हैराण होतो. खरं सौख्य बर्फ पडतांनाच असतं. पण बर्फ पडून गेला कीं बऱ्याच वेळां स्वच्छ प्रकाश पडतो. सूर्य दिसतो. हवा गुदगुल्या करते. तरतरी येऊन पावलं घराबाहेर पडतात. केवळ थंडीच्या मोसमासाठीं ठेवलेले नाच नाटकाचे कार्यक्रम टाळून बर्फाच्या आखाड्यांकडे अगर बर्फाच्या डोंगरांकडे जीव ओढ घेतो. गुळगुळीत केलेल्या बर्फाच्या प्रशस्त मैदानावर, पायाला चाकं बांधून स्केटिंग करण्यांत वेगळाच आनंद आहे. तोल सांवरीत एकतानतेनं उलटसुलट फिरतांना शरीराचा कणखरपणा व डौल प्रकट होतो. आईस् स्केटिंग करण्यांत कित्येक स्त्री–पुरुष रंगून जातात. वाद्यांच्या संगतींत, रंगीबेरंगी कपडे घालून शुभ्र बर्फाच्या गुळगुळीत लादीवर कधीं हंसासारखं मंदगतीनं तर कधीं बाणासारखं तळपत्या वेगानं पळत जाण्यांत केवढी मजा आहे! गोठलेल्या तलावांत झाडांच्या फांद्या खोचून रस्ता तयार करतात. त्या मार्गानें माणसं जातात, मोटारीहि जातात. गोठलेल्या जलाशयांत भोंक पाडून गळ टाकायचा व मासे पकडायचे हा तर कित्येकांचा छंद!— खरी मौज, बर्फमय डोंगराच्या शिखरावरून खाली घसरत येण्यांत! असे स्कीईंगचे खेळ बर्फाचे कृत्रिम डोंगर बनवूनहि चालू असतात. पांढऱ्या शुभ्र शिखरावरून पांढऱ्या शुभ्र दरींत तोल सावरीत वेगानें घसरत यायचं म्हणजे जिवावरची परीक्षाच प्रथम वाटते. मग त्या

खेळातलं रहस्य, गोडवा, उमगूं लागतो. त्या छोट्या गौरीशंकर शिखरावर गेलं कीं जग जिंकल्यासारखं वाटतं. जगाहून, सगळ्या मानवाहून मोठं असल्याचा, उच्च असल्याचा आनंद मिळतो. सर्व सुखवासनेहून, मत्सरकु-शंकेहून दूरवर गेल्यासारखं वाटतं व मन निर्भर, मोकळं होतं. उंचावरून वेगानें खोल दरींत येतांना, बर्फाच्या ढिगांत कोसळून उलटंसुलटं पडतांना अहंकार जिरतो. मन मऊ होतं. नीचतेचा अंत उमगतो. सामान्य जीवन अंग माखतं. स्कीईंगच्या खेळांत जननमरणाच्या, उच्चनीचतेच्या, ईश्वर-नश्वराच्या दोन टोकांत आपण असं लीलया झोके घेऊं शकतों....

पण मग ह्या विलक्षण खेळांतला उदात्त आनंदहि लवकरच संपुष्टांत येतो. कपड्यांचं ओझं वाटूं लागतं. अनोळखी पक्षांचा थवा दक्षिण दिशेला दिसतो तिकडे नजर लागते. स्नो, स्नोफॉल्स ह्या शब्दांना बर्फ, हिम, हिमवर्षाव वगैरे प्रतिशब्द बरोबर नाहींत वगैरे चर्चा करावीशी वाटते. योग्य मराठी शब्द सुचण्याऐवजीं 'युक्तिवारिसू' हा शब्द उगाच्च स्मरतो. हिमांतून उगवलेलं हिरवं पातं! हिरव्या अंकुरासाठीं मन आतुरतं. हिरवी पालवी, कोंवळीं पांखरं, उघडीं अंगं, खळाळतं पाणी, तीक्ष्ण सूर्य प्रकाश......

पण हिमपऱ्यांचा नाच सुरूच असतो. बर्फ पडतो व सरावलेलं मन तो ठिपकता मध चाटीतच राहतं.

●●●

* * * * * * *

# ६ दोन कुटुंबें

इलीनॉय संस्थानच्या उत्तर टोकाशीं लॅनार्क म्हणून छोटं टुमदार गांव आहे. लॅनार्कच्या उतरणीवर पाईनची राई आहे. उन्हाळ्यांत ह्या आवारांत लाख फुलं फुलतात व थंडीच्या मोसमांत शुभ्र बर्फानं सगळा आसमंत भरतो. ह्या पाईन्सच्या पलीकडे रसेलचं शेत आहे. एकशें चाळीस एकराच्या सलग शेत जमिनीचा तो धनी आहे. तिथेंच त्याचं घर आहे, अवजारं, गुरंढोरं आहेत.

रसेल हा अमेरिकन शेतकऱ्याचा प्रातिनिधिक नमुना म्हणायला हरकत नाहीं. शेतकरी म्हटल्याबरोबर अशिक्षित, अडाणी, नाडलेला, बिचारा माणूस डोळ्यापुढें येतो तो पार पुसायला हवा. रसेल हा तगडा, हंसतमुख, सुशिक्षित, कष्टास न भिणारा व स्वतंत्र वृत्तीचा आहे. सर्वसाधारण अमेरिकन शेतकरी असाच कष्टाळू, सुसंस्कृत, नव्या गोष्टीचं स्वागत करणारा आहे.

उद्योगधंद्यांचीं वाढ झपाट्यानं होतं आहे आणि शेतकीचं कष्टाळू व काळजीचं जीवन सोडून लोक शहराकडे धाव घेत आहेत. शेत-जमिनी विकण्याच्या किती तरी जाहिराती प्रत्यहीं दिसतात. सारीं दहा टक्के माणसं शेतीवर उपजीविका करीत आहेत व देशाला पुरून खूप उरेल एवढं अन्न-

धान्य पैदा करीत आहेत. अधिक माणसांनीं परत शेतावर रहायला जाणं, अमेरिकेच्या आतांच्या आर्थिक व्यवस्थेंत इष्टहि नाहीं. आहेत त्या लोकां-नींच शेतावर कसं राहावं ह्याची विवंचना सध्या आहे. मोठाले उद्योगधंदे खेडोपाडां हलवायचे व कांहीं कारखाने, शेतकाम बंद असेल तेव्हां सुरू ठेवायचे-असें कांहीं उपाय सध्यां सुचवले जात आहेत.

शेतकी खात्यानं जमिनीची, हवामानाची, देशाच्या आर्थिक व्यवस्थेची वगैरे तपासणी करून ‘ पिकांचे पट्टे ’ ठरवले आहेत. लॅनार्क मक्याच्या पट्टयांत येतं व रसेलला शेतांतल्या बहुतेक सगळ्या जागेंत मका पेरावा लागतो. अमेरिकन असल्यानं तो बंधनाबद्दल खळखळ करतो. वीस एक-रानं आपलं शेत लहान आहे हेंहि एक त्याचं शल्य आहेच. तो म्हणतो कीं शेती, आहे ह्या परिस्थितींत करायची म्हणजे एका माणसाला एकशें साठ एकर जमीन तरी हवी. शेतसारा, धान्याचा धारा, बाजारांत पड-णारा मक्याचा भाव, सगळं सांभाळायचं म्हणजे एवढी जागा हवीच ! ’

आहे त्या १४० एकर जमिनीची मशागत रसेल एकटा करतो. त्याची पत्नी व दोन मुली त्याला मदत करतात. ऐन हंगामांत तो एक माणूस नोक-रीला लावतो व जेवून खाऊन त्याला रोजचें आठ डॉलर्स म्हणजे चाळीस रुपये देतो. मक्याच्या सुधारलेल्या जाती आणायच्या, जमिनीचा कस तपासायचा, कीड व रोग पडूं नये म्हणून औषधं मारायची, योग्य वेळीं पेरणी, कापणी, मळणी करायची ह्यांत तो गर्क असतो. थंडीतहि स्वस्थ बसत नाहीं. ट्रॅक्टर मोकळा करून प्रत्येक भाग साफ करण्यांत, इतर आयुधं नीट करण्यांत, त्याचा वेळ जातो. सगळीं यांत्रिक शेती ! पेरणीपासून धान्य रचण्यापर्यंत सगळ्या गोष्टी यंत्रानं होतात. म्हणून त्याला एकट्याला तें होतं—व एवढी जमीन लागते.

शेतीलाच जोडून रसेलचे गोठे आहेत. सगळ्यांचेच असतात. दुधाच्या गाई, मांसाच्या गाई, डुकरें, मेंढ्या व कोंबड्या. यंत्रानं दूध काढून तें मोठ्या कासंड्यांत भरलं जातं. शेतीच्या फाटकाजवळ, किमान उष्णतामान राखलेल्या छोट्या खोलींत, कासंड्या ठेवल्या जातात. गांवांतलं दूध विकत घेणारी संस्था मोटार पाठवून रोज तें दूध घेऊन जाते. ‘ ऑस्कर मायर्स’

चा माणूस ठराविक वेळीं येतो. गाई, डुकरं, मेंढ्या तपासतो व सौदा करतो. तो खाटीक रसेलला सहसा फसवत नाहीं व शिकागोच्या बाजारा-पर्यंत जायची दगदगहि पडूं देत नाहीं.

सगळा वेळ शेतावर जातो व संध्याकाळीं घरीं येतांच आंघोळ, जेवण करून रसेल रोजचं टपाल पहातो. शेतकी खात्यांतून माहितीपत्रकं आलीं असलीं तर तीं आधाशासारखी वाचतो. संशोधनाची अद्यावत् माहिती असावी अशी त्याला इच्छा असते. रात्रीं शेतकऱ्यांच्या क्लबमध्यें जातो. नाहींतर टेलीव्हिजन बघत बसतो. शेतीच्या आगामी जत्रेचे अगर परिषदेचे विचार घोळवीत झोंपी जातो. सहकारी शेतीची अगर शहरांत स्थलांतर करायचीं स्वप्नं पहातो.

रसेल सुखी आहे कीं नाहीं हें सांगणं कठीण आहे.

कौटुंबिक जीवनांत मात्र तो सुखी दिसतो. त्याची बहीण रूथ वॉशिंग्टन ( डी. सी. ) ला असते. लग्न न करतां ती सामान्य नोकरी करते. पण ती राजधानीच्या गांवीं राहते, ह्याचा त्याला अभिमान आहेसं वाटतं. त्याची पत्नी जर्मन रक्ताची आहे—अन् ह्यांचा बऱ्याच जर्मनवंशीय अमेरिकनां-प्रमाणें तिलाहि अभिमान आहे. मारी फार प्रेमळ व तत्पर गृहिणी आहे. सगळं घरकाम उरकायचं,धारा काढायच्या,नवऱ्याला मदत करायची व मुलांकडेहि बघायचं. पण ती सगळं झपाट्यानं उरकते. अमेरिकन गृहिणी असल्यानं ती रेडियो लावून काम करते. स्वंपाकघरांत एक रेडियो, गोठ्यांत एक रेडियो. मोठें स्कॅप बुक तयार करून त्यांत नाना गोष्टी ती चिकटवत असते. मी मराठींत तिचं नांव लिहून दिलं तो कागदहि तिनं चिकटवून ठेवून दिला. मोठी पॉला, क्लबच्या कामांत गर्क असते. वक्तृत्वाच्या चढाओढींत गुंगते. ग्रेशन पुरुषी आहे. ब्लू जीन घालून व गळ्याला रुमाल बांधून ती शेतांत धांवते. मेंढ्यांकडे बघायचं तिचं काम. आपल्या मित्रमैत्रिणींना वेष घालून, दाढी मिशा लावून तिनें मेंढ्यांच्या कळपात उभं केलं व त्यांचें रंगीत फोटो घेतले. नाताळच्या सणांत त्या फोटोंची खूप विक्री झाली. गांवच्या पोलिसचा लेक तिला सिनेमाला जायला बोलावतो, पण ती जात नाहीं. तिची मेंढी लवकर विणार आहे

म्हणून ती काळजींत आहे. जॉन व छोटा लुईस् कमरेला पिस्तुलं लावतात व सारा वेळ अमेरिकन व इंडियन लढाया खेळतात. जॉन कधीं खरीच बंदुक घेतो व मासे, खारी मारतो.

असं हें छोटं, आनंदी, सरळमार्गी कुटुंब. मोटार, टेलीव्हिजन, फ्रिझ, एनसायक्लोपीडियांनं परिपूर्ण. आपल्या इवल्याशा परिघांत परीकथेसारखं वाटणारं. रूथ आली व वॉशिंग्टनबद्दल सांगूं लागली कीं तेवढंच नावीन्य. एरवी बर्फ व मका, मेंढ्या व फोर. एच., ह्यांनींच सगळ्यांचे दिवस व्यापलेले—

कित्येक वर्षांनीं रसेलच्या घरांत वेगळी घटना घडली. थँक्स गिव्हिंगच्या सणाला परदेशचा पाहुणा आणावा म्हणून त्यांची किती वर्षं तरी खटपट होती. परमेश्वरानं भरपूर पीक दिलं—त्याचे आभार मानण्यासाठीं दुसऱ्या भूमीचा पुत्र आणून त्याचं आदरातिथ्य करायची पद्धत ! कित्येक प्रयत्नांनीं अखेर पुण्याचा एक विद्यार्थी त्या घरांत आला व दोन दिवस राहून गेला... पृथ्वीवर भारत म्हणून जर्मनीपेक्षां जुना व मोठा देश आहे. तिथला शेतकरी आपल्या मानानं फार गरीब आहे. त्याच्या मालकीची डॉज मोटार जाऊं दे, पण तो मोटारमध्येंसुद्धां बसलेला नाहीं, ज्या गाई आपण रोज खातों त्या गाईला तिथें पूज्य मानतात ह्या साऱ्याच ज्ञानानं सगळं कुटुंब गलबलून गेलं आहे.

× × ×

बेट्झर कुटुंबाचा नि माझा पूर्वजन्मींचा ऋणानुबंध म्हणून मी त्यांचे घरांत पाऊल टाकलं.नाहींतर मी मॅडीसन सोडून जाणार नव्हतों. गेलों तरी त्या गांवीं जाणार नव्हतों. तिथंहि दुसऱ्याच घरीं मला राहायचं होतं. पण मी नाताळांतल्या एका शुक्रवारीं उठलों व डेलावनला गेलों. आगाऊ ठरलं नव्हतं, पण अचानक मिसेस् बेट्झर तिथं आली व मला घेऊन घरीं गेली.

डेलावन हें गांव मोठं लाघट आहे. पांच सहा हजारांची विखुरलेली वस्ती. बहुतेक नॉर्वेजिअन्स व प्रशियन्स. जेन्सविलसारखं पार्कर पेन कंपनीचे व शेव्हरोलेट मोटर कंपनीचे कारखाने असलेलं गांव एका हाताला तर दुसऱ्या हाताला लेकलॉन नांवाचा रम्य तलाव व त्या कांठची झोपड्या—

होटेलं—क्रीडागृहांची वस्ती. फर, मेपल व पाईन वृक्षांच्या रांगांनीं डेलावन–जेन्सविल—लेकलॉनचे मार्ग शोभिवंत केले आहेत.

"तुला हें कळायला हवं कीं, तुला इथं पाहुणा म्हणून आणलं नाहीं–तूं ह्या घरांतलाच आहेस–" मार्जोरी बेट्झरनं मला सांगितलं व माझी खोली दाखवली. अमेरिकनांच्या आदरातिथ्यानं व आपुलकीनं मी अनेक वेळां आश्चर्यचकित झालों होतों. पाहतां पाहतां हे लोक तुमचे मित्र बनून जातात. विस्कॉन्सिस-मिनेसोटा-इलीनॉय-आघोवा संस्थानं तर प्रेमळ व सरळ लोकांबद्दल प्रसिद्ध आहेत. तरी पण इतकं आदर्श घर व मनमोकळं स्वागत मी पाहिलं नव्हतं. माझ्या खोलीच्या दारांत एक चार वर्षांची छोटी पोर मला आपादमस्तक न्याहाळीत होती. "कॉनी, तुझी खोली ह्याला द्यायची ना?" मार्जोरीनं तिला विचारलं व माझी बॅग खोलींत ठेवली. कॉनीच्या त्या छोट्या खोलींत चार-पांच बाहुल्या होत्या. त्या लहानशा खेळांतल्या पलंगावर झोपल्या होत्या. बाकी सगळी खोली माझ्यासाठीं सज्ज केली होती.

कॉनीची व माझी लवकरच मैत्री झाली. माझ्या नांवाचा ती 'इलवीन-इलवीन' असा बोबडा उच्चार करी. दिवाणखान्यांतल्या ख्रिस्तमस ट्री खालीं ठेवलेल्या भेट म्हणून आलेल्या वस्तू तिनं मला दाखवल्या. सांताक्लॉजनं तिला सयामी मांजर आणून दिलं होतं, त्याच्याशींच मग ती खेळूं लागली.

मार्जोरी सैंपाक करीत माझ्याशीं गप्पा मारीत होती. हिंदुस्थानाबद्दल तिला बरीच माहिती होती व हिंदुधर्माबद्दल खूप कुतूहल होतं. बॅप्टिस्ट चर्चचा स्त्री-विभाग ती सांभाळीत होती, गांवांतल्या तीन चार संस्थांची ती सेक्रेटरी होती व विणकाम करण्यांत ती बराच वेळ घालवी. सगळा दिवस तिनं स्वतःला कसं गुंतवून टाकलं होतं.

थोड्याच वेळांत मिस्टर बेट्झर आला. मोठा मुलगा पीटर हाहि आला, अन् आम्ही सगळेच गप्पांत रंगून गेलों. बेट्झरचा फर्निचरचा धंदा होता डेल कॉर्नेजचे कोर्सेस तो डेलावन व बाहेरगांवीं शिकवत असे. बायकोहून तो वर्षानं लहानच होता, पण अधिक गंभीर वाटत होता. कॅडीलॅक गाडी

टेंवणारा हा गृहस्थ चांगला यशस्वी व प्रतिष्ठित असावा. गांवांत त्याला मानहि बराच होता. बेट्झर कुटुंबच त्या गांवचं भूषण मानलं जात होतं.

पीटर मॅट्रीकमध्यें अजून जायचा होता. उंच, सडसडीत, करड्या आवाजाचा तो मुलगा तीक्ष्ण जिभेचा होता. लहान रॅकेट्स करून उडवायचं त्याला वेडच जडलं होतं. अमेरिका रॅकेट्समध्यें मागं आहे हें त्याच्या वाढाळू मनाला बोंचत होतं. वारंवार तो फोनशीं जाई व सारखा मित्रांशीं बोलत राही. मार्जोरी म्हणाली, " इथल्या वाढाळू मुलांत इतर अनेक गोष्टींबरोबर फोनवर उगाच बोलत बसायचं वेड जडतं. कांहीं मुलं तर फोनला एक्स्टेंशन घेऊन आपल्या खोलींत वेगळा फोन नेतात व तासतास बोलत बिछान्यांत पडून राहतात. " पीटर मुलींबद्दल फारसं कुतूहल दाखवीत नाहीं ह्याबद्दल मात्र ती माउली विवंचना करीत होती. बेट्झर म्हणाला, " मी त्याला लैंगिक विषयावर पुस्तक आणून दिलं-पण त्यानं धड वांचलंहि नाहीं. ठीक आहे तो सध्यां रॅकेट्स उडवतो आहे तें—"

बॉबी उशीरा आला. बारा वर्षांचा मुलगा उशीरा येतो व एकटा जेवतो, हें मला कसंसंच वाटलं. पण इथें सगळेच स्वतंत्र व आपापलं बघणारं. बॉबी पेपरविक्याचं काम करी. सत्तर वर्तमानपत्रं वांटून तो घरीं आला व पैसे मोजत बसला. कॅडीलॅक ठेवणाऱ्या बापाच्या पोरानं वर्तमानपत्रं वांटावीं ह्यांत कुणाला वांकडं वाटत नव्हतं. बॉबी पैसे कमवायला शिकतो ह्याचा अभिमानच प्रत्येकाला होता. जमलेल्या पैशांतून छोटीशी होडी घ्यायचा बॉबीचा बेत होता. नाताळनिमित्त आईवडिलांना व भावंडांना भेटी देण्यांत बरंच द्रव्य गेल्यानं तो तीनतीनदां हिशेब मांडीत होता.

तळघरांत बिलीयर्डवजा खेळ खेळायचं 'पूल' चं टेबल होतं. दिवाणखान्यांत रंगीत टेलिव्हिजन होतं. तिसऱ्या मजल्यावर मोठं ग्रंथालय होतं. मुव्ही कॅमेऱ्यानं बेट्झर फिल्म घेत होता व वॉशिंग मशीनमध्यें मार्जोरी आठवड्याचे कपडे धूत होती...मी कॉनीशीं खेळत होतों. डेल कार्नेजच्या वह्या चाळीत होतों. मार्जोरीला शिवाजी, झांशीची राणी नि असलंच कांहीं सांगत होतों. बॉबी पीटरबरोबर पूल गेम खेळत होतों...सगळेच

एकत्र बसून टेलिव्हिजनवर एड् मरोचे कार्यक्रम पहात होतों...वेळ जात होता, दिवस जात होते, माझा पाय त्या घरांतून हालत नव्हता...

वरच्याच थरांतलं, सुखवस्तु व सुशिक्षित बेट्झर कुटुंब मग माझ्याच मनांत घर करून राहिलं. जीवनांतले सगळे चांगले क्षण टिपण्याची त्यांची धडपड चालली होती. अमेरिकन आयुष्यक्रमांतली पोकळी त्या फर्निचर-विक्याला उमगली होती. चर्चचं काम करणारी ती गृहिणी पुनर्जन्माची कल्पना पचवण्याचा प्रयत्न करीत होती. गर्द हिरव्या पाईनच्या खांदीवर शुभ्र कोवळा बर्फ पसरलेला असावा तशी त्याच्या प्रतिष्ठित जीवनांवर सुविचारांची पुटं पसरलीं होतीं. जगांतलं अपरिचित पहायला व जीवनाच्या कक्षा ओळखायला त्या पति-पत्नींची नव्हे, तर सर्व घराची धडपड चालू होती...

कधीं तरी घरची आठवण तीव्रतेनं होते. माझ्या छोट्या मुलीचा चेहरा नजरेसमोर तरळत राहतो. मग मी उठतों व डेलावनची वाट धरतों. बॉबीची सायकल रस्त्यांत भेटते. पीटर पूलचा डाव मांडतो. मार्जोरी मी येतांच शिजणाऱ्या अन्नांत मसाले टाकायला धांवते आणि मांजराला नि बाहुलीला टाकून, कॉनी माझ्या नांवाचा बोबडा उच्चार करीत मला मिठी मारते.

●●●

## ७ डेटिंग

स्त्री-पुरुषांनीं एकमेकांशीं कसं वागावं, तरुणतरुणींचे संबंध कसे असावेत, विवाह कुणीं व कसे ठरवावेत, ह्याबद्दलचीं ठाम मतं कोठल्याहि काळांत अगर देशांत विचारवंतांना निश्चयपूर्वक सांगतां आलीं नसतील. तरुणतरुणींच्या शरीराच्या व मनाच्याहि वाढत्या आकांक्षांना कसा आकार द्यावा, त्यांतून सुडौल व स्थिर कुटुंबपद्धति कशी निर्माण करावी व समाजाची सर्वसाधारण घडी बिघडवूं देऊं नये म्हणून अनेक कल्पना मांडल्या जातात व प्रयोगहि चालू असतात. तरुणपिढीला स्वातंत्र्य व शिक्षण जास्त मिळूं लागतं तेथे हे प्रयोग अधिकच चालतात. काळाच्या ओघांत मग असा एखादा समाज प्रवाहपतित होतो. कुटुंबपद्धतीला धक्के बसतात. नीतीच्या कल्पना बदलत राहतात. स्त्री-पुरुषांनीं एकमेकांशीं कसं वागावं ह्याची परिमाणं पाऱ्यासारखीं ठरतात. अनुरूप वधूवर कुणी निवडावे-ग्रहांनीं, वडीलधाऱ्यांनीं कीं स्वतः तरुणांनीं, कीं सर्वांनीं मिळून-ह्याची भवति न भवति चालते. पडदा-पद्धति बरी वाटते नि स्वैरसंचार-हि सुरू होतो...आपल्या वेगानं पालटत जाणाऱ्या समाजांत अशी कांहींशी परिस्थिति उद्भवली आहे. पूर्वींचे बालविवाह बरे वाटूं लागले आहेत. प्रौढविवाह अधिकच मान्य होऊं लागले आहेत. स्वयंवर मंडळांची

कल्पना मध्यें कांही प्राध्यापकांनीं मांडली होती. आणि वधूवरसूचक मंडळं तर भरभराटींत चालू आहेत. मुली शिकतात–पण मुलांशीं मोकळेपणीं मिसळत नाहींत, अशाहि तक्रारी आहेत. ह्या सर्व गोंधळांत समाजाला नीट आकार येत नाहीं. नवी कल्पना, नवी पद्धति मूळ धरीत नाहीं.

अमेरिकेंत वधूवरांची निवड कशी होते, वाढालू मुलं-मुली एकमेकांशीं कसं वागतात हें अशा स्थितींत पाहाणं कांहींसं उद्‌बोधक व बरंचसं मनोरंजक ठरेल. युरोपांतल्या बहुतेक प्रत्येक देशांतून आलेल्या निर्वासितांच्या संकरानं इथला समाज बनला आहे. नवथर, धाडसी, स्वातंत्र्यप्रिय लोभी, चैनीस चटावलेला, कुटुंबव्यवस्था मानणारा. आदर्शांचा व प्रगतीचाहि पाठपुरावा करणारा. अनेक बऱ्यावाईट मूल्यांचं गाठोडं घेऊन जगणारा ! प्रथमपासूनच स्त्रीला इथं महत्त्वाचं स्थान आहे. स्त्रीला ज्या प्रमाणांत मान असतो, स्वातंत्र्य मिळतं, त्या प्रमाणांत त्या समाजांतील नीति टिकून राहते. अमेरिकन स्त्री बहुतेक बाबतींत पुरुषांची बरोबरी करते. घरांत मुलगा-मुलगी असा भेदभाव करून वागवलं जात नाहीं. शाळेंतहि मुलं-मुली सर्रास एकत्र शिकतात, खेळतात. सहशिक्षण पूर्णपणं दिलं जातं. नोकरी मिळण्याची स्त्रीला अडचण पडत नाहीं. तिचं रूप, तिचं नातंगोतं, तिचा नवरा अथवा तिचं गर्भारपणहि नोकरीच्या आड येत नाहीं. ह्या देशांत नोकऱ्यांना तोटा नाहीं व कित्येक ठिकाणीं केवळ स्त्रियाच कामावर असलेल्या दिसतात. सहशिक्षण व आर्थिक स्वातंत्र्य ह्यामुळें इथली स्त्री आपल्याकडच्या स्त्रीपेक्षां अगदीं वेगळी दिसते. पूर्णविकसित, निर्भय अन् तरीहि अस्वस्थ व थोडं स्त्रीत्व हरवलेली !

तारुण्यांत इतकं स्वातंत्र्य मिळत असूनहि स्वैराचारापेक्षां विवाह ठरविण्याकडे एकंदर प्रवृत्ति दिसून येते. लग्नसंस्थेला खूपच मानलं जातं व घटस्फोट कांहीं चांगला म्हटला जात नाहीं. गाजावाजा केला जातो तितका घटस्फोट सवंग दिसत नाहीं. घटस्फोट मिळणं फार सुलभ आहे एवढंच. लहानमोठे भेदभाव वा संकटं विसरून वर टिकवण्याची धडपड करणारीं कुटुंबं कितीतरी आढळतात. इथल्या समाजरचनेमुळें आयुष्यांतल्या आडाख्यांत अयशस्वी झालेली माणसं फार बिघडूं शकतात; पण मिळणाऱ्या

संधीचा फायदा घेऊन अनुरूप सवंगडी शोधणाऱ्या व सुखी संसार थाटणाऱ्या व्यक्ती आदर्शाप्रत पोंचू शकतात.

ह्या खंडप्राय देशांत मोठालीं शहरं हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच आहेत. अशा शहरांत व औद्योगिक केंद्रांवर स्वैराचाराला ऊत येतो. नोकरीसाठीं व एकट्या राहणाऱ्या तरुणतरुणींना धांवपळीचं व द्रव्याच्या उलाढालीचं आयुष्य अनेक लोभनं दाखवितं. हा स्वैराचार हॉलीवुडपर्यंत पोचतो व दुप्पट उशी घेऊन परत शहरांत घुसतो. मग विखुरलेल्या, शांत खेड्यांत ठिपकतो. लहान गांवांतली जनता स्थितप्रज्ञ, कळप करून राहणारी, अफवांची आवड असलेली व अफवांना भिणारी, आपल्या पोरां-पोरींना लवकर उजवणारी आहे. अशा गांवांतून क्वचित् 'सांगून येण्याचे' व लग्न ठरविण्याचे प्रकारहि घडतात.आपल्या गांवांतल्या शाळेंत शिकून तिथंच कुठं तरी नोकरी करणारा मुलगा जवळचीच कुणी मुलगी आपली पत्नी व्हावी म्हणून इच्छा करतो, अन् पुढचा बनाव आई-बाप घडवतात. कित्येकदां आई-बापच आपल्याला आवडलेली मुलगी तीनतीनदां घरीं बोलावून मुलाच्या पुढें करतात. अशीं 'अरेंज्ड मॅरेजेस' खेडयांतून कांहीं कमी आढळत नाहींत.

इथंहि वधूवरसूचक मंडळं भरभराटींत चालतात. 'हेल्थ कंपनी', 'फ्रेंडस् सर्कल' 'हॅपिनेस' वगैरे नांवांनीं न्यूयॉर्क, शिकागोला व कॅलिफोर्नियांत अशी मंडळं मोठ्या उलाढाली करतात. हेल्थ कंपनीच्या शिकागोच्या कचेरींत गेलांत तर रूथ ब्लेअर ही व्यवस्थापक स्त्री अनेक जोड्या जमवीत बसलेली तुम्हांला आढळेल. न्यूयॉर्कच्या 'फ्रेंड्स'नं गेल्या वर्षी चारशे विवाह जुळवून दिले. प्रवेश फी भरून सभासद होणं, माहितीपत्रकं भरणं, फोटो देणं वगैरे आपल्याकडच्या वधूवरसूचक मंडळांसारखा व्यवहार इथं चालतो. अर्थात् इथल्या परिस्थितीप्रमाणें बऱ्याच गोष्टी भडकपणें केल्या जातात. तुम्ही पुरुष असाल तर अनेक स्त्रियांची वर्णनपर यादी तुम्हांला मिळते. स्त्रीची उंची, वजन, केसांचा व डोळ्यांचा रंग, आवडीनिवडी, अपेक्षा, सिगारेट ओढणाराच नवरा हवा इथपासून 'मी एकाकी आहे, तीनशें एकर शेत व तीस हजार डॉलर्सची मी मालकीण आहे; पण जन्माचा जोडीदार मला अजून सांपडत नाहीं–' इथपर्यंत–पुरुषांचीं वर्णनं

अशीच स्त्रियांना पोंचवलीं जातात. पत्ते पुरवले जातात. मग पत्रव्यवहार, गांठीभेटी वगैरे तुमच्यावर सोपवलं जातं. दिलेल्या यादींत कुणीच पसंतीस आलं नाहीं तरी पैसे भरून दुसरी यादी मिळते. बहुतेक घटस्फोटित, वयस्क, वृद्ध, खेड्यांतून शहरांत स्थलांतर करूं इच्छिणारे, तर कांहीं खरोखरच स्वभाव-दोषानं सहचर मिळवूं न शकलेले लोक ह्या मंडळामार्फत स्वयंवर आरंभतात.

परंतु हीं मंडळं किंवा वर उल्लेखिलेलीं अॅरेंज्ड् मॅरेजेस् यांपेक्षां सर्व-सामान्य पद्धत म्हणजे 'डेटिंग'ची. डेटिंगचा प्रकार सगळीकडे सर्रास आढळतो व डेटिंग हें लग्न ठरविण्यासाठीं म्हणूनच केलं गेलं नाहीं तरी बहुतेक वेळेस त्यामागचा हेतु सवंगडी शोधण्याचाच असतो.

डेटिंगच्या पद्धतींत काटेकोर नियम नाहींत. पण कांहीं अलिखित संकेत जरूर आहेत. तरुण मुलगा मुलीला आधीं ठरवून ठराविक दिवशीं भेटतो हीच थोडक्यांत डेटिंगची पद्धत. मुलाखतीची वेळ, वार, तारीख ठरविली, जाते, म्हणून त्यांस डेटिंग म्हणायचं. साधारणपणें शुक्रवारीं अगर शनि-वारीं संध्याकाळनंतर ह्या भेटी-गांठी झडतात. हें डेटिंग ओळखी दृढ करण्यास व संध्याकाळ व पूर्वरात्र एकमेकांच्या संगतींत मजेनं घालवण्यासाठीं असतें. भेटीचेहि खूप प्रकार असतात. कॉफी डेट, स्टडी डेट, मूव्ही डेट, डान्सिंग डेट—तरुण मेंदूतून जेवढे प्रकार निघतील, तेवढे ! उपहारगृहांत कॉफी पीत तो आणि ती अनेक विषयांवर गंमतीनें वा गंभीरपणें बोलतात; एकमेकांचा स्वभाव समजून घेतात. एका बैठकींत स्वभाव समजतात असं नाहीं. पण अशा मुलाखती वारंवार होऊं शकतात व एकमेकांच्या आवडी निवडी कळूं शकतात. बऱ्याचदां एकमेकांत समान आवडी नाहींत हें उम-गतं, दुसऱ्याचे दोष चटकन् जाणवतात व कॉफीचा एकत्र पेला घेण्यांत स्वारस्य उरत नाहीं. कॉलेजांतली आपल्या वर्गांतलीच किंवा खालच्या वर्गांतली ओळखीची पोरगी घेऊन ग्रंथालयांत अभ्यास करीत कित्येक मुलंमुली बसतात. मुलीचं चिंतन करीत एकस्थानं पुस्तकाचीं पानं उलट-ण्यांत जेवढा अभ्यास होतो, तेवढाच मुलीला जवळ बसवून होतो. पण अभ्यासू वृत्ति, परीक्षेंतले मिळणारे मार्क वगैरे सर्व कसाला लागतं, व मुलीला आपल्याबद्दल वाटणारा आदरभाव वाढवून घ्यावयाचा असेल तर खराच अभ्यास करावा लागतो. विशेष सलगी असणारे तरुण, तरुणींना

घेऊन चित्रपट, नाटक पाहायला, नृत्य करायला, सहल करायला जातात. एकमेकांबद्दल अधिक आकर्षण निर्माण झालें तर डेट उत्तर रात्रीपर्यंत रंगत राहते.

मुलांनीं डेट घेणं, तसंच मुलीला डेटबद्दल विचारलं जाणं हें मानाचं व तितकंच आवश्यक असं मानलं जातं. सुंदर, तरतरीत, हुशार मुलीला मागणी अर्थात् अधिक असते. कित्येक मुलं तिच्या भेटीची इच्छा धरतात. तिनं दुसऱ्याला होकार देण्याआधीं तिला विचारण्यासाठीं धडपडतात. सोमवार मंगळवारींच तिच्याशीं शुक्रवार किंवा शनिवारची बोली करतात. बुधवार गुरुवारनंतर डेट मिळणें हें मुलीहि कमीपणाचं मानतात. एखाद्या आठवड्याला डेट नसली तर मुली दुःखी होतात. आपल्यांत कांहीं उणं आहे अशा भावनेनं झुरतात. सार्वजनिक समारंभांत मुद्दाम भाग घेऊन मुलांच्या पुढें पुढें करतात.

डेटिंग मोठ्या प्रमाणावर कॉलेजं, विश्वविद्यालयं, शहरं ह्यांतून चालू असतं. लहान गांवांतहि असतंच; पण मुलं व मुली ठराविक व प्रथमपासून परिचयाची असल्यानं जोड्या न कळत जमल्या जातात. घरोघरीं टेलीफोन असल्यानं फोनवरून मुलगा मुलीला विचारणा करतो, 'शुक्रवारी संध्याकाळीं तुला सवड आहे का...कधीं वेळ मोकळा आहे..'वगैरे-सुशिक्षित आर्जव व नराचा तोरा-ह्यांचं मिश्रण करून विचारतो. मुलीला त्याचा सहवास नको असेल तर ती गोड पण योग्य शद्बांत बोळवण करते. डेट ठरली कीं ज्या दिवशीं मुलाखत असेल त्या दिवशीं व विशेषतः तिच्याकडे जाण्याआधीं तास दोन तास तिला स्मरण म्हणून फोन करणं आवश्यक मानतात. मुलगा मुलीकडे-तिच्या घरीं, अगर ती एकटी रहात असेल तर खोलीवर जातो व दोघं जोडीनं बाहेर पडतात. बसमध्यें, गार्डींत, उपाहारगृहांत, थिएटरांत तो तिला दार उघडून देतो व तिच्या पाठोपाठ आंत प्रवेश करतो. आपल्या 'डेट'चा वरकोट उतरवणं, चढवणें हें पुरुषाचें काम. पैसे देणें अर्थातच पुरुष करतो. समानतेच्या राज्यांत प्रणयराधनेच्या प्रसंगीं मात्र पुरुष वेगळा, स्त्रीचा सांभाळकर्ता म्हणून वागतो !

एकेकटा मुलगा–मुलगी जाण्याऐवजीं दोन-तीन मित्र आपापल्या मैत्रिणींना सिनेमाला सहलीला घेऊन जातात व असे 'डबल डेटिंग' चे प्रकार पुष्कळदां आढळतात. कित्येकदां एखादा तरुण, आपल्या मित्रासाठीं मुलगी घेऊन यायला आपल्या डेटला सांगतो. ती मित्र न मिळालेल्या आपल्या सखीला घेऊन येते व अशा रीतीने जोडी जमूं शकते. कुणाशींच ओळख नसलेला एखादा 'सदाशिव', मुलींच्या वसतिगृहाच्या मेट्रनला फोन करून स्वतःची माहिती सांगतो व डेट नसल्यानं घरींच असलेल्या एखादीचा परिचय साधतो. अशा आंधळ्या शिवाशिवींतून ('ब्लाईंड डेटिंग') कांहीं चांगले परिचय होऊं शकतात.

आपल्या मुलां-मुलींनीं डेटिंग करावं, त्यांसाठीं आईबापहि यत्न करतात. वाढदिवस, नाताळ वगैरे सणासमारंभाला ओळखींतल्या तरुण मुला-मुलींना घरीं बोलावतात व आपल्या मुला-मुलींशीं त्यांची गांठ घालून देतात. तरुण वर्गासाठीं असलेल्या संस्थांत मुलांचीं नांवं घालतात, त्यांना नृत्य शिकवतात. नव्या ओळखी होण्याचं चर्च हें मोक्याचं ठिकाण! चर्चमध्यें तरुणांसाठीं कार्यक्रम केले जातात. आपलीं मुलं शुक्रवार–शनिवार नि सुट्टीच्या दिवशीं घरीं बसलीं तर वडिलधाऱ्यांनाहि विचित्र वाटतं. मुलं वयांत आलीं तरी डेटिंग करीत नाहींत हें विकृतीचं लक्षण मानलं जातं.

लारसन कुटुंबांशीं माझा बराच परिचय झाला होता. त्यांच्या घरीं एका शुक्रवारीं रात्रीं दहा वाजेपर्यंत मी गप्पा मारीत बसलों होतो. कुटुंबांतल्या दोन्ही मुली, मोठी लॉरी व धाकटी नॅन्सी, नव्हत्या. लारसनबाईनं मला कौतुकानं सांगितलं कीं नॅन्सीला परवा चौदावें वर्ष लागलें व ती आज प्रथमच एका मित्राबरोबर सिनेमाला गेली आहे. लहान नॅन्सी एका पोराबरोबर पांच मैल दूर असलेल्या थिएटरला गेली आहे व रात्रींचे दहा वाजले तरी आली नाहीं ह्याची मलाच काळजी वाटली. पण ती माउली मोठी खुशींत होती. साडेदहाला लॉरा आपल्या मित्राबरोबर फिरून परत आली. लारसनबाई मला एकीकडे म्हणाली, 'कसा वाटतो माईक?—लॉरी त्याच्याबरोबर 'स्टेडी' जातेय म्हणून विचारलं— एखादा मुलगा व मुलगी एकमेकांवर अनुरक्त होऊं लागली म्हणजे इतरांबरोबर जात नाहींत; एकमेकांच्या सहवासांतच वेळ घालवतात. हें स्टेडी जाणं! त्यांतून पुढें

प्रीति निर्माण होते, विवाह जुळतो. डेटिंगमध्यें, 'स्टेडी' जाण्यांत आई-बाप प्रत्यक्ष भाग घेत नाहींत—मुलांच्या. आवडीनिवडीवर, अंदाजावर सोपवतात. सगळ्यांनाच स्वातंत्र्य—त्यामुळें कुणी कुणाला अडवूं शकत नाहीं. नॅन्सी तोंवर आली नाहीं म्हणून श्रीयुत लारसननें पत्नीला विचारलं, "तिला मॅडमनी दिला आहेस नं ?" मुलगा वेडावांकडा वागायला लागला तर त्याला टाळून घरीं येतां यावं, म्हणून मुलीजवळ थोडे पैसे देऊन ठेवतात. त्यास कां कोण जाणं, पण मॅडमनी म्हणतात. ह्या सर्व खेळांत स्त्रीवरच बरंचसं अवलंबून असतं; दिलेल्या स्वातंत्र्याचा व उभारलेल्या कुटुंबव्यवस्थेचा मान ठेवणं—न ठेवणं स्त्रीच्या हातीं असतं.

नॅन्सी उशिरानं आली. वाटेंत कॉफी घ्यायला ती सवंगड्यासह थांबली होती. मुलानं मुलीला परत घरीं आणून सोडायचं हा एक आवश्यक उपचार! नॅन्सी विशेष खुशींत नव्हती. तिच्या लिपस्टिकचा रंगहि तसाच होता. अजून तारुण्याचीं स्वप्नं तिच्यापुढें पुरीं उमटलीं नसतील. कदाचित् त्या पोरांत तिला स्वारस्य वाटलं नसेल. हिंडायला गेलेल्या पहिल्याच पोरांवर खूष होणं तिला कमीपणाचं वाटत असेल. डेटिंगची अखेर बऱ्याच वेळेला चुंबनानं होते; 'गुडबाय् किस्'! —चुंबन ही सहज, चटकन् नी विपुल मिळणारी गोष्ट आहे—' असं एका कॉलेज मासिकांत लिहिलं होतं; आपल्याला प्रिय वाटणाऱ्या कुठल्याहि व्यक्तीचं चुंबन वाटेल तिथे घेतलं जातं. त्यामुळें गहिरी चांदरात एकमेकांच्या सहवासांत घालवल्यावर त्याचा पूर्णविराम चुंबनानं करणं क्रमप्राप्त होतं. चुंबन देणं न देणं, दिलं तर गालाचं देणं की ओठाचं देणं, हेंहि अर्थात् स्त्रीवरच अवलंबून असतं.

इतकं स्वातंत्र्य व डेटिंगची पद्धति अस्तित्वांत असूनहि कित्येक स्त्रीपुरुष बराच काळ अविवाहित राहतात, ह्याचं सकृद्दर्शनी आश्चर्य वाटतं. डेटिंगच्या पद्धतींत चढाओढ अपरिहार्य असते. घराण्यामुळें, द्रव्यामुळें, आई-वडिलांच्या मोठेपणामुळें आपल्याकडे सुमार तरुणालाहि लावण्यवती व शिकलेली पत्नी लाभूं शकते. इथे मुख्यतः स्वतःचं कर्तृत्व, स्वतःचं व्यक्तिमत्व, बायको मिळवायला वापरावं लागतं. मनांत ठसलेली मुलगी वश होतेच असं नाहीं. तारुण्यांतले मजेचे चार दिवस झटकन् सरतात व नोकरीसाठीं अहोरात्र राबावं लागतं. मग तारखा घेणं, प्रियाराधन करणं,

निवड करणं अशक्य होत जातं. फार लवकर स्वातंत्र्य मिळतं, त्यामुळें लग्नंहि लवकर होतात. बऱ्याचदां पहिली पाहिलेली पोरगी अप्सरा वाटूं लागते. तिच्याशीं लग्न उरकून माणूस मोकळा होतो. बऱ्याचदां अतिस्वातंत्र्यानं पाऊल फसतं व संसार थाटावा लागतो. डेटिंगमुळें लग्नाच्या वयोमर्यादेवर असा दुहेरी परिणाम होत आहे.

बहुधा लग्न ठरलं की मुलगा–मुलगी इतरांशीं तारखा घेत नाहींत. विवाहित व्यक्तीचा अर्थात् डेटिंगशीं संबंध नसतो. वाङ्‌निश्चयाला, साखरपुड्याला व हातांतल्या अंगठीला इथं मानतात. इतक्या हिकमतीनं, प्रणयराधनानंतर जमवलेलं लग्न व गतिमान आयुष्यांत थाटलेलं घर इथं प्रत्येकाला मोलाचं वाटतं.

इथल्या समाजरचनेंत, आर्थिक व्यवस्थेंत व व्यक्तिस्वातंत्र्यांत ही स्वयंवर पद्धति चपखल बसली आहे व बरीचशीं यशस्वी झाली आहे. अर्थात् ह्यांत धोके दुष्परिणाम नाहींत, असं मुळींच नाहीं. अनिर्बंध स्वातंत्र्याचा दुरुपयोग बऱ्याच वेळेला होऊं शकतो. चांगली मुलें-मुली बिघडतात व वाईट प्रवृत्तीच्या रक्ताला चैन करण्यास भरपूर वाव मिळतो. मुली फसतात, कुमारी माता तयार होतात, बेवारशी बायकांनीं इस्पितळं भरतात. मुलीच फसतात असं नाहीं तर मुलंहि फसतात व दुर्वर्तनी मुलींना देणग्या देत बसतात अगर विवाह करून आणिक खोड्यांत पडतात. अकाली विवाह होतात व मग अकालीं संसारांतली गोडी आटून जाते. अर्थात् हें सारं ज्याच्या त्याच्या वागण्यावर अवलंबून असतं; घरांतल्या संस्कारांवर, आईबापांवर, अवलंबून असतं; ज्या परिसरांत मुलंमुली वावरतात, वाढतात, त्यावर असतं; स्त्री ज्या प्रमाणांत व ज्या पद्धतीनं घडली–बदलली जाते त्यावर तर असतंच असतं. स्त्री व पुरुष आपण होऊन एकत्र यावेत व त्यांतून खरीखुरी प्रीति व कुटुंबं निर्माण व्हावीत म्हणून ह्या मनस्वी देशानें आपल्या परीनं जी स्वयंवरपद्धति काढली आहे, तीपासून बरचं शिकण्यासारखं आहे ह्यांत शंका नाहीं.

●●●

*
*
*
*
*
*
*

# ८ घरकुल आणि घटस्फोट

मॅडीसनला पोंचायला जरा उशीरच झाला होता. विश्वविद्यालय विद्यार्थ्यांनीं गजबजून गेलं होतं. नांवं नोंदवून जो तो राहायची व्यवस्था करण्यांत गुंतला होता. मुलांचं एक मोठं होस्टेल ह्या वर्षी मुलींसाठीं राखून ठेवल्यानं बरींच मुलं गांवांत खोल्या घेऊन राहात होतीं.त्यामुळें खोल्यांचा तुटवडा पडला होता. खूप खटपटीनं मला मिसेस कुर्ट्झच्या माडीवर एक खोली मिळाली. तळमजल्यावर कुर्ट्झ दांपत्य व त्यांचीं दोन मुलं राहात होतीं. वरच्या दोन मजल्यांवर आम्ही दहापंधरा विद्यार्थी खोल्याखोल्यांतून राहात होतों.

महिन्याभरानं एका शुक्रवारीं कसला सण आला व सौ. कुर्ट्झनं आम्हांला जेवणास निमंत्रण दिलं. शनिवार रविवारला जोडून सुट्टी आल्यानं बहुतेक जण घरीं पळाले होते. मी नि माझा जोडीदार लॅनी वॅग्नर जेवायला गेलों. स्ट्रीक ( वेल डन् ) ची मोठी मेजवानी होती. टेबलाभोंवती आम्हीं दोघं, दोघं मुलं व जॉन व कॅरोल कुर्ट्झ बसलों.

...जॉन सरळसोट, उंच होता. प्रथम नजरेस पडत ते त्याचे लांबच लांब हातपाय, नि मग दाढीनें हिरवे झालेले खरखरीत गाल. जरा निरखून

पाहिलं कीं तो चिरचिरा असावा असं वाटत असे. (त्याला अल्सरचा त्रास होता.) कॅरोल चाळीशीला आलेली बाई होती. अमेरिकन बायकां-प्रमाणें सदोदित ती घरकामांत गुंतलेली असे. विद्यार्थ्यांची व्यवस्था तीच पाहात असे. दर सोमवारीं सगळ्या खोल्या साफ करून ठेवी. आमचे बूट, कपडे, पुस्तकं नीट लावून ठेवी. आपल्या घरांत राहायला आलेला मुलगा युनिव्हर्सिटी सोडीपर्यंत दुसरीकडे राहायला जात नाहीं असं ती अभिमानानं सांगे. आठ वर्षांचा जिम् व सहा वर्षांची मिमि-दोघंहि लाघवी मुलें होतीं.

जेवण्यापूर्वींची प्रार्थना संपली नि कांटा-चमचा उचलण्यापूर्वीं मिमि एकदम उठली. शेजारच्या भिंतीवरच्या फळीवरून तिनं चाकोलेटचा डबा उचलला.

'मिमि–' जॉन जवळजवळ ओरडलाच. मी व लॅनी सूपांत चमचे फिरवीत पहात राहिलों.

'मिमि–' कॅरल बजावूं लागली. 'तो डबा आतां फोडायचा नाहीं... तुला सकाळीं बजावलंय् ना ?'

मिमीनं डबा छातीशीं आवळून घेतला व जिमकडे पाहिलं. जिम बोलला नाहीं, दबा धरून बसणाऱ्या चित्त्यासारखा फुलदाणीचा आडोसा करून पहात राहिला. मिमि म्हणाली,

'पण काय झालं एक चाकोलेट खाल्लं तर ?'

'आज नाहीं !' जॉन हुकूम सोडीत म्हणाला, 'आज जेवायला छान डेझर्ट केलंय्–कॅरलनं. उद्यां फोड डबा. मीच फोडीन–'

'ठेवून दे पाहूं डबा–नि बस जेवायला' कॅरल म्हणाली व सूप ओरपूं लागली.

आईबापांनीं एवढी तंबी दिली तरी एरवीं शांत असलेली मिमि बधली नाहीं. एकदम म्हणाली,

'नाहीं ठेवणार. माझा डबा आहे तो. मी वाटेल तेव्हां खाईन ! मला... वडिलांनीं तो दिलाय्.'

' वडिलांनीं मुद्दाम धाडलाय्; आज खायला. आम्ही खाऊं !–' जिमहि किंचाळला.

अन् मग घरांत एकदम स्फोट झाला. कॅरलला ठसका लागला. जॉननं मूठ हापटून टेबलावरचं सामान उधळलं व तो मिमीला पकडायला धांवला. मिमि दाराला अडखळून पडली व ओटांचं रक्त चाटून रडूं लागली; चाकोलेटचा डबा घेऊन जिमनं घराबाहेर धूम ठोकली, आम्हांला विचित्र झालं. कसं कुणाकडे बघावं नि काय बोलावं,तेंच कळेना !

जॉन दारांत उभा राहून जिमला मोठ्यानं हांका मारीत होता. कॅरल मिमीचे रक्त पुशीत बडबडत होती. कॅरलच्या पहिल्या-नवऱ्याची ही दोन्ही मुलं आहेत हें समजल्यानं मला विचित्र वाटत होतं. त्यांच्या वागण्या बोलण्यांत हें पूर्वी कधीं उघड झालं नव्हतं.कुट्टंबाई घटस्फुटित होतीं तर ! जॉन तिचा दुसरा (?) नवरा होता नि पहिल्याचीं पोरं घेऊन ती इथं राहात होती. सावत्र आईचीं अनेक उदाहरणं मीं हिंदुस्थानांत पाहिलीं होतीं. सावत्र बाप ही चीज प्रथमच पाहात होतों. आपले वडील जिवंत असले नि आईसह तिच्या नव्या नवऱ्याच्या घरांत राहावं लागलं कीं एरवी चांगली असलेली मुलं कशीं वागतात, त्यांचीं मनं कशी स्फोटक, संशयी, उग्र बनतात तें पाहून मी अस्वस्थ झालों, माझी भूक एकाएकीं गेली व एकदम निघून जावंसं वाटलं. शिस्त लावणारा जॉन, सगळ्यांना प्रेमळपणें सांभाळूं पहाणारी कॅरल व आपल्या बापाचा अभिमान धरणारी जिम–मिमि–कुणाचीच चूक मला वाटेना. सगळं सुरळीत असून, सारे सज्जन असून, घटस्फुटित स्त्रीच्या संसारांत हा प्रसंग पाहुण्यांच्या देखत घडत होता.

लॅनीनें अखेर मार्ग काढला. मी जिमची व त्यानं जॉनची समजूत काढली, संध्याकाळीं डबा फोडायच्या बोलीवर आम्ही वेल डन् स्टीक गोड करून खाल्लं.

× × ×

टायना ओ ' मारा बोहेमियन होती. सुंदर म्हणतां येणार नाहीं–पण आकर्षक व चुणचुणीत होती. आमच्या ऑफिसांतल्या अनेक टायपिस्ट मुलींपैकीं एक होती. सकाळीं दहाचे सुमाराला आम्ही सगळे ' कॉफी ब्रेक'

घेत असूं. दोन तीन दिवस ओळीनं टायना माझ्याशेजारीं कॉफीचा कप घेऊन बसली. त्यावेळीं माझी नि तिची घसट झाली.

‘ तूं ऑफिसच्या कामापेक्षां कॉलेजच्या अभ्यासाचंच जास्त बोलतेस–’ मी एकदां तिला म्हटलं, ‘ तूं नोकरी करून शिकतेस कीं काय ? ’

‘ नोकरी करून ? रोज आठदहा तास काम केल्यावर ?–’ ती हंसली. ‘ मी गेल्या सेमेस्टरला इथंच शिकत होतें. सॉफमोरला होते. ’

‘ दुसऱ्या वर्षांत ?–मग सोडलंस कां शिक्षण ?–लग्न झालें म्हणून ?–’

टायना पुन्हां हंसली, ‘ माझं लग्न होऊन सहा वर्षं झालीं–’

त्या दिवशीं बोलणं अर्ध्यावरच राहिलं अन् दुसऱ्या दिवशीं मला टायनाचा नवरा भेटला. बायकोला भेटायला तो घाईनं ऑफिसांत आला होता. तो इंजिनिअरिंग कॉलेजांत शिकत होता. दोन तासांच्या मधल्या विश्रांतींत तो टायनाकडे आला होता. कसलंसं पुस्तक घ्यायला त्याला पैसे हवे होते. बायकोला नोकरी करायला लावून तिच्या पैशांतून पुस्तक घेणारा तो विद्यार्थी नवरा मला फारसा आवडला नाहीं.

टर्म संपली आणि टायपिस्टची नोकरी सोडून टायना ज्युनिअरच्या वर्गांत दाखल झाली. तिच्या पोशाखांत बदल झाला. चालण्यावागण्यांत बदल झाला. नोकरींत असतांना ती वेगळ्या तऱ्हेनें नटे, ‘ सेक्रेटरी ’ मासिकाचे अंक वाची, बरोबर पर्स व छोटा रेडियो बागवी. आतां ती लांडा फ्रॉक, टेनीस शूज घालून व हातांत पुस्तकांचा भारा घेऊन अवखळपणें धांवूं लागली. तिच्या केशरचनेंत नि कॉफी पिण्यांतहि बदल झाला.

कॉफी ब्रेकमध्यें एकदां ती भेटली तेव्हां तिला मीं म्हटलं, ‘ छान झालं, तूं कॉलेजांत गेलीस तें !–नवरा नि तूं जोडीनं अभ्यास करीत असाल—’

‘ नवरा ?– तो आतां शिकत नाहीं. ह्या टर्मला त्यानं नोकरी धरलीन् एका मोटारच्या दुकानांत—’

‘इंजिनिअरिंग सोडलन् ? तें कां ?’

‘ मला शिकायचंय् ना ?–पैसे नकोत कां मिळवायला ? ’

पुढं मग मला कळलं कीं टायना व तिचा नवरा बॉब असे आलटून पालटून शिकत होते. टायना कॉलेजांत दाखल झाली कीं बॉब कुठंतरी

नोकरी करी. बॉब शिकूं लागला कीं टायना टायपिस्ट होई. आज सहा वर्षं असं रहाटगाडगं सुरू होतं. संसार थाटून दोघंही एकमेकांना मदत करीत होते.

बॉब ओ' माराची व माझी सलगी झाली तेव्हां मी त्याची तोंड-भरून तारीफ केली. नवरा-बायको एकाच विश्वविद्यालयांत एकमेकांना आधार देत शिक्षण घेतात हें मला अपूर्वाईचं वाटलं. आपल्याकडे अशीं दृश्यं दिसत नाहींत. दोघंही नोकऱ्या करतात. अगर बायको घरकुल सांभा-ळते व नवरा नोकरी करीत शिक्षण करतो (किंवा शिक्षण करीत पैसे कमावतो). बॉब-टायनाच्या ह्या मुलखावेगळ्या संसारतां ओढाताण असली तरी केव्हढी आत्मीयता आहे हें मी त्यांच्या बिऱ्हाडांत जाऊन बघतहि होतों.

पण बॉबला माझं आश्चर्य वाटलं. 'ह्यांत वेगळें तें काय ! खूप जोडपीं असं करतात; लवकर लग्न केलं तर असंच वागावं लागतं; तसं पाहिलं तर आम्हांना दोघांनाहि नोकरी मिळेल. आठ तास राबलं कीं उरल्या वेळांत भरपूर चैन करतां येईल. पण आम्हांला दोघांनाहि शिकायचं आहे; मला इंजिनिअर व्हायचंय; टायनाला लॅटीन शिकायचं आहे; आम्हीं मोठीं ध्येयं ठरवलीं आहेत—

ओ'मारा जोडप्यासारखीं बरींच जोडपीं अशीं मोठीं होतात. एक-मेकांच्या आधारानं, एकजीव होत, मोठीं होतात. प्रेमविवाह झाल्यावर तिथंच संपत नाहीं. एकमेकासाठीं स्वार्थ सोडणं, खस्ता खाणं, सारं सुरू होतं असल्या संसारांत—

× × ×

'तुम्हांला खरंच नमुनेदार, तुमच्या भाषेंत आदर्श जोडपं पहायचं असेल तर तुम्हीं ब्राऊन्सना भेटा—आम्हीच तुमची लिंडा आणि टॉम ब्राऊनची ओळख करून देतों—' ओ' मारा दंपती एकदां मला म्हणाली आणि मॅडीसनपासून पन्नास मैलांवरच्या गांवांतल्या ब्राऊनच्या घरीं घेऊन गेली.

ब्राऊन कुटुम्बाशीं माझा बराच घरोबा जडला. ओ' मारानं सांगितल्या-प्रमाणें मला ब्राऊन जोडपं खरंच नमुनेदार वाटलं. कॉलेजांत एकच वर्ष

गेलेला ब्राऊन एन्सायक्लोपिडिया विकत असे. कॉलेजच्या एका वर्षांत तो खूप मुलींच्याबरोबर हिंडला होता; पण कुठलीच मुलगी त्याच्या मर्जीला उतरली नव्हती. गांवांतल्या लायब्ररीला लागलेली आग विझवतांना त्याला लिंडा भेटली व त्याचं प्रेम जडलं. युद्धामुळें दोघांची ताटातूट झाली व विरह सहन न होऊन लिंडा त्याला भेटायला युरपपर्यंत गेली. लग्नानंतर दोघंहि छोट्याशा गांवांत राहात होते. लिंडा फार शिकली नव्हती. फावल्या वेळांत ती चर्चचं काम करी. गांवांतलं मुलांचं उद्यान, पोहण्याचा तलाव व चर्च स्वच्छ ठेवण्याकडे लक्ष देई. घराशेजारींच त्यांचे आईबाप छोट्या घरांत राहात असत. त्यांची दीड वर्षांची मुलगी हंसरी व गुटगुटीत, अगदीं दृष्ट काढावी, अशी होती.

लिंडा नि टॉमला कसलेही problems नव्हते. अमेरिकन कुटुंबं confused असतात. त्यांना problems असतात. ह्या कुटुंबांत एक आंतरिक शांतता मला नेहमीं आढळली. टेलिव्हिजनचं, दारूचं, वेगाचं—कसलंच लोभन दोघांना नव्हतं. अन् तरीहि दोघं जीवनाबद्दल अपार औत्सुक्यानें निथळत होतीं.

ब्राऊन्सवर मी लोभावलों. त्यांची ओळख करून दिल्याबद्दल ओ'मारांचे आभार मानले. टायनाला म्हटलं,

'खूप तरुण मुलांमुलींशीं परिचय झाल्यावर व त्यांतली अटीतटी पाहिल्यावर मग लिंडा नि टॉम एकमेकांवर अनुरक्त झालीं. दोघांनीं एकमेकांसाठीं खूप सोसलं. लढाईमुळें तुमच्या देशांत कांहीं कमी समस्या निर्माण झाल्या नाहींत. कोरिया बघून आलेल्या कित्येकांना भ्रंश झालाय्. अनेक विवाह मोडकळीस आले आहेत. पण ब्राऊन्सनीं आपलं घरकुल सुरक्षित ठेवलंय्. एवढंच नव्हे तर त्याचं नंदनवन केलंय्. दोघं एकत्र पाहिलीं कीं मला आमच्या रामसीतेची आठवण येते. जसे कांहीं ते एकमेकांसाठीं जन्मले आहेत !'

माझं व्याख्यान थांबवून टायना म्हणाली, 'सारं खरं ! पण एवढ्या दीर्घ परिचयानं एक गोष्ट समजली का तुम्हांला ?'

'काय ?'

'दोघंही घटस्फुटित आहेत—'

मी कमालीचा दचकलों. मनानं जें पाहिलं, वागवलं होतं, तें डगडगूं लागलं. माझा गोंधळ पाहून बॉब हंसला व म्हणाला,

‘ चार वर्षांपूर्वी दोघांनीं एकमेकांचीं घटस्फोट घेतला होता. एकमेकांचं पटेना म्हणून. त्याची फिरती व तिचा कॅथलिक धर्म भांडणं आणूं लागला. दोघांनीं विभक्त व्हायचं ठरवलं. तें वर्ष त्यांचं तगमगींत गेलं. टॉम दक्षिणेंत भ्रमंति करीत होता. अन् लिंडा जवळजवळ संतीण होणार होती. अखेर दोघांनाहि उमगलं कीं एकमेकांशिवाय जगणं अशक्य आहे. परत दोघं भेटलीं. तडजोड झाली. पुनर्मीलन झालं—’

× × ×

आऊन दंपतीचा सहा एक महिने सहवास लाभला. त्यावर उतार म्हणून कीं काय, विल्सनच्या घरीं दोन दिवस मुक्काम करण्याचं नशिबीं आलं.

दक्षिण दौऱ्यांत, एका शनिवार-रविवारीं विल्सनच्या घरांत माझी सोय करण्यांत आली. फोनवरून श्रीमती विल्सन माझ्याशीं मोठ्या लाघवानं बोलली. पण तिच्या घरांत पाऊल ठेवल्यापासून सगळा गोंधळच चाललेला दिसला.

‘ माझ्या ‘ फादर ’ शीं तुझी ओळख करून देत्ये. मग संध्याकाळीं आपण डाऊनटाऊनला जाऊं तेव्हां ‘ डॅडी ’ कडे नेईन तुला—’ विल्सनबाई व्हरांड्यांत बसलेल्या एका पोक्त टक्कलवाल्याकडे मला नेत म्हणाली.

सख्खा बाप म्हणजे ‘ डॅडी ’ व आईचा नवरा म्हणजे ‘ फादर ’ ही अमेरिकन भानगड आतां मला ठाऊक झालेली होती. श्रीमती विल्सननं नंतर तिच्या पांच वर्षांच्या ईव्हा व चार वर्षांच्या स्वीटाची गांठ घालून दिली तेव्हां मी म्हटलं,

‘ ह्या गोड पोरींचा डॅडी कुठंय् ?’

श्रीमती विल्सनचा ‘ फादर ’ मध्येंच म्हणाला,

‘ ह्या पोरट्या आतां ‘ फादर ’ला एक्स्पेक्ट करीत आहेत.’

छोट्या, गोड पोरी खुळ्यासारख्या हंसल्या नि माझ्या काळजांत कालवलं गेलं.

संध्याकाळीं जेवण उरकून मी श्रीमती विल्सनबरोबर बाहेर पडलों. गाडी जरा वेगांत गेली तशी ती म्हणाली,

' मी ' डिव्होर्स ' घेतल्यापासून जो तो माझ्यावर ' रेप् ' करायला बघतो आहे.'

काडीमोड घेतल्यानंतर अनेक स्त्रिया मानसिक विकृतीनं पछाडल्या जातात. विल्सनबाई त्यांपैकींच होती हें मीं हेरलं. दुसराच विषय काढीत म्हटलं,

' आपण कुठं जायचं ? गांवांत बघण्यासारखं काय आहे ? अगदींच कांहीं नाहीं तर बोलिंग ॲलीमध्यें जाऊं—'

' प्रथम थोडं ' वॉर्म अप' होऊं. ' विल्सन एका दारूच्या गुत्त्यापाशीं गाडी उभी करीत म्हणाली.

अल्कोहोल पोटांत गेल्यावर श्रीमती विल्सनला बरं वाटलं. मग त्यांतच ती रममाण झाली. त्या रस्त्यावर दहा-बारा गुत्ते होते. प्रत्येक गुत्त्यांत ती शिरूं लागली...एका बारमध्यें 'हायबॉल' घेत ती मला तिच्या आयुष्याची चित्रकथा सांगू लागली. अतिस्वातंत्र्य व अवेळी हातांत आलेला पैसा, आई—वडिलांचीं भांडणं व नवऱ्याचा संशयी स्वभाव ह्यामुळें श्रीमती विल्सनच्या आयुष्याची परवड झाली होती. अन् मग तिला कशाचाच धरबंध नव्हता. मुलींचं पुढें काय होईल, स्वतःचं पुढें काय होईल, ह्याचं सुतक नव्हतं तिला. ती स्वैराचारी बनली होती.

सहाव्या गुत्त्यांत आम्ही गेलों. जाझ संगीत चाललं होतं. आम्ही पुढें बसलों. —तेवढ्यांत मुख्य वेटर वेगानं एकदम आमच्या अंगावर आला. त्यानें श्रीमती विल्सनच्या फाडकन् मुस्काटांत मारली !—ती किंचाळली. लोक धांवले. संगीत थबकलं. एकच गोंधळ झाला....

तो इसम मग मला बाजूला घेऊन म्हणाला, ' तुमच्याबद्दल मला कांहीं म्हणायचं नाहीं...पण ही बया रोज नवा मित्र घेऊन इथं नंगा नाच घालायला येते. मला खिजवायला !—ही माझी बायको आहे—होती ! माझ्या दोन मुली हिच्या घरीं आहेत—'

• • •

*
*
*
*
*
*
*

# १ हिरवा कंदील

संध्याकाळचे पांच वाजायला येतात व विद्यापीठाचे एवढा वेळ ओस पडलेले रस्ते एकाएकीं गजबजूं लागतात. वह्या-पुस्तकांचे भारे सांवरीत विद्यार्थी वर्गावर्गांतून बाहेर पडतात. टोळक्याटोळक्यांनीं डॉर्म्समध्यें, अपार्टमेंटमध्यें, रूमिंग हाऊसेसमध्यें परतूं लागतात. ड्रग स्टोअर्स, हॅंबुर्गर स्टॅंड्स, ईटमध्यें झिम्मड करतात. विद्यालयाचेच नव्हेत तर डाऊन-टाऊनचे सारे मार्गहि गर्दीनें ओसंडूं लागतात. आपापल्या मोटारी, घरं गांठायची लगबग सुरू होते. त्यांतच झपाट्यानें अंधार वाढतो. जागजागीं दिवे चमकूं लागतात. सारं मॅडीसन नगर पिसाटल्यासारखं होतं.

कामाचे तास संपल्यावर तीसएक मिनिटं असा कालवा होतो व मग परत सामसूम होऊं लागते. स्टीकचे, पायचे, कॉफीचे वास वातावरणांत भरून राहतात...

जॉन्सन व मिलरस्त्याच्या नाक्यावरच्या ठेंगण्या खांबावरचा हिरवा कंदील सदोदित लागलेलाच असतो. जुन्या जर्मन धाटणीच्या अष्टकोनी कंदिलांत कधींकाळीं विजेचा गोळा बसवला आहे. विस्कॉन्सिन विद्या-पीठांतील विद्यार्थ्यांच्या कितीतरी तुकड्या ह्या हिरव्या प्रकाशाभोंवतीं

गोळा झाल्या. इथल्या अनेक वैशिष्ट्यांत हा ‘ हिरवा कंदील ’ एक वेगळीच परंपरा निर्माण करीत आहे.

कंदिलामागच्या जुनाट, ऐसपैस, दुमजली घरांत मुलांचं ‘ को-ऑपरेटिव्ह ’ आहे. वरच्या दोन मजल्यावर ‘ गर्ल्स् को-ऑप ’ आहे. तिथें पंचवीस-तीस विद्यार्थिनी राहतात. तळघराच्या खालच्या मजल्यावर ‘ईटिंग को-ऑप ’ आहे. ऐंशीं मुलं-मुली इथें दोन वेळचं जेवण घेतात.

इथें जेवणघरं तशीं बरींच आहेत. जागजागीं ड्रग स्टोअर्स आहेत. स्टुडंटस् मेमोरिअलचा, शेंकडों विद्यार्थी तळ्याकांठीं बांधलेल्या हॉलमध्यें जेवण घेऊं शकतील असा, भव्य कॅफेटेरिया आहे. वसतिगृहामधल्या खाणावळी आहेत. रेस्टॉरंट्स आहेत. पण ‘ ग्रीन लँटर्न ईटिंग को-ऑप ’ ची सर एकालाहि नाहीं.

इथें भव्यता नाहीं. अन्नांतहि विविधता नाहीं. युनिव्हर्सिटींतल्या गर्दीच्या मानानं इथें फारच थोडीं मुलं जेवण घेतात. पण इथें एक वेगळं वातावरण आहे, आदर्श आहेत, परंपरा आहे. इथल्या सुमार जेवणाला एक वेगळी चव आहे व इथल्या मूठभर मुलां-मुलींत एक निराळी जिद्द आहे.

सात डॉलर्समध्यें आठवड्याचीं बारा जेवणं ( रविवारीं सुट्टी ) देण्याचा विक्रम ‘ हिरवा कंदील ’ करून दाखवतो. ही आठवड्याची पांचसहा डॉलर्सची बचत विद्यार्थ्यांना फार उपयोगी पडते. विशेषतः, धडपड करून, नोकऱ्या करून शिकणाऱ्या मुलांमुलींना. हीं मुलं साध्या राहणीचीं, कसल्या तरी ध्येयानं भारलेलीं असतात. जीवनाच्या उत्साहानं निथळत असतात. ह्या ऐंशींएक मुलांच्या मेळाव्यांत अमेरिकन श्रीमंती दिसत नाहीं. पण अमेरिकन जीवनांतला सगळा प्रांजळपणा व सगळा सज्जनपणा एकवटलेला आढळतो.

सात डॉलर्समध्यें जेवणाचं ताट द्यायचं म्हणजे चेअरमन, मेन्यू चेअरमन आणि वर्क्स चेअरमन ह्यांची सारखी धांवपळ चालू असते. अन्नांत कमी-जास्ती कांहीं आढळलं तर मुलं आधीं मेन्यू चेअरमनलाच फाडून खातात. आपल्या बजेटांत तो बिचारा पावरोटी, दूध, अंडी, मांस, आईस्क्रीम

सगळी यादी कशीतरी कोंबत असतो. वर्क्स चेअरमन कामाचं वेळापत्रक तीनतीनदां ठीक करीत असतो. ग्रीनलॅंटर्नमध्यें फक्त एक स्वैंपाकीण अन्न शिजवायला आहे. बाकी जेवणघर धुण्यापासून टेबलं मांडण्याचं, भाज्या चिरायचं, अन्न वाढण्याचं बशा विसळायचं—सारं काम मुलांना करावं लागतं. आठवड्याचे कुठलेहि तीन तास प्रत्येकाला ' को-ऑप ' चं काम करावं लागतं. वेळ असेल व अभ्यास नसेल तेव्हां मुलं कामं करून जातात. ओळीनें तीन अगर एक दिवसाआड एकेक तास, आपल्या सोयीनं वेळा-पत्रक बसवतात. जेवणाआधीं येणारीं मुलं भाज्या, पाव, सॅलड चिरतात. टेबलं मांडतात. बशा भरून ठेवतात. जेवणानंतर कामाला येणारीं मुलं आवराआवर करतात. बशा विसळतात, भांडीं घासतात. झाकपाक करून ठेवतात.

मुलं कामाचा उरका पाडतात म्हणूनच इतकं स्वस्त जेवण देणं परवडतं. स्वैंपाकिणीचा महिना ऐंशी डॉलर्सचा पगार सोडला तर नोकरापायीं एक कपर्दिकहि खर्च होत नाहीं. जमलेले पैसे अन्नधान्य घेण्यांतच खर्च होत असतात. स्वैंपाकीणदेखील चुलीजवळून न हालण्याच्या बोलीवर एवढा अल्प पगार घेते. तिच्या हाताखालीं चार पोरी राबत असतात.

माडीवरच्या खोल्यांतून मुली राहतात. त्यांना वसतीगृहांतल्यासारखं उपरं वाटत नाहीं. भपका कमी, पण भाडंहि कमी. फर्निचर साधं आहे. राहावं लागतंहि दाटीवाटीनं—पण इथें खूप स्वातंत्र्य आहे. दोनशें नि हजारजणींच्या होस्टेलमध्यें राहिल्यासारखं वाटत नाहीं. खालच्या मजल्या-वर जेवणघर, तिथेंहि काम करायचं—म्हणून मुलींना घरच्यासारखं वाटतं...

बेट्टी सगळ्यांचें केस कापते. मुलांचेसुद्धां. एका उन्हाळ्याचे सुट्टींत ती केशकर्तनाची विद्या शिकली. तिचं ज्ञान मुलींचे लांडे केस ठाकठीक करा-यला व मुलांचे ' क्रूकट ' करायला पुरेसं आहे. दुकानांत कटिंगला दीड डॉलर पडतो. पण बेट्टीला ऐंशी सेंट्समध्यें भागवितां येतं. तशांत बेट्टी चांगला ' जिटर बग ' नाच करते. सबंध टर्मभर तिच्याकडे केस काप-णाऱ्यांना ती जिटरबग फुकट शिकवायचं लोभन दाखवते.

बेट्टी शिकत होती बॅक्टिरिऑलजी. चांगली गृहिणी व्हायचं म्हणजे बॅक्टिरिऑलॉजीचं ज्ञान आवश्यक आहे असं तिनं कुठंतरी वाचलं नि ती ह्या विषयाकडे वळाली. पुढें तिचा बिचारीचा प्रेमभंग झाला व लग्नाच्या भानगडींत पडायचं नाहीं असा तिनं निर्णय घेतला. तरी पण तिचा बॅक्टिरिऑलजीचा अभ्यास चालूच होता.

प्रत्येकीला अशीच कांहीं कांहीं ओढ आहे. जेनी मातीकाम शिकण्यासाठीं दक्षिणेकडून आली आहे. फ्रँक लाईड राईटकडे शिक्षण घ्यायची तिची मनीषा आहे व त्यासाठीं ती पैसे जमवीत आहे. आईनें दोनदां घटस्फोट घेतल्यानं ग्रेसनं आतां ग्रीन लँटर्नलाच आपलं घर मानलं आहे.

सगळ्याजणींनाच 'औटडोअर' आयुष्याची ओढ आहे. सारखे सहलींचे, वनभोजनांचे कार्यक्रम आंखले जातात. इतर वेळीं को-ऑपच्या पायऱ्यावर, पार्क रस्त्याच्या पाईनवृक्षाखालीं मुली, पांखरं बसावीत, तशा बसलेल्या असतात. कुणी केस वाळवीत, कुणी अभ्यास करीत, कुणी मित्रांशीं वादविवाद करीत. ब्लूजीन्स घालून फॉल मोसमांत रस्त्यापुढचा पाचोळा दूर करण्याची व थंडींत बर्फ काढण्याची सगळ्याजणींचीच लगबग चालू असते.

पाळीपाळीनें एकेकीला जेवणघरांत राखण करण्याचं काम करावं लागतं. फोन येतात. काम चालू असतात त्यावर देखरेख करायची असते. जेवणघराच्या जाळीच्या प्रवेशदाराशीं अभ्यास करीत कुणीतरी नेहमीं बसलेली असते. बऱ्याच वेळां गोबऱ्या चेहऱ्याची नॅन्सी तिथें विणकाम करीत वेळ काढीत असतांना आढळते.

दुपारचं जेवण बाराला व संध्याकाळचं पावणेसहाला—अशा भोजनवेळां ठरलेल्या आहेत. शक्यतोंवर कुणी ही वेळ टाळीत नाहीं. सगळ्याजणांत बसून, हंसतखेळत जेवण्याची इथली गोडीच वेगळी आहे.

सकाळीं नऊदहापासूनच 'हिरव्या कंदिलां'त हालचाल सुरू होते....

सुपर मार्केटमधून सामानाच्या पिशव्या घेऊन डिमिट्री येतो. उंच, शेलाटा, डाव्या डोळ्याखालीं व्रण असलेला, गंभीर मुद्रेचा. त्याची पन्नास सालची

नॅश गाडी ग्रीन लँटर्नसाठीं राबत असते. दाराशीं वाचीत बसलेली रूथ किंवा टोनी उठते व मोटारमधलं सामान आंत आणते. फ्रिझमध्यें, डीप फ्रिझमध्यें, पँट्रीमध्यें भरून टाकते. पाव, चीज, दूध, आईस्क्रीम, हॉटडॉग्ज, मासे, मांस, अंडीं, टमाटो, आयडाहोचे बटाटे...मेन्यू चेअरमननं दिलेल्या यादीनुसार त्यानें सुपरमार्केटमधून सामान आणलेलं असतं. कधीं त्याच्या-बरोबर ग्रेस जाते, कधीं बॉब जातो. पण कॉलेजांत दाखल झाल्यापासून डिमिट्रीचं हें बाजारमास्तरचं काम चालू आहे.

नेली याच सुमारास आलेली असते. सैन्यांतल्या एका भटारखान्यांत काम केलेली ही चारपांचशें पौंड वजनाची गरगरीत स्वैंपाकीण मोठी कुर्र्याची आहे. तीनतीनदां पोरांवर डाफरीत असते. एखाद्या सासूचा जाच सहन करावा तसा तिचा दुस्वास मुलींना सोसावा लागतो...'माझ्या झाऱ्यांना हात लावूं नका... चिकनचे तुकडे अजून इथें आले नाहींत... कॉटेज चीजचा डबा इथं कुणी टाकला ?...ह्या पोरट्या आहेत कीं नुसत्या पँटीज आहेत ?...स्वैंपाकघरांत कुणी रेडियो आणला तर मी राजीनामा देईन—' नेली सारखी डाफरत असते. फार थोड्या पगारावर ती काम करते, एवढ्या पैशांत दुसरा कुक मिळणार नाहीं, म्हणून पोरांना ऐकून घ्यावं लागतं. कांहीं पोरी त्यांतूनही नेलीला सतावतात. स्वैंपाकघरांत 'रॉक अँड रोल' किंचाळतात नि नेली चिडली कीं फिदीफिदी हंसतात.

सकाळीं कामाचे तास असलेलीं मुलं अकरापर्यंत उगवतात. सॅलड चिरलं जातं. कॉफीचा बंब धगधगूं लागतो. फ्रूटसॅलड तयार होतं. आधल्या रात्रीं धुतलेल्या फरशीवर फडकं फिरवलं जातं. आठदहा लांबट टेबलाभोंवतीं खुर्च्या सरकावल्या जातात. बश्यांच्या चळती कपाटाबाहेर येतात. छोटी चिमुरडीशी एलन मोठी खेळकर आहे. दोन्ही हातांवर वीस वीस बशा तोलत ती टेबलाटेबलाभोंवतीं हिंडते. लंबूस जॉन बशा वरच्यावर उचलून मांडामांड करतो. तगडा, टेक्सासमधला मिल्टन कांटे-सुरे सर्कशींतल्या नेमबाजासारखे फेकीत बशांभोंवतीं ठेवतो. दुधाचे पेले, सॅलडच्या बशा, पावाच्या छोट्या टोपल्या, भरल्या जातात. वाढून घेणं संपतं तों बारा वाजतात. सकाळचे वर्ग संपवून मेंबर्स वखवखल्यासारखे

येतात. वरच्या मजल्यावर राहणाऱ्या मुली जेवणघराच्या आंतल्या अंगाला असलेल्या जिन्यानं भिंगरींसारख्या खालीं येतात. मिलवरच्या झाडावरून बागडणाऱ्या मोठाल्या, पिंगटभुरकट, बिनपट्ट्याच्या खारी अन्नाच्या वासांनीं हिरव्या कंदिलापाशीं येतात. बाहेर उभ्या केलेल्या मुलांच्या सायकली, मोटारी भोंवतीं घुटमळतात. आंत आठदहा टेबलाभोंवतीं मुलामुलींची अंगतपंगत सुरू होते.

जेवून परत कॉलेजला जायची घाई असल्यानं सगळे भरभर जेवतात व पुस्तकं घेऊन परत पळ काढतात. संध्याकाळचं जेवण मात्र आरामांत होतं. परत लॅब्मध्यें, लायब्ररींत जायचं असतं खरं; पण वेळ गांठायची नसते. शिवाय हें मुख्य जेवण ! सकाळीं कांहींजण उशीरा येतात, कांहीं बाहेरच लंच अगर ब्रंच घेतात. पण संध्याकाळच्या भोजनाला सगळे पावणेसहाचें आंत हजर होतात.

दर खेपेला वेगवेगळ्या जागीं बसायचं, एकाच खुर्चीवर नेहमीं जेवायला बसायचं नाहीं, असा ग्रीन लॅंटर्नचा एक संकेत आहे. वेगवेगळ्या कोंडाळ्यांत बसलं कीं नव्या ओळखी होतात, निरनिराळ्या मुलांमुलींशीं जास्त परिचय होतो, तोच तोचपणा येत नाहीं, कंपू बनत नाहींत. मुलं मुली नवीन खुर्च्या अडवतात. पुस्तकांचे भारे भिंतीवर मारलेल्या फळीवर टाकले जातात. जेवणाच्या हॉलचें मागं छोटं दालन आहे. त्यांत वरकोट ठेवायची सोय आहे. तिथेंच लॉंड्रीचे कपडे दिले घेतले जातात. मेंबर्सना तीस टक्के कमिशन देण्याची एका धुलाई–केंद्राची योजना आहे. बाजूला स्टोअर्स काढलेलं आहे. चिक्की–चॉकोलेटपासून टाईम-लाईफच्या अंकांपर्यंत विविध वस्तू विक्रीला ठेवल्या आहेत. दुसऱ्या कोपऱ्यांत कोका कोलाचं मशीन आहे.

पावणेसहाला चेअरमन घंटा वाजवतो व मुलं खुर्च्यांवर बसतात. लांबट मोठ्या बश्यांतून कढतकढत मुख्य 'डिश' भरून भरून टेबलाटेबलावर ठेवली जाते. स्पॅनिश राईस,स्टेक, चिकन, अगर फिश–मुलं त्यावर तुटून पडतात. कोठीच्या खोलींत जाऊन चटण्या, चीज वगैरे घ्यायला कुणालाहि मुभा असते. पहिली दहा–पंधरा मिनिटं काट्याचमच्यांचे आवाजच फक्त ऐकूं

येतात. दिवसभर अभ्यास करून दमलेलीं मुलं भूक शमवीत असतात. मेक्सिकन, भारतीय विद्यार्थी कोठींतून रेड पेपरच्या, मस्टर्ड सॉसच्या बाटल्या आणतात व अन्नाला झणझणीतपणा आणायचा यत्न करतात.

दोनचारच हिंदी विद्यार्थी आहेत. संकेत म्हणून नाहीं, पण एकमेकांचं पटत नाहीं म्हणून हे चारपांच सेनगुप्ता, सुब्रह्मण्यम् लोक निरनिराळ्या टेबलावर बसतात. एक इराकी पोरगा लिझी लिट्मार जिथं बसेल तिथं बसायला जातो. लिझी कधींतरी वश होईल अशी त्याची (अन् इतरांचीहि) खात्री आहे.

चेअरमन बॉब सॅव्हेज् फार उमदा तरुण आहे. त्याच्याभोंवतीं नेहमींच मुला–मुलींचा घोळका असतो. कोरिया पाहून आलेला हा 'सदर्नर' मुलगा एका 'कलर्ड' मुलीवर प्रेम करतो अशी सगळीकडे बातमी उठलेली आहे. तरीहि अनेक मुली बॉबनं 'डेट' विचारावी म्हणून झुरत असतात. बॉब मात्र आठवड्याची सुट्टीदेखील नोकरी करण्यांत घालवतो.

जेवण जरा रेंगाळलेलं दिसलं कीं बॉब उठतो नि विचारतो, 'कुणाला कांहीं सांगायचंय् का? Are there any announcements?'

दररोज बऱ्याच जणांना बरंच कांहीं सांगायचं असतं. सगळ्यांना दूर सारून वर्क्स चेअरमन डेव्हिड उठतो. डेव्ह हा राकट, फुटबॉल-खेळाडू वाटतो. पण तो आहे काव्याचा विद्यार्थी. "काल दुपारीं जेवण झाल्यावर दोघंजण बशा आवरायचं काम टाकून गेले...पुढल्या आठवड्याचे कामाचे तास वाटून द्यायचे आहेत...ह्या आठवड्याचंच वेळापत्रक ठेवणार आहे. कुणास बदल हवा असेल तर मला आजच भेटावं–" डेव्ह उठतो तेव्हां सगळे हंसतात. पण त्याचं सांगणं संपलं कीं त्याच्याशीं बोलण्याची धांदल करतात. बॉब घंटा वाजवून शांतता प्रस्थापित करतो.

तेवढ्यांत ज्यॅकी उठते. "कुक नेलीला काढण्याचा ठराव ह्या महिन्याच्या बैठकींत घ्यावा–" ती सुचवते. मग नेलीचं वर्तन, ती गेली तर नवी स्वैंपाकीण मिळण्याची अडचण, वगैरे उलटसुलट चर्चा होते.

प्रत्येक टेबलावरचा एकेक प्रतिनिधी स्वैंपाकघरांत जातो, कपांची चळत व कॉफीचा हंडा भरून घेऊन येतो.

जेनीला स्थापत्यशास्त्रावरचं कुठलंहि पुस्तक कुणाजवळ असलं तर हवं असतं. त्याच्या बदल्यांत तिला भावाकडून मिळालेला ' समग्र शेक्सपिअर' तिनं देऊं केलेला आहे. तशी नोटिस तिनं दाराजवळच्या बुलेटीन बोर्डावर लावली आहेच. पण ती पुन्हां उठून पुस्तकाबद्दल विचारणा करते.

" साम्यवादी मंडळ– " ठेंगणा, लुकडा, आयरीश स्टॅन बसूनच ओरडतो. त्याचा आवाज ऐकल्यावर कांहीं वेडावून दाखवतात तर कांहीं टाळ्या देतात. स्टॅन त्या गोंधळांत मंडळाच्या कामाची जाहिरात करतोच. तो कट्टर समाजवादी आहे हें त्याच्या आवाजांत, वागण्यांत सारखं दिसून येत असतं.

आगामी व्याख्यानमालेबद्दल कुणी सांगतं...नाटकाचीं अगर फुटबॉल मॅचचीं तिकिटं कुणाला बदलून हवीं असतात...

एखादे वेळीं अगदीं वेगळीच समस्या उभी राहते...बीबी गुब्लर एकदां अशीच सुजलेल्या डोळ्यांनीं जेवायला आली. दोन दिवस तिला अन्न गेलं नव्हतं. अन् मग ती पानावर बसली तें मित्रांच्या आग्रहानंच. पहिले दोन-चार घांस घेतांच तिला भडभडून आलं. टेबलावरचे नि बाजूचेहि लोक बघूं लागले. तेव्हां तिचा ' स्टेडी ' मित्र वाल्टर उठला. आणि बीबीची लाडकी भाटी फार आजारी असल्याचं त्यानं सर्वांना सांगितलं. लुईज् भाटी सगळ्या ग्रीन लॅंटर्नमध्यें माहीत होती. रंगीबेरंगी नायलॉन रिबिनी लावून बीबी तिला फिरायला नेत असे. बीबीच्या सोनेरी, लांबसर केसांच्या संभाराशीं लुईज् नेहमीं खेळत असे. ती भाटी आजारी पडून हॉस्पिटलांत गेली म्हणून सगळ्यांना हळहळ वाटली.

लुईजच्या आजाराबद्दल रोज संध्याकाळच्या जेवणाचे वेळीं ' अनाउन्समेंट्स ' सुरू झाल्या. तिच्यासाठीं प्रार्थना झाली. मग हॉस्पिटलचा खर्च भागविण्यासाठीं वाल्टरनं फंड काढला. एका मांजराच्या रबरी पुतळ्यांत छिद्र पाडून त्यांत पैसे गोळा केले जाऊं लागले. शेजारीच पैशाचा हिशेब लिहिलेला असे. " लुईज्च्या लवकर संपणाऱ्या आजाराच्या खर्चाबद्दल : पेनिसिलीन शॉट्स–४ डॉलर्स, एनिमा–१ डॉलर, औषधं–१·५० डॉलर्स..."

महिन्याआड ग्रीन लँटर्नमध्यें पार्टी झडते. कुठल्या तरी प्राध्यापकाला सहकुटुंब निमंत्रण मिळते. तो चार शब्द बोलतो. सगळे रेड वाईन पितात. अशा वेळीं रॉझ, मारीया नि बर्कला गाण्याचा जोर येतो. सगळी मुलं एकदम उभीं राहातात व भसाड्या आवाजांत 'Oh, you beautiful doll हें रांगडं गाणं म्हणतात. मग मुलीहि My Buddy ह्या रंगेल गाण्यानं उत्तर देतात. कुठल्याहि गाण्यांची फैर झडली तरी विस्कॉन्सिन गौरवाचं गाणं शेवटीं म्हटलं जातं :

**On Wisconsin, On Wisconsin, great old badger State.**
**We, thy loyal sons & daughters, hail thee good and great.**
**On Wisconsin, On Wisconsin, Champion of the right.**
**Forward our motto, we will win the fight.**

सिगरेटी ओढीत, पुस्तकं वरकोट घेत मुलं जेवून बाहेर पडतात. वाल्टर, बॉब आंतल्या जिन्यानं मुलींच्या माडीवर हळूच सटकतात. इतर कांहीं बाहेरच्या पायऱ्यावर गप्पा मारीत बसतात. बाकीची लायब्ररींत, लॅबोरेटरींत अगर अपार्टमेंट्समध्यें परततात.

जेवणानंतर काम असतंच. बशा, कांटेचमचे आंतल्या खोलींत पडतात. बशा धुण्याचं मशीन सुरू होतं. रबरी मोजे घालून बशा साफ केल्या जातात. जेवणाआधींच्या व नंतरच्या ह्या कामांत ग्रीन लँटर्नमधली गंमत सांठली आहे. पांचसहा मुलंमुलीं एकत्र काम करतांना हंसतात, खेळतात, एकमेकाच्या अधिक जवळ येतात. शब्दकोडीं सोडवण्यापासून स्पुटनिकपायीं भांडण्यापर्यंत सर्व गोष्टी होतात. कितीतरी स्नेहसंबंध व प्रेमसंबंध इथे जमले गेले आहेत...

हिरव्या कंदिलाच्या प्रकाशाखालीं जमलेलीं मुलं गरिबींतलीं, धडपडणारीं, पैसे जमवून वांचवून शिकूं पाहणारीं, अशीं आहेत. नुसतीच डिग्री हस्तगत करण्यासाठीं अहोरात्र अभ्यास करणारीं मुलं थोडीं आहेत. बऱ्याचशा मुलांना अभ्यासाबाहेरचं अवाढव्य जग जाणून घ्यायची उत्सुकता आहे. त्यासाठीं परदेशी विद्यार्थ्यांना मुद्दाम मेंबर केलं जातं.

अनेक विषयावर वादविवाद, अभ्यासमंडळं चालतात. इथल्या मुलीहि साध्या, धडपड्या आहेत. फार थोड्या मुलांच्या डायरींत गर्ल्स कोऑपचा फोन नंबर टिपलेला असतो. कारण इथल्या पोरी सहसा ‘दाद’ देत नाहींत.

विस्कॉन्सिन विद्यापीठानं अमेरिकेंतल्या इतर विश्वविद्यालयांप्रमाणें अनेक आदर्श निर्माण केले आहेत. ईटिंग कोऑपचा हा हिरवा प्रकाश त्यांत वेगळा उठून दिसतो. ऐंशी–नव्वद धडपडणाऱ्या, मनस्वी मुलामुलींचं अंतर्जीवन उजळून टाकतो.

...रात्र सरतांना मॅडीसनचे दिवेहि मालवले जातात. सारं आसमंत अंधारांत बुडी घेऊन परत प्रकाशानं भरून जाऊं लागतं. मिल रस्त्यावरचा हिरवा कंदील मात्र सदाचा तेवतच असतो.

●●●

# १० लेखनकामाठी

अमेरिकेनं सगळ्याच कलांचे कारखाने काढले आहेत. सगळ्या गोष्टींचं तंत्र तयार केलं आहे. साहित्यनिर्मिती याला अपवाद नाहीं. प्रयत्नांन्तीं परमेश्वर हें ब्रीदवाक्य ह्या देशानं प्रत्येक क्षेत्रांत खरं करून दाखवलं आहे—अगदीं लेखनाच्या बाबतींतहि. ईश्वरदत्त प्रतिभेनें एखादा कमी शिकलेला, शास्त्र न जाणणारा कलावंत अलौकिक कथा अगर काव्य निर्माण करतो. त्याचप्रमाणें तंत्रमंत्रांचा पूर्ण अभ्यास नि भगीरथ कष्ट करूनहि एखादा लेखक ह्या देशांत श्रेष्ठ लेख तयार करूं शकतो. हेमिंग्वे क्यूबाच्या जंगलांत, सारोयान कॅलिफोर्नियांतल्या रायांमध्ये आणि टेनेसी विल्यम्स् ब्रॉडवेच्या गजबजाटांत एखादी अपूर्व कलाकृति निर्माण करण्यांत गुंग असतो—आणि देशभर अक्षरशः हजारों इतर स्त्रीपुरुष लहानमोठे, बरंवाईट लेखन करण्यांत धडपडत असतात.

एकट्या मझुरी संस्थानांत दोन हजार कथालेखक आहेत. इंडियाना युनिव्हर्सिटीच्या लेखनकला शिकवण्याच्या उन्हाळ्यांतल्या वर्गांत फार गर्दी होते म्हणून प्रवेशबंदीची सूचना जानेवारींतच लागते. नुसत्या साहित्य-दलालांची (लिटररी एजंट्स) संख्याच शंभराच्यावर आहे; तर ग्रामोफोन कंपन्यासाठीं गाणीं विकत घेणाऱ्या संस्था हजारांनीं आहेत. पुस्तकालयं

पांचशें, संपादक दोन हजार, वर्तमानपत्रं जवळजवळ प्रत्येक गावांत एक-असा ह्या देशाच्या पाठीवर काळं करणारा प्रचंड उद्योग आहे.

एवढं करून थोर कलाकृतींचं दुर्भिक्ष आहेच. न्यूयॉर्कच्या एका प्रसिद्ध प्रकाशनसंस्थेचा फिरता संपादक उत्कृष्ट कादंबरी मिळविण्यासाठीं सारखा हिंडत असतो. कुणी कांहीं चांगलं लिहिलेलं कानावर आलं कीं लगेच त्या लेखकाची गांठ घेतो. लेखनस्पर्धा तर सतत चालू असतात.

उच्च दर्जाची साहित्यनिर्मिति करणाऱ्यापेक्षां फुटकळ लिखाण करणारे अर्थात् बहुसंख्येनं आहेत. हजारोंनीं मोजतां येणारीं छोट्या मोठ्या धंद्यांची ट्रेड जर्नल्स् निघतात आणि त्यांत लेखन करून अनेकजण जगत असतात. दैनिक साप्ताहिकांत कॉलमवारी लिखाण करून बरेच जण पैसे मिळवतात. रेडियो, टेलिव्हिजनवर लिखाण करणाऱ्यांची संख्याहि उपेक्षणीय नाहीं. कुठल्याहि टोंकाच्या, धारेच्या, वजनाच्या नि दर्जाच्या लेखणीला ह्या देशांत वाव आहे. अन् तरीहि लेखनांत प्रसिद्धि व पैसा मिळविण्याच्या बाबतींत जीवघेणी चढाओढ आहे.

शाळांमधून वक्तृत्वकला, सभाधीटपणा, वाचनपद्धति, निबंध-लेखन यांबरोबरच लेखनकलेसंबंधीं सांगितलं जातं. पण लेखनकला शिकवण्याची खरी सोय विश्वविद्यालयांतच असते. बहुतेक सर्व प्रमुख विश्वविद्यालयांत लेखनकलेचे ( Creative writing ) वर्ग असतात. मुख्यत्वें वृत्तपत्रव्यवसाय शिकणारे अगर वाङ्मयाचा अभ्यास करणारे विद्यार्थी लेखनकलेचे कोर्सेस घेतात. प्रवेश मिळविण्याची पात्रता म्हणजे लेखनाची आवड हवी. थोडीफार, अप्रसिद्ध कां होईना, लेखनकामाठी केलेली असली तर फार चांगलं. वर्गांत ( आठवड्यांतून दोन ते तीन तास ) लेखनाचे तंत्रमंत्र शिकविले जातात. कथा, कादंबरी, काव्य, प्रवासवर्णन, निबंध व इतर फुटकळ लेखनाबद्दलचे आडाखे सांगितले जातात. शीर्षक, सुरुवात व शेवट, मधली चढण, व्यक्तिचित्रण, निसर्ग वर्णन, संवादलेखन, वगैरे मुख्य मुद्यांचं, अनेक प्रसिद्ध कलाकृतींच्या सहाय्यानं प्राध्यापक विवेचन करतात. मुख्य म्हणजे ह्या कोर्सच्या विद्यार्थ्यांना स्वतःचं लिखाण करून तें वर्गांत दाखवावं लागतं. त्यावर

चर्चा होते व सुधारणा करून तें प्रसिद्धीला पाठवण्याचीहि खटपट केली जाते. विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचा वाङ्मयप्रकार निवडून त्यावर टर्मभर लेखन करावं लागतं. सुमारें सहा कथा अगर कादंबरीचीं पन्नास पानं अगर वीस कविता असा कोटा प्रत्येकाचे बाबतींत ठरविला जातो. एखादी कल्पना देऊन त्यावर वर्गात कथेचा प्रारंभहि लिहायला सांगतात.

विश्वविद्यालयांतून या व्यतिरिक्त मुलांचं Writing workshop (साहित्य-चर्चामंडळहि ) असतं. आपल्याकडच्या वाङ्मय मंडळासारखंच—फर्ग्युसन कॉलेजमधल्या ' साहित्य सहकार ' सारखं—यांचं कार्य चालतं.

परंतु लेखनकलेचे हे वर्ग विश्वविद्यालयांच्या उन्हाळीं अधिवेशनांत अधिक जोरानं चालतात. जुलै—ऑगस्टमधलीं हीं उन्हाळी अधिवेशनं बहुतेक विश्वविद्यालयांतून गाजलेलीं असतात. आठ दहा आठवड्यांचा भरगच्च वेगवान् कार्यक्रम असतो; आणि सगळ्या टर्मचं शिक्षण ह्या अवधींत पदरांत पडतात. तऱ्हेतऱ्हेच्या नोकऱ्या करणारे लोक, सुट्या काढून उन्हाळी अधिवेशनांतून शिक्षण घेतात. देशभरचे अनेक धडपडे, आणि प्रसिद्धीची वाट सांपडलेले लेखकहि ह्या अधिवेशनाला येतात.

ब्लूमिंग्टन येथील इंडियाना युनिव्हर्सिटींत हे लेखनवर्ग (ह्याला Writers' conference असंहि म्हणतात—) आज वीस वर्षें चालू आहेत. गेल्या वर्षी तिथें काव्य, बालवाङ्मय, टेलिव्हिजनसाठीं लेखन, ललितेतर लेखन, कादंबरी व कथा असे सहा वेगवेगळे वर्ग जुलै महिन्यांत भरत होते. कुणालाहि लेखक बनवण्याचं झटपट विद्यालय काढण्याचा उद्देश नव्हता; तर लेखन करणाऱ्या होतकरू मुलामुलींना लेखनांतले आडाखे, अडथळे, खाचखळगे, वाढतीं क्षितिजं दाखवून त्यांची प्रतिथयश लेखकांची व चांगल्या प्रकाशन-संस्थेची ओळख करून देण्याचा हेतू होता.पंचवीस विद्यार्थ्यांचे हे सहा वर्ग खेळीमेळींनं, एकत्र राहून, पार पडले. शिकविणारे सर्वच गाजलेले लेखक वा टीकाकार होते. शिकविण्याशिवाय विद्यार्थ्यांना त्यांच्या लेखनाबाबत फुकट सल्लाहि दिला जात होता व विद्यार्थ्यांसाठीं एक खास वाचनालय व ग्रंथालयहि उघडलं होतं.

वृत्तपत्रव्यवसाय व वाङ्मय ह्या दोन्ही कॉलेजांतून ललितेतर लेखन शिकवण्याचीहि सोय असते. कथा कादंबरीपेक्षांहि मासिक, साप्ताहिकांतून

लेख लिहूं पहाणारे विद्यार्थी अधिक असतात व म्हणून article writing चे हे वर्ग नेहमीं भरलेले असतात. हजारों trade journals मध्यें, Digest वगैरेसारख्या मासिकांत, तऱ्हतऱ्हेचें लेख लिहून पोटाची सोय करणारे खूप असतात. स्वैपाकघरांतली नवी सोय, फ्रिजीडेअर कसा साफ ठेवाल, तुमच्या फुलदाणीवरचीं चित्रें, एक अविस्मरणीय व्यक्ति, वीस डॉलर्समध्यें सगळी दक्षिण अमेरिका. घरीं पोहण्याचा तलाव बांधा, तुमच्या नवऱ्याच्या मैत्रिणी...हजारों तऱ्हेचे विषय घेऊन ते लिहिले जातात. सगळ्या मोठ्या धंद्यांची व सर्व तऱ्हेच्या माणसांच्या आवडीनिवडी वाढवतील पुरवतील अशीं शेंकडों मासिकं प्रसिद्ध होत असतात. खेळाडूंसाठीं, मोटारहांक्यांसाठीं, हॉटेलवाल्यांसाठीं...शिवणकाम भरतकामाचें...सुतार, चांभार, लोहार ..सगळ्याच धंद्यांची. मुलांसाठीं, मुलींसाठीं, आयांसाठीं, आया होणारणींसाठीं व न होणारणीसाठींहि. शेतकीविषयक शेंकडों नियतकालिकं आहेत. 'फार्म जर्नल' ह्या शेतकी मासिकाच्या चाळीस लाख प्रति दरमहा छापल्या जातात. 'लेडीज होम जर्नल' मधल्या 'वाचकांच्या पत्रव्यवहारां'त छोटें पत्र छापलं गेलं तर शंभर डॉलर्स (पांचशे रुपये) मोबदला मिळतो.

लेखनाची हौस भागावी व पैसाहि मिळावा म्हणून ललितेतर लेखन करूं पहाणारे व करणारे म्हणूनच अनेक असतात. वर्गांमध्यें लेखासाठीं विषय कसे शोधावेत, माहिती गोळा कशी करावी, ज्या मासिकांत लेख छापायचा त्याची लेख लिहिण्याची धाटणी व त्यांना कशा तऱ्हेचा व कशा तऱ्हेनें लिहिलेला मजकूर हवा, एका विषयावर एकाहून अधिक लेख कसे तयार करावेत, लेखासाठीं फोटो कसे मिळवावेत, संपादकाकडे कशी विचारणा करावी, लेख टाईप कसा करावा, वगैरे सर्व शिकवतात. ह्या वर्गांतले विद्यार्थी वर्गांत लेख लिहून ते मासिकांना पाठवतात व बऱ्याच वेळेला मोबदला मिळवून आपले फी पुस्तकांचे पैसे बाहेर काढतात.

लेखनकामाठीचे धडे देणारीं अनेक मासिकं, पुस्तकं बाजारांत उपलब्ध आहेत. कॉलेजांतहि हीं पुस्तकं वापरतात. कांहीं यशस्वी लेखकहि ह्याचा उपयोग करतात. Writer's Magazine, Writer's Year Book, Writer's Digest, Writer' Markets हीं नियतकालिकं प्रसिद्ध आहेत.

Writer's Market हें पंचवीस वर्षांचं जुनं व पांचशें पृष्ठांचं नियतकालिक लेखकांना उपयुक्त असे लेख, कॉपीराईटचे नियम, ग्रंथ व लेख विक्रीची माहिती देतंच; पण तीन चार हजार नियतकालिकांचीं नांवं, पत्ते, मोबदल्याची पद्धत व कशा तऱ्हेचे लेख हवेत ह्यांची जंत्रीहि देतं. Writer's Year Book मध्यें असल्या माहितीबरोबरच रेडियो, फिल्म व टेलिव्हिजन केंद्रांना हव्या असलेल्या लेखांबद्दल सूचना येते.

निरनिराळ्या लेखन प्रकारांवर अशींच पुस्तकं आहेत—आपल्या कडच्या श्री. ना. सी. फडके यांच्या 'लघुकथा : तंत्र आणि मंत्र' सारखीं.

टपालमार्गे ललित आणि ललितेतर लिखाणहि शिकविलं जातं. सिन्सिनाटाय् ( ओहायओ ) हून पोस्टांतून असे कोर्सेस देणारा संपादक सांगतोः 'लेख तयार करणं म्हणजे बुद्धिबळाचा खेळ खेळण्यासारखें आहे. बुद्धिबळाप्रमाणें लेखनकलेचे नियम, आडाखे आहेत. आम्ही तुम्हाला चंद्र मिळवून देण्याचं वचन देत नाहीं, आम्ही फक्त आमच्या चाळीस वर्षांच्या लेखन शिकवण्याचा अनुभवाचा अर्क तुम्हांला देऊं करतो. दर सहा महिन्यांनीं आमचे धडे सुधारले जातात. पस्तीस डॉलर्समध्यें चवदा धडे पोस्टानं पाठवले जातात व चार महिन्यांत हा कोर्स पूर्ण होतो. दर धड्यानंतर तुम्हांला एक लेख तयार करावा लागेल. तो आम्ही तपासूं व सुधारूं. पैसे मिळवणारा लेखक तयार करणं हेंच आमचं ध्येय !'

नवशिक्या आणि नामवंत—दोघांचेंहि लिखाण खपवून देणारें दलालंहि तेजींत धंदा करतात. ह्या साहित्यदलालांच्या कचेऱ्या मुख्यत्वें न्यूयॉर्क व लॉस एन्जेलीस येथें आहेत. लॅबर्ट विल्सन, अलेक्स जॅक्सन, चार्लेस कार्सन हे literary agents प्रसिद्ध आहेत. एजंटांबद्दल लेखक चांगलं बोलत नाहीं. संपादकाला अगर प्रकाशकाला सरळ गांठणं अधिक चांगलं, असं सर्व म्हणतात. पण जवळ जवळ सगळेच लेखक एकदां तरी एजंटाची पायरी चढतात. लेख सुधारून संपादकाकडे पाठवणं व त्याचा स्वीकार झाला तर मोबदल्यांत आपलं कमिशन घेणं हें एजंटाचं काम ! त्यासाठीं त्याला प्रकाशक व लेखक दोघांनाहि हातीं धरावं लागतं. संपादक प्रकाशकांशीं स्नेह ठेवणं, त्यांना जेवणं देणं हें अधिक महत्त्वाचं असतं. सर्वसाधारणपणें ह्या एजंटांचा ऑफिसभाडं, स्टेशनरी, टपाल हंशील,

टायपिस्टचा पगार वगैरे वर्षाचा खर्च आठ हजार डॉलर्स असतो. लेखा-वर सुमारे दहा टक्के ( लेख परदेशांत खपला तर वीस टक्के ) कमिशन तो घेतो. तेव्हां धंदा चालवण्यासाठीं व नीट जगण्यासाठीं त्याला दरसाल कमीतकमी दहा बारा हजार डॉलर्स किंमतीचे लेख खपवावे लागतात. म्हणून सगळेच एजंट्स दरसाल कमिशन देणारे व पंधरावीस हजार कमवूं शकणारे, रुळलेले व हुकमी असे पांचसहा लेखक गांठून ठेवतात. एजंटांचा महत्त्वाचा वेळ ह्या लेखकांचें लेखन खपवण्यांत जातो. उरल्या वेळांत मग नवे लेखक शोधणं, त्यांच्या कृती सुधारून देणं व त्या खपवणं ह्यांत जातो. लेखन सुधारून देण्याचं काम हे दलाल करतातच, पण त्यांचं मुख्य कौशल्य म्हणजे लेख हमखास खपेल असं प्रकाशन निवडणं, त्या संपादकाच्या आवडीस अनुसरून लेख बदलून घेणं हें होय. लेख कसा व कुठं खपवावा हें तंत्र एजंटाला आधीं माहित असावं लागतं.

एजंट लेख वाचण्याची फी पांच डॉलरपासून आकारतो. एक लाख शब्दाच्या लेखाला तीस डॉलर्स घेतो. कवितेला दहा डॉलर घेतो. अर्थात् प्रत्येक एजंटाचे दर वेगळे असतात.

एजंटांत चढाओढ तीव्र असते. लेखकाला आकर्षित करण्यासाठीं अनेक क्लुप्त्या वापरल्या जातात. कांहीं एजंट्स लेखनावरचीं पुस्तकं फुकट पाठवतात. हॉलीवुडचा एक एजंट 'साभार परत' केलेल्या लेखालाहि पैसे देतो तर रॉकेफेलर प्लाझामधला एजंट लेखकाजवळ प्रतिभेचं देणं कितपत आहे ह्याची literary aptitude test घेतो.

छोटा टाईपरायटर व साडेआठ–बाय–अकरा इंचाच्या कागदांच्या चळती–ही लेखकांचीं मुख्य आयुधं. लेख नेहमीं टाईप करून धाडावे लागतात. शब्दसंख्या, लेखकाचा पत्ता वगैरे पहिल्या पानावर उजव्या कोपऱ्यांत लिहिण्याची रीत आहे. बऱ्याच संपादकांना लेखाबरोबर त्याचा अगदीं छोटा सारांश हवा असतो. धंदेवाल्या मासिकांना उपशीर्षकंहि हवीं असतात. एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीचं मत उधृत केलं असेल तर त्याचं पत्रहि सोबत लागतं. लेख पाठवण्याच्या आधीं पत्र पाठवून लेखाचा मसुदा, शीर्षक, शब्दसंख्या कळवून लेख हवा काय अशी विचारणा करा-यची पद्धत आहे. लेख परतीसाठीं तिकिट पाठवावं लागतंच.

२५८२३ २५७ १८-१-५८



प्रथितयश लेखक dictaphoneहि वापरतात व लेख मोठ्यानं बोलून उतरवून ठेवतात. प्रथितयशवाल्यांचें टायपिस्ट, वकील, इन्कमटॅक्स सल्लागारहि असतात. बहुतेकांच्या नशिबी हें नसतंच. सिगरेट फुंकीत, बीअर घेत, कुठें अडचणींत बसूनच ' बिचारा लेखक ' लिहीत असतो.

ज्यून ब्राऊन ही अशीच एक धडपडणारी, फुटकळ लिहिणारी लेखिका मला विस्कॉन्सिन पेन वुईमेन लीगच्या सभेंत भेटली. विस्कॉन्सिन संस्थानांतल्या वर्तमानपत्र, रेडियो, टी. व्ही., मासिकं वगैरे ठिकाणीं लेखन करणाऱ्या स्त्रियांची ही संस्था अमेरिकेंतल्या सर्व स्त्री लेखिकांच्या संस्थांची शाखा आहे. ज्यून ब्राऊनला लहानपणापासून लेखनाची आवड. शाळेंत तिनं एक नाटिका लिहिली होती. कॉलेजांत लेखनकलेचा अभ्यास केला होता. लग्न झाल्यावर ती आपलं साहित्य प्रसिद्धीसाठीं पाठवूं लागली. गेल्या आठ वर्षांत तिच्या सहा कथा, आठ प्रवास वर्णनं, चार लघुनिबंध छापून आले. ' लेख कसें लिहावें ' असा एक लेखहि तिनें लिहिला. मिळालेल्या मोबदल्यांतून तिनें टाइपरायटर, डिक्टाफोन व एक स्कूटर घेतला आहे. नवरा कामावर गेला कीं ती नेमानं दोन तास लेखन व दोन तास वाचन करते. लेख पुन्हां पुन्हां सुधारते. तिचे लेख परत येतात; मग ती दुसऱ्या मासिकाकडे रवाना करते. कुठला लेख कुठें हिंडतो आहे हें कळायला तिनें कार्ड केली आहेत. एका कार्डाचा नमुना असा.—

लेख: 'दी स्पार्टन'. शब्दसंख्या: १५००. लेखनकाल: जुलै-ऑगस्ट १९५७.

| | | | |
|---|---|---|---|
| पाठवणी-थिस् वीक् | — | १ आक्टोबर | (साभार परत) |
| लेदरनेक् | — | ११ आक्टोबर | (साभार परत) |
| रेडबुक् | — | ३० आक्टोबर | (साभार परत) |
| पेबॉय् | — | ७ नोव्हेंबर | (साभार परत) |
| एस्क्वायर् | — | ९ डिसेंबर | (साभार परत) |
| कॉस्मॉपॉलिटन् | — | ३ जानेवारी | (साभार परत) |
| लिबर्टी | — | १ फेब्रुवारी | |
| लिबर्टीनं लेख स्वीकारला | — | १५ फेब्रुवारी | |
| मोबदल्याचा चेक | — | ७५० डॉलर्स | |

परत आलेला लेख दुसऱ्या मासिकाकडे धाडतांना त्या मासिकाच्या धोरणानुसार लेखांत बदल करावा लागतो. लेख तयार करतांनाच साधारण कुठल्या मासिकांत तो येऊं शकेल हें ज्यून पहाते व त्याप्रमाणें लेखन करते.

नवऱ्याला चांगली नोकरी असल्यामुळें ज्यूनला पैसे मिळविण्याची जरूरी आहे असं नाहीं. तरीहि इतर लेखकांप्रमाणें ती भरपूर कष्ट करते. सिड सिंपल हा चाळीस वर्षांचा सेंट लुईचा लेखक मात्र ह्या लेखनकामार्टांत अगदी ओरबडला गेला आहे. लेखनाची कंड म्हणून तो कथा लिहितो. त्या परत येतात. मग तो गांवभर हिंडतो. कुठल्या दुकानांतल्या शो विंडोंत वेगळी सजावट दिसली कीं त्यावर तो लेख लिहितो. त्या दुकानदाराकडून जेवण काढतो व लेख कुठल्या तरी decoration च्या मासिकाला धाडून २५–३० डॉलर्स मिळवतो. डुकरांच्या रोगापासून हिंदुस्थानांतल्या योगापर्यंत कांहींबाहीं लिहूं पाहतो. मित्राचा टाईपरायटर ( व कागद ) वापरतो. महिन्याचा जेमतेम खर्च कसाबसा काढतो...सान फ्रान्सिस्कोचा गॅरी स्नायडर पैसा व प्रसिद्धी कस्पटासमान मानतो. बापाचं खेडेगांवीं चांगलं अर्धसाप्ताहिक आहे. पण हा फ्रिस्को नगरांत कलंदरासारखा राहतो. नवकाव्य लिहितो. टीकाकारांशीं उद्धटपणानं वागतो. स्वतःच सायक्लोस्टाईलवर कवितेच्या मोजक्या प्रति छापतो.

न्यूयॉर्कला व्यंगचित्रकार डग गिल्मन हा, इतर अनेक कार्टूनकाल्यांच्या बरोबर, दर बुधवारीं सगळ्या वृत्तपत्रांकडे आपली कार्टून्स घेऊन जातो. एखादं खपलं तरी मोबदल्यांतले पंचवीस टक्के कार्टूनची कल्पना सुचवणाऱ्याला द्यावे लागतातच...लेन गर्चिनसारखा एखादा नशिबवान् लेखक एकाच कल्पनेची कथा लिहितो, ताणून कादंबरी बनवतो, वांकवून रेडियोवर नेतो व मग मिरवत हॉलिवुडला जातो. एखाद्या बेटावर, व्हीलामध्यें एकांतांत लेखन करतो व लाखांनीं कमावतो.

परंतु गॅरी अगर लेनसारखे फार थोडे. बहुसंख्य ज्यून ब्राऊन किंवा सिड सिंपलसारखे धडपडे पण मनस्वी आयुष्य काढीत लेखनकामाठी करीत असतात.

●●●

# ११ हॉलीवुडची वारी

१ जुलैला लॉस एन्जेलीस्च्या विमानतळावर मी उतरतांच अनेक छायाचित्रकार, बातमीदार व बघे लोक धांवपळ करूं लागले. माझं प्रचंड स्वागत पाहून क्षणभर मला भोंवळ आल्यासारखं झालं. भारतांत नाहीं, पण चित्रसृष्टीच्या ह्या माहेरघरीं तरी आपल्याला लेखक म्हणून मानतात ह्या कल्पनेनं, विमान खालीं आलं तरी मी वरवर जाऊं लागलों. त्याच तोऱ्यांत सामान सांवरलं. जिना उतरून सगळ्यांना सामोरा आलों—पण तेवढ्यांत सगळी झुम्मड मला टाळून दुसऱ्या दिशेला गेली ! मागून उतरलेल्या कुणा प्रवाशाभोंवतीं लोकांनीं कडं केलं. कॅमेऱ्यांवर बसवलेले दिवे पेटूं लागले. वह्या, पेन्सिली सरसावल्या गेल्या. उन्हाचा कवडसा हिरवळीवर सरकावा, तसा चकचकीत कपडे केलेला लोकांचा थवा स्वच्छ मैदानावरून घाईनं जाऊं लागला. मी भानावर आलों. लॉस एन्जेलीसला आपण आलों तें एक सामान्य माणूस म्हणून ! सिनेमावाला म्हणून नव्हे नि जगप्रवासी म्हणूनहि नव्हे ! स्वतःला मी सांवरलं व मला उतरून घ्यायला येणाऱ्या डिलमन नांवाच्या न पाहिलेल्या व्यक्तीला शोधूं लागलों.

विमानतळावरच्या त्या प्रचंड इमारतींत मी हिंडत होतों. पण आतां कुणी कुत्रंसुद्धां माझ्याकडं बघत नव्हतं. अनेक उतारू उलटसुलट जात

परत आलेला लेख दुसऱ्या मासिकाकडे धाडतांना त्या मासिकाच्या धोरणानुसार लेखांत बदल करावा लागतो. लेख तयार करतांनाच साधारण कुठल्या मासिकांत तो येऊं शकेल हें ज्यून पहातें व त्याप्रमाणें लेखन करते.

नवऱ्याला चांगली नोकरी असल्यामुळें ज्यूनला पैसे मिळविण्याची जरूरी आहे असं नाहीं. तरीहि इतर लेखकांप्रमाणें ती भरपूर कष्ट करते. सिड सिंपल हा चाळीस वर्षांचा सेंट लुईचा लेखक मात्र ह्या लेखनकामाठींत अगदी ओरबडला गेला आहे. लेखनाची कंड म्हणून तो कथा लिहितो. त्या परत येतात. मग तो गांवभर हिंडतो. कुठल्या दुकानांतल्या शो विंडोंत वेगळी सजावट दिसली कीं त्यावर तो लेख लिहितो. त्या दुकान-दाराकडून जेवण काढतो व लेख कुठल्या तरी decoration च्या मासि-काला धाडून २५–३० डॉलर्स मिळवतो. डुकरांच्या रोगापासून हिंदु-स्थानांतल्या योगापर्यंत कांहींबाहीं लिहूं पाहतो. मित्राचा टाईपरायटर ( व कागद ) वापरतो. महिन्याचा जेमतेम खर्च कसाबसा काढतो...सान फ्रान्सिस्कोचा गॅरी स्नायडर पैसा व प्रसिद्धी कस्पटासमान मानतो. बापाचं खेडेगांवीं चांगलं अर्धसाप्ताहिक आहे. पण हा फ्रिस्को नगरांत कलंदरा-सारखा राहतो. नवकाव्य लिहितो. टीकाकारांशीं उद्धटपणानं वागतो. स्वतःच सायक्लोस्टाईलवर कवितेच्या मोजक्या प्रति छापतो.

न्यूयॉर्कला व्यंगचित्रकार डग गिल्मन हा, इतर अनेक कार्टूनकारांच्या बरोबर, दर बुधवारीं सगळ्या वृत्तपत्रांकडे आपली कार्टून्स घेऊन जातो. एखादं खपलं तरी मोबदल्यांतले पंचवीस टक्के कार्टूनची कल्पना सुचवणाऱ्याला द्यावे लागतातच...लेन गर्चिनसारखा एखादा नशिबवान् लेखक एकाच कल्पनेची कथा लिहितो, ताणून कादंबरी बनवतो, वांकवून रेडियोवर नेतो व मग मिरवत हॉलिवुडला जातो. एखाद्या बेटावर, व्हीला-मध्यें एकांतांत लेखन करतो व लाखांनीं कमावतो.

परंतु गॅरी अगर लेनसारखे फार थोडे. बहुसंख्य ज्यून ब्राऊन किंवा सिड सिंपलसारखे धडपडे पण मनस्वी आयुष्य काढीत लेखनकामाठी करीत असतात.

●●●

# ११ हॉलीवुडची वारी

१ जुलैला लॉस एन्जेलीस्च्या विमानतळावर मी उतरतांच अनेक छायाचित्रकार, बातमीदार व बघे लोक धांवपळ करूं लागले. माझं प्रचंड स्वागत पाहून क्षणभर मला भोंवळ आल्यासारखं झालं. भारतांत नाहीं, पण चित्रसृष्टीच्या ह्या माहेरघरीं तरी आपल्याला लेखक म्हणून मानतात ह्या कल्पनेनं, विमान खालीं आलं तरी मी वरवर जाऊं लागलों. त्याच तोऱ्यांत सामान सांवरलं. जिना उतरून सगळ्यांना सामोरा आलों—पण तेवढ्यांत सगळी झुम्मड मला टाळून दुसऱ्या दिशेला गेली ! मागून उतरलेल्या कुणा प्रवाशाभोंवतीं लोकांनीं कडं केलं. कॅमेऱ्यांवर बसवलेले दिवे पेटूं लागले. वह्या, पेन्सिली सरसावल्या गेल्या. उन्हाचा कवडसा हिरवळीवर सरकावा, तसा चकचकीत कपडे केलेला लोकांचा थवा स्वच्छ मैदानावरून घाईनं जाऊं लागला. मी भानावर आलों. लॉस एन्जेलीसला आपण आलों तें एक सामान्य माणूस म्हणून ! सिनेमावाला म्हणून नव्हे नि जगप्रवासी म्हणूनहि नव्हे ! स्वतःला मी सांवरलं व मला उतरून घ्यायला येणाऱ्या डिलमन नांवाच्या न पाहिलेल्या व्यक्तीला शोधूं लागलों.

विमानतळावरच्या त्या प्रचंड इमारतींत मी हिंडत होतों. पण आतां कुणी कुत्रंसुद्धां माझ्याकडं बघत नव्हतं. अनेक उतारू उलटसुलट जात

येत होते, सामानांचे ढीग हालवले जात होते, निरोपांचे गुच्छ जागजागीं उमलत होते, टेलीफोन घणघणत होते, विमानं घिरट्या घालीत होतीं. मला एकदम एकाकी वाटलं. ह्या धनाढ्य व व्यसनी शहरांत एकट्यानं राहायचं ह्या विचारानं उदास वाटलं. लॉस एन्जेलीस्मधल्या गुन्हेगारी-बद्दल ऐकलेल्या अनेक कथा आठवल्या. आणि तेवढ्यांत हंसऱ्या मुद्रेनं एकानं आपला हात माझ्यापुढें केला.

" आपण–" मी चाचरत म्हटलं.

" मीच ! वेलकम् फ्रेंड् " त्यानं माझा हात घुसळला. तो डिलमन असावा असं मला वाटेना. त्याच्या तोंडाला भर सकाळींच दारूचा वास येत होता.

" मी बॉब् डिस्पेअर ! हॉलीवुडमधला नट ! " तो हंसून म्हणाला. मी ओळखलं, स्वारी सपाटून प्यायली आहे. आणि असणार कुठल्यातरी गुंडांच्या टोळींतली. हात सोडवून मी घाईनं म्हटलं, " मी सामान घेऊन येतों. इथंच थांब. " अन् तसाच इन्फर्मेशन डेस्ककडे धांवलों.

बॉब डिस्पेअर आपल्याच तारेंत निघून गेला. जराशानं मी माझं सामान गोळा केलं, टेलिफोनच्या खोलींत घुसलों व मॉंटरे गांवच्या ग्रानिस बाईला बोलावलं.

" मी सुझान–"

सुझानचा आवाज कानावर पडतांच मी कळवळून माझी कहाणी सांगि-तली. आणि डिलमन विमानतळावर आला नाहीं म्हणून तक्रार केली.

" डिक् तुला विमानतळावर भेटणार नव्हताच. तूं व्हाईट कुटुंबांत उतरणार आहेस ना ? तिथं जा. तिथं डिक तुला भेटेल. तोसुद्धां आज रात्रीं. "

माझ्या गोंधळाचं मला हंसू आलं. मी व्हाईटकडे जायचं अजिबात विसरलों होतों. तेवढ्यांत सुझान तिकडून म्हणाली,

" आणि विमानांत तुझ्याबरोबर कोण होतं, माहीत आहे का ? हें काय, माझ्या पुढ्यांतल्या वर्तमानपत्रांतच लिहिलं आहे. ' दोन वर्षांच्या गैरहजेरीनंतर मार्लिन मन्रो हॉलीवुडला जात आहे'—महाराजा, तुम्हाला

मार्लिन ओळखतां कशी आली नाहीं? बघत कुठं होतात? तिच्या बुटांकडे काय?"

सुझानचं हंसणं थांबेना म्हणून मी फोन बंद केला. ह्या घटनेबद्दल आपली टिंगल होत राहणार हें उमगलं. पण मार्लिन मन्रोचा नवराहि आलाय् काय, आला असला तर भेटेल काय, हेच विचार मनांत घोळत होते. आर्थर मिलरबद्दल मन्रोपेक्षां मला अधिक कुतूहल होतं.

व्हाईट साहेबाचे घरांत मुक्काम केला. नेहमीप्रमाणें मराठी नांवाची खैरात मनांत सुरू झाली. नॉर्मन व्हाईटला नानासाहेब गोरे व मिसेस व्हाईटला सुमतीबाई. त्यांची परदेशी असलेली पण घरांत असंख्य फोटोंतून हजेरी लावणारी अर्थात् शुभा झाली. (तिचं नांव लीला होतं व हें नांव हिंदी असल्याचा व्हाईट कुटुंबाला अभिमान होता.) हे ना. ग. गोरे मात्र समाजवादी नसून चर्चचं काम करीत असत. सिनेमा जगतापेक्षां, लॉस एन्जेलीसला इतर खूप, चांगल्या नि प्रचंड गोष्टी बघण्यासारख्या आहेत, हें ते मला सारखं पटवीत होते.

व्हाईट बुवांचं म्हणणं खोटं नव्हतं. हॉलीवुड हा त्या शहराचा एक तुकडा होता. खुद्द हॉलीवुडमध्यें मोठाले उद्योगधंदे चालू होते. लॉस एंजेलीस ४५० चौरस मैलांचं, २५–२६ गांवांचं बनलेलं शहर होतं. दररोज १८०० नवीं माणसं शहरांत कायमचीं रहायला म्हणून येत होतीं. तर शहराच्या प्रचंड 'फ्रीवे' मार्गांवरून दर तासाला ६० हजार मोटारी धांवत असत. गांवांत उद्यानंच ११५ होती. इस्पितळं १५० चे वर होतीं. आर्ट गॅलरी, मोठालीं चर्चेस (ग्रीकांचं देऊळ तर दृष्ट लागण्यासारखं–), फार्मर्स मार्केट म्हणून प्रचंड मंडई, अवाढव्य विश्वविद्यालय, साबणाचे, लोखंडाचे, तेलाचे, औषधांचे, मोटारींचे कारखाने–एल. ए. हे अमेरिकेंतलं, न्यूयॉर्क व शिकागोचे खालोखाल महत्वाचं शहर मानतात तें उगाच नव्हे!

डिक् डिलमन् भेटण्यापूर्वी फार्मर्स मार्केटांतून चक्कर मारली. कुठल्याहि देशांतलं, कसलंहि जेवण देणारं प्रचंड उपहारगृह पाहिलं. हिंदी जेवण म्हणून पुऱ्या, चिकन, कढी व ओनियन रिंग्ज् (कांद्याची भजी) विकलीं

जात होतीं. आर्ट गॅलरींतली तींच तींच नवीं जुनीं चित्रं पाहिलीं. शिल्प-कलेचे नवे नमुने पाहिले. ग्रीकांच्या देवळांतल्या घुमटाचे आंत काढलेलीं बायबलमधलीं मोठीं चित्रं पाहिलीं. डांबराचीं तळीं व त्यांत सांपडलेले हजारों वर्षांपूर्वींचे प्राणी पाहिले. उलट सुलट व एकावरून एक जाणारे प्रचंड रस्ते ( फ्रीविज्) पाहिले. मग घरीं आलों व मर्लीन मन्रोचे पेपर-मध्यें आलेले फोटो पाहात बसलों. केसांना दिलेला हिरवा रंग तिनं आतां काढून टाकला होता. दीर्घ विरहानंतर हॉलीवुडला आल्यानं काय वाटतं तें तिनं लाजत ( हा बातमीदाराचा शब्द) सांगितलं होतं. आपल्याला नवऱ्याचा एवढाहि विरह सहन होत नाहीं, पण आर्थर नाटक लिहीत आहे त्यांत प्रगतीहि होत आहे, म्हणून आपण खूष आहोंत. असंहि तिनं छाती फुगवून ( हेहि बातमीदाराचे शब्द—) सांगितलं होतं. नवा सॅक् ड्रेस ‘ ऑरगॅनिक ’ आहे असं गूढ मतहि तिनं जाहीर केलं होतं...

डिक् डिलमन मोठा उमदा मुलगा होता. ‘ युनिव्हर्सल इंटर नॅशनल ’-मधल्या स्क्रिप्ट लिहिण्याच्या खात्यांत नोकरी करीत होता. त्यापूर्वीं टेली-व्हिजनमध्यें व आधीं एका मामुली मासिकांत त्यानं काम केलं होतं. अप-यशाची आठवण न काढतां, मोठ्या लेखकाचा पाठपुरावा करीत तो जगत होता. हॉलीवुडच्या राक्षसी चढाओढींत तो गटांगळ्या खात होता. चळवळ्या होता. उत्साही होता. लहान मुलासारखा होता. ऊन—पावसासारखा होता. थोडक्यांत डिक् डिलमन म्हणजे हॉलीवुडचा ग. रा. कामत होता.

“ तुझ्या आगमनाचं जरा आधीं कळलं असतं तर भरगच्च कार्यक्रम आंखतां आला असता ! तुमचा कुणी प्रोड्यूसर सध्यां इथें असा हिंडतोच आहे—”

“ हरकत नाहीं—” मी डिक्ची समजूत घातली. “ तुला वेळ असेल तर नि तूं दाखवशील तें पाहायची माझी इच्छा आहे. पाहुणा म्हणून नव्हे. तुझा स्नेही म्हणून—”

“ सुदैवानें मला दोन दिवस सवड आहे—”

डिक्च्या गाडींतून भटकतांना त्याला, नेहमीं सांगावं लागतं तसं हिंदु-स्थानबद्दल चार मामुली शब्द सांगावे लागले. त्यानं तें वरवर ऐकून घेतलें

व मग हिंदी चित्रपटाचा विषय निघतांच तो रंगून गेला. मराठी भाषा, मराठी चित्रपट, त्याचा आश्चर्यकारक इतिहास—हें सारं त्याला नवं होतं. 'सावकारी पाश'पासून 'सौभाग्य'पर्यंत व बाबूराव पेंटरपासून राजा ठाकूर-पर्यंत जें जें आठवलं त्याचा मी भडिमार केला.

मेट्रो गोल्डविनमध्यें डिक् भांडला होता व आर.के. ओ.त त्याचा खांदे-पालट होत होता. तेव्हां आम्ही तडक युनिव्हर्सल इंटर नॅशनलकडे मोर्चा वळवला. एकूण १२५ सिनेमाचे व ७ टेलिव्हिजनचे स्टुडियो होते. एक पाहिला तरी पुष्कळ होता हा विचार. अन् खेरीज फार वेळहि नव्हता सगळ्या स्टुडियोत हिंडायला...युनिव्हर्सल इंटर नॅशनल स्टुडिओला सिनेमा स्टुडियो म्हणणं कसं तरीच वाटलं. पन्नाशीला आलेली ही संस्था म्हणजे एक शहरच आहे. इथं स्वतंत्र पोलिस खातं, आगनिवारण खातं आहे. ह्या नगराला एक स्वतंत्र मेयरहि आहे. बरबँक शहरांत हा स्टुडियो पूर्वी होता. पण व्याप इतका वाढला व विशेषत: कर इतके डोईजड झाले कीं बरबँकपासून वेगळं होऊन हें एक ५०० चे वर एकरांचं स्वतंत्र शहरच निर्माण करण्यांत आलं.

स्टुडियोत जाण्यापूर्वीं प्रथम ग्लेंडेलकडे मोर्चा वळवला. सहा सालीं हॉलीवुडला पहिला चित्रपट निर्माण करण्यांत आला, त्यावेळची जागा पाहिली. ह्या जागेवर कांहींच वस्तू नव्हत्या. ग्लेंडेल सीन म्हणून एका मेपेल वृक्षांच्या समूहाकडे टक लावायची नि बॉयास्कोप काढणाऱ्या पहिल्या वहिल्या कलावंताचं स्मरण करायचं ! मॅक्स सुंटरनं त्याकाळीं काढलेल्या स्टुडियोचे अवशेष तिथेंच होते. काळाच्या उदरांत तो स्टुडियो गेला. त्या जागेवर तलाव बांधले गेले व बेदींग ब्यूटीज् चित्रपटांतून त्यांचा वापर करण्यांत आला.

पलीकडे टेकड्यांच्या नि झाडांच्या गर्दीत एक 'वेस्टर्न टाऊन' उभं होतं. डिक् म्हणाला, 'सोळा सालापासून हा राक्षसी, रानटी सेट बांधला आहे नि अजून तो वापरतात.' वेस्टर्न मधल्या झोंपड्या, घोडदौड, त्यांतलंच क्युबांतलं जंगल ओझरतं पाहिलं व पुढें निघालों.

मौंट हॉलीवुड ड्राईव्हला डावी घातली व मग डिक्नें एकदम गाडी थांबवली. समोर जुन्या मोटारी, आगगाड्या, ट्रामगाड्या होत्या. पुराण-

वस्तु संग्रहालयांत ठेवण्याजोग्या. किती जुनी मॉडेल्स. पहिल्या वाहिल्या फोर्ड गाड्या, वाफेवरची इंजीनं, उघड्या डब्यांच्या आगीनगाड्या, घोड्यांच्या स्ट्रीट कार्स. तसंच स्टेशनं, रूळ, सिग्नल. हें सारं चित्रपटांतले जुने देखावे चितारण्यासाठीं राखून जपून ठेवलं होतं.

युनिव्हर्सल–इंटरनॅशनलचा दर्शनी भाग प्रेक्षणीय नव्हता. आधीचं उन्हाळ्यानं नि घामानं अंग चिकचिकत होतं. अन् त्यांत धुळीचा, भोंव-तालच्या रखरखाटाचा त्रास होत होता. मोठा रस्ता खोदण्याचं काम चालू होतं त्यामुळें सगळं विद्रूप वाटत होतं. शिवडीच्या मिनर्व्हा मुव्हीटोनमध्यें आल्यासारखं वाटत होतं.

पण स्टुडियोंत प्रवेश केला नि शांतता आणि स्वच्छता मन दबवून टाकूं लागल्या.

स्टुडियोला इथं लॉट म्हणतात. औट डोअर दृश्यं दाखवणाऱ्या बॅक लॉट मध्यें फेरी मारली. तिथें मायानगरी वसली होती. अनेक तऱ्हेचीं सेटिंग्ज खडीं होतीं. कांहींची उभारणी चालली होती. कांहींची पाडापाड करीत होते. पुन्हां वापरण्याच्या सामानाला लाल फिती बांधल्या जात होत्या. जागा साफ केल्या जात होत्या, तिथें नवे सेट्स उभारण्यांत येणार होते. मागच्या मोठ्या डोंगरांतून खराखुरा धबधबा बांधण्याची खोदाखोद चालू होती. सामानाच्या ट्रक गाड्या मुंग्यासारख्या काम करीत होत्या.

कायम स्वरूपाचे सेट्स् आकर्षक होते. टॉवर ऑफ लंडन हा खराखुरा टॉवर ऑफ लंडन वाटत होता. त्याच्या तिन्ही बाजूला कमानी, तुरुंग तयार केलें होते व इंग्लंडच्या इतिहासाचीं कितीतरीं पानं सिलेलाईटवर आंखली जात होतीं. घरं, पोस्ट ऑफिसं, शाळा, चर्चेस, शॉपिंग एरिया-सारं खरंखुरं बनविलं होतं. एक फ्रेंच गांवांतला नि एक स्पॅनिश गांवांतला रस्ताहि त्या त्या भाषेंतल्या पाट्यासह नटवून ठेवला होता. जुन्या नमुन्याचं एक चांचें जहाज फारच प्रेक्षणीय होतं. चार्लस लॉफ्टनपासून टीरोन पॉवरपर्यंत अनेकांना त्यांत काम करावं लागलं होतं.

अंकल टामस केबिनमधला एक सेट अजून उभा होता. 'मॅग्नीफिसंट ऑब्सेशन' मधल्या रॉक हडसनच्या घराचे नि 'हंड्रेड मेन अँड अ गर्ल'

मधल्या डायना डर्बीनच्या खोलीचे सेटींगवर अजूनहि धूळ बसली नव्हती. हे सगळे सेट्स् पहातांना ते ते चित्रपट डोळ्यापुढें उलगडूं लागले. चार्लस लाफ्टन, टायरोन पॉवर, जेम्स कॅग्ने, मार्लिन डिट्रिच, मेरी ॲस्टर-सार्‍या नटनटी इथं कुठंतरी मेकअप करून उभ्या असतील असं वाटलं. लंडनचा टॉवर, चांच्यांचं जहाज पुन्हां पहात उभा राहिलों. अन् मग डिक्नें, लॉन चॅनीच्या एका चित्रपटांतलं जुनं भव्य सेटिंग तसंच टिकवून ठेवलं होतं, तें दाखवलं तेव्हां तर अनेक भावनांच्या खळबळीनं तिथेंच एका खुर्चीवर बसून राहिलों....

मोठालीं साऊंड स्टेजेस, कचेर्‍या, स्पेशल अिफेक्टचे स्टुडियो, मेकअप खातं, मुलांसाठीं शाळा, सुतारखातं व शिल्प खातं सगळीकडून चक्कर मारली. लॅना टर्नरनं नुकताच एक इतिहास निर्माण केला होता. तिच्या मेकअप्रूमचे फोटो घेतले. A Time to Love A Time to Die, Dice in the Mirror Raw Wind of Eden वगैरे आगामी चित्रपटांतले फोटो व शो कार्डस् पाहिलीं. Once Upon A Horse मधलीं कांहीं दृश्यं पुन्हां चित्रित केलीं जात होतीं, तिथें जरा रेंगाळलों. मग परत घराकडे वळालों.

" कसे काय वाटले स्टुडियो "? व्हाईट पतीपत्नींनीं विचारलं.

" जुन्या गोष्टी जतन करून ठेवल्या आहेत, त्या फार आवडल्या. बाकी कांहीं वेगळं वाटलं नाहीं. आमच्याकडे असे स्टुडियो आहेत. शूटिंग पहातांना तर पुण्या–मुंबईत आल्यासारखं वाटलं. इथें सगळं प्रचंड प्रमाणावर आहे, एवढंच काय तें–"

चित्रपटसृष्टीला नांवं ठेवल्यामुळें व्हाईट जरा खूष झाले. खुद्द हॉलीवुडचा सिनेमाशीं संबंध उरला नाहीं, स्टुडियो नि नटनटींची घरं हॉलीवुडलँडपासून दूर गेलीं आहेत, हें ते पुन्हां पटवून देऊं लागले.

नटनटी राहातात तो बेव्हर्ली हिल्स्चा भाग मात्र दृष्ट लागण्यासारखा आहे. हें देखील एक वेगळं नगर आहे. पांच चौरस मैलांचं, पन्नास हजार वस्तीचं, हॉटेल्स, व्हीला, ब्यूटी, सलून्सनें नटलेलं स्वर्गीतलं नगर. बेवर्ली ड्राईव्हच्या दुतर्फा असलेल्या मॅग्नोलियांच्या रांगांतून गेलं कीं मन कसं धुंद

होतं. जेरी लुईज्चं तीन लाख डॉलर्सचं नवं घर थक्क करून सोडतं. जिमी डुरांटीचं वेडंवांकडं पण सुबक घर गुदगुल्या करतं. अन् मग सिल्व्हिया सिडनेची छोटी आकर्षक बंगली नजर खिळवून टाकते. पामच्या रांगांतून चित्रचंद्रिकांच्या बंगल्या दिसतात. कुठलींहि दोन घरं सारखीं नाहींत हें लक्षांत येतं. अमेरिकेभर एका छापाचीं बांधलीं जाणारीं घरं पाहून विटलेली नजर, वास्तुशास्त्रांतलं हें धाडस व स्वच्छंदीपणा पाहून खुलतं. बेवर्ली बुलेवार्डवरुन सांता मॉनिका बुलेवार्डकडे जातांना 'स्पोर्ट पेज्' नि 'टेल् ऑफ द क्लॉक्' ही अति प्रसिद्ध होटेल्स लागतात. मोटार पार्क करायला जागा नसल्यानं थांबतां येत नाहीं व मन चुळबुळत बसतं.

डिक म्हणाला, "इथें सगळे रस्ते सनसेट बुलेवार्डला मिळतात–" वेगवेगळ्या वाटांनीं धांवणारी आमची मोटार सनसेट बुलेवार्डला सारखी येत होती. सनसेट वरचीं घरं तर खूप मोठालीं, प्रशस्त नि आकर्षक होतीं. एक घर तर अगदीं टेलीव्हिजन सेटसारखं होतं, तर एक जणूं दारूची बाटली होती. किम् हंटरचं मोटेलवजा उपरं घर होतं. शर्ली टेम्पलचा महाबळेश्वरला असतात तसा बंगला होता. (ही मोठी बालनटी आतां हॉलीवुड सोडून फ्रिस्कोला राहाते–) झासु पिट्चं घर प्रशस्त, सोपेवजा, भरलेलं, तर जोन क्रॉफर्डचं जुनाट, पांढरं, चर्चसारखं होतं. जोनची जुनी मोटारहि तिथं मोडून पडली होती. गॅरी कूपरची खूप मोठी इस्टेट, पण ती सारी त्यानं आतां कॅथलीक चर्चला देऊन टाकली आहे.

फ्रँक सिनात्राचा बंगला नि त्यापुढची बाग मोहक आहे. दारांतले फर नि यूचे वृक्ष डौलदार आहेत. घरामागचा, बदामाच्या आकाराचा पोहण्याचा तलाव निळानिळा आहे. रेड स्केलेटननं आपलं घर टेकाडावर बांधलं आहे. हिरवळीऐवजी हिरवी वेल लावून जमीन गारीगार केली आहे. डायना शोरचं (टी.व्ही.वरची मिस् शेवरोलेट) घर लांबलचक आहे. ज्यूडी गार्लंड, फ्रेड मॅकमरे, सिझर रोमेरो, रोझमेरी क्लुनी व योजे फरार-अनेक प्रसिद्ध व आवडत्या कलावंतांच्या वास्तूंचं दर्शन घडलं. अवाढव्यपणा आढळला बॉब होपच्या निवासस्थानाशीं. झुडपांत लपवलेलं घर, मोठा गोल्फ क्लब, पोहण्याचा तलाव, पंधरा मोटारींचें गराज--सगळं प्रचंड ! जेन मॅन्सफील्ड मात्र जवळ जवळ उघड्या घरांत राहत होती. मला मा वेस्टची आठवण

आली. डिक म्हणाला, " मा वेस्ट घरांत कशी मावेल ? तिच्या नांवाचं मोठं अपार्ट्मेंट् हाऊस आहे नि त्यांत पंधराशें ब्रह्मचारी राहातात. "

" लॉस एंजेलीस्‌ला रात्रीं ये नि हॉलीवुड व वाईन (बुलेवार्ड) च्या कॉर्नरशीं भेट " अशा ओळीचं एक लोकप्रिय गाणं आहे. हा चौक रात्रीं दिव्यांनीं, सुगंधांनीं नि नखरेल युवतींच्या हालचालींनीं अक्षरशः उजळून निघतो. आकाशांतल्या नक्षत्रमालेला लाजवील असा दिव्यांचा नि रंगांचा विलास चालू असतो. सनसेट, हॉलीवुड, वाईन—सारे बुलेवार्ड वेड लागल्यासारखं वागूं लागतात. रात्र होते, पण सोंगं कमी होत नाहींत. दुकानं उघडीं असतात व मोटारी फिरतच असतात. नाईट क्लब ओसंडूं लागतात. सिरीयो, क्रिसेंडो, गार्डन ऑफ अल्ला हे सनसेट स्ट्रीप वरचे मोठे क्लब्ज् व क्रॉस्बी बुलेवार्डवरचे छोटे क्लब्ज् रसिक नि रंगेल मनांना फुलवण्याचीं पराकाष्ठा करतात. ह्या नगरांत स्त्रियांचं राज्य आहे हें जाणवतं. 'कॅरोल अँड् गेबल्स' व 'बिट् ऑफ स्वीडन' हीं संकेतस्थळं क्वचित् हमरीतुमरीवर येतात. सुंदर मुली टॅक्सी चालवतात; व सुंदर मुली बीअरच्या एका पेल्यासाठीं सारं तारुण्य पणाला लावतात. टेलीव्हीजननें चित्रपटसृष्टीला ग्रहण लावलं आहे. अनेक थोर नटनटी, लेखक, निर्माते टेलीव्हीजनकडे धांवले आहेत, तर सामान्य मुला—मुलींना वाईट जिणं जगावं लागत आहे.

रोझमेरी क्लुनी व योजे फेरार ह्या जोडप्याशीं माझी मुलाखत घडवून आणण्याची डिक्नं पराकाष्ठा केली. पण रोझमेरीला लास वेगासला गाण्याच्या कार्यक्रमाला जायचं होतं व योजे त्याच दिवशीं न्यूयॉर्कला 'ओ कॅप्टन' ह्या नाटकांत काम करण्यासाठीं निघून गेला होता. अखेर डिक्नें खटपटीनें मिट्झी गेनॉर नांवाच्या फार सुंदर व लोकप्रिय नटीशीं माझा परिचय करून दिला. कोक पीत आम्ही पांचच मिनिटं बोललों. तेंहि बेचव. गेनॉरला भारताबद्दल कुतूहलसुद्धा नव्हतं. आणि मी तिचं एकहि चित्र बघितलं नव्हतं !

फिलहार्मोनिक ऑपेराबद्दल खूप ऐकलें होतें. सकाळीं जाऊन हॉलीवुड बाऊलहि बघितला होता. टेकडी खोदून केलेलें थिएटर, त्यापुढचा,

गालीचासारखा तलाव व पुढ्यांतले प्रचंड प्रेक्षागृहं. बोल्डरच्या थिएटर-सारखं हॉलीवुड बाऊलहि अद्भुत स्थान आहे. पण ऑपेराचीं तिकीटं मिळालीं नाहींत. 'अंद् द ग्रँड' ह्या नव्या नाटकाचीं तिकीटं नॉर्मन व्हाइ-टनं कशी तरी मिळवलीं. 'ग्रॅण्ड होटेल' ह्या सुप्रसिद्ध कादंबरीचं हें नाटक नि त्यांत मुख्य ऑटोची भूमिका पॉल मुनीची. मुनीचें भक्त व कादंबरीचे चहाते थिएटरवर गर्दी करून होते. नाटककारानें मूळ वस्तूंत खूप बदल केले होते. लॉबीचं सेटिंग बर्लिनऐवजीं रोमचं होतं हें मला खटकलं. जलद फिरणारं स्टेज, दिमाखदार होटेलची व बॉलरूमची दृश्यं दृष्ट लागणारीं केलीं होतीं. मुनि गातो, नाचतो, तेव्हां प्रेक्षक खूष होतात. मला उगाचच गंधर्वांची आठवण येत राहिली.

NBC टेलिव्हिजनचे स्टुडियो व Queen for the Day हा अमे-रिकेभर लोकप्रिय असलेला कार्यक्रम पाहिला. पेरिओ होटेलमध्यें नटनटी व त्यांचे एजंट नव्या करारांची चर्चा करतात तिथें डोकावलों व कॉफीच्या एका कपाला साडेचार डॉलर दिले. डाऊन टाऊनवर हारीनं उभीं असलेलीं अवाढव्य डिपार्टमेंटल स्टोअर्स पाहिलीं. सिड ग्राऊमनचं चायनीज थिएटर, कॅपिटोल रेकॉर्डची इमारत, चित्रपटांतल्या व त्या मागच्या प्रणयघटना घडलेला समुद्रकिनारा बघितला. चार दिवस व चार रात्रीं सिललाईडच्या व सुगंधांच्या जगांत भ्रमिष्टासारखा हिंडलो.

अमेरिकेला येणारा प्रत्येकजण हॉलीवुड बघायचं स्वप्न उराशीं बाळगतो. थोडेसं हॉलिवुड मी बघितलं व इथलं जग बघायला खूप दिवस व खूप धाडस हवं हें पटलं. कलावंतांची अखंड उपासना पाहिली व टेलिव्हि-जननें सिनेमाजगतावर टाकलेलं सांवटहि दिसलं. स्थापत्यशास्त्राचे व अनीतिमार्गांचे विक्रमहि पदोपदीं दिसले.

इथंच वॉल्ट डिस्नेनं आपल्या प्रतिभेनं एक अद्भुत नगर बसवलं आहे. डिस्नेलँड पाहण्यांत एक दिवस घालवला...आणि ह्या कलेच्या माहेरघरांत ग्रेटा गार्बो व चार्ली चापलीनची एवढीहि निशाणी आढळली नाहीं ह्याची बोचक जाणीव झाली.

ग्रेहाऊंड बसनें लॉस एंजेलीस सोडलं. डिक् डिलमनं पोंचवायला आला होता. आधली रात्र तो माझ्याबरोबर होताच. ‘ हँग ओव्हर ’ कमी व्हावा म्हणून जवळच्या एका दुकानांतून त्यानं बर्फाची पिशवी विकत घेऊन मला नजर केली. पिशवीला मार्लीन मन्रोच्या उघड्या आकृतीचा आकार दिला होता.

तेरा जुलैला हॉलीवुडलँड सोडतांना मार्लीन मन्रो माझ्या मुठींत होती. दुखणाऱ्या डोक्यावर थंड शरीर फिरवीत होती.

●●●

# १२ लास् वेगास्चें जुगारी जग

एअर कंडिशन्ड बसमध्यें आरामांत बसून मी बाहेरचा निसर्ग न्याहाळीत होतों. मृत्युदरी मागं पडली होती व नेवाडाच्या वाळवंटांतून आम्हीं मार्ग कापीत होतों. बाहेर एकशेंदहाचेवर उष्णतामान चढलं होतं. भुरी वाळू, बोडके डोंगर, करडी झुडपं व उभट निवडुंग धगधगत्या उन्हांत उभे होते. मध्येंच दिसणारं मृगजळ, चुकार स्वारी, एकाकी मालमोटार, उजाड होटेलं—सारं डोळ्यांनीं टिपत मी सुस्तावून बसलों होतों. एस्. टी. च्या गाडीसारखी ही ग्रेहाऊंड बस मध्येंच बंद पडेल तर बहार होईल असं सारखं वाटत होतं. तसं झालं तर ह्या वाळवंटांत उतरतां येईल व वॉल्ट डिस्नेच्या छायाचित्रकारांनीं ' लिव्हिंग डेझर्ट ' चित्रित करतांना जे क्लेश व जें सुख अनुभवलं त्याचा शतशतांश वांटा तरी चाखतां येईल, अशी तीव्र लालसा होत होती.

आदला दिवस मी डिस्नेलँडमध्यें भटकलों होतों. गेले चार दिवस हॉलीवुडची प्रतिसृष्टि पालथी घातली होती. कोट्यवधि डॉलर्सची उलाढाल पाहिली होती. सौंदर्य, लावण्य, तारुण्य ह्यांनीं फुललेली बाजारपेठ पाहिली होती. कलावंतांचा मेळावा पाहिला होता. एका रंगीन जगांत वावरलों होतों.

आणि आतां आणखी एका अद्‌भुत जगांत जात होतों. पैशाचा पाऊस, जगण्याची ईर्षा, मोहाचा व मादकतेचा व्यापार, आयुष्याचा जुगार! नव्हे, जुगाराचंच तिथें आयुष्य बनलेलं होतं. सारं शहर म्हणजे एक प्रचंड जुगारी अड्डा होता. त्या अड्ड्यांत मी आतां डोकावणार होतों.

लॉस एन्जेल्सच्या रुपेरी सृष्टींतून लास वेगास्च्या जुगारी जगांत जाण्याचा मार्ग होता प्रखर वाळवंटांतून. ह्या दोन जुगारी, मादक विश्वांना सांधणारा पूल होता भुरकट रेतीचा व निवडुंगाच्या फडांचा. अति खोल प्रचंड दऱ्या व अणू चांचणीचीं प्रशस्त मैदानं ह्यांच्या कांठांनीं हीं दोन स्थळं जोडलीं होतीं. आणि गहिऱ्या निसर्गांत बहरलेले लॉस एन्जेल्स पाहायला लोकांची झिम्मड लोटते, तशी हें वाळवंटांतलं द्रव्याचं मृगजळ पहायला अनेकांचीं रीघ लागली होती. कुठून कुठून नाना तऱ्हेचे लोक ह्या कॅलिफोर्निया–नेवाडा–अरायझोनाच्या तिठ्यांत वसलेल्या वेगास्ची वारी करीत होते.

माझ्या शेजारीं बसलेला वृद्ध व जर्जर माणूस पुन्हां पुन्हां घाम पुशीत होता. मी लास वेगास्ला 'लॉस्ट वेजेस्' म्हटलं म्हणून तो नाराज झाला होता. सारी हयात त्यानं जुगारांत घालवली होती. रेनोवेगासच्या खेपा केल्या होत्या. स्लॉट मशीन्सचा व्यापारहि केला होता. अमेरिकेंत जागजागीं एवढा उन्हाळा होतो नि आमच्या हिंदुस्थानला इथले लोक उगाच नांवं ठेवतात, ह्या माझ्या टीकेनं त्यानं इतर गप्पा मारायचंहि सोडून दिलं होतं. दुसऱ्या दिशेला एक मध्यमवयीन स्त्री बसली होती. लग्नाची गांठ फिनिक्स गांवीं सोडून ती आतां परत घरीं चालली होती. नवऱ्याच्या जाचांतून मुक्त झाल्याचं समाधान आणि पुढल्या आयुष्याचा धसका तिच्या हालचालींतून व उद्‌गारांतून प्रकट होत होता. धकाधकीच्या आयुष्यांत मिसळण्यापूर्वीं एक दिवस लास वेगास्मध्यें राहून नशिबाची नशा झोंकायचा तिचा विचार होता.

आगेंमागें बसलेले इतर उतारू प्रवासाला कंटाळले होते. संध्याकाळ होण्यापूर्वीं मुक्कामाला पोंचायला उत्सुक होते. अमेरिकन होते, मेक्सिकन होते. कांहीं बायकापोरांसह मजा करायला चालले होते. कांहींची ती

वार्षिक वारी होती. कांहीं माझ्यासारखें कुतूहलानें प्रथमच जात होते. परदेशी, अगोरा, असा मीच एकटा होतों.

" एकटेच तुम्ही ? लास वेगासला कुठें राहणार ? " त्या घटस्फुटित पुरंध्रीनं मला विचारलं. "मी नेवाडा क्लबमध्यें उतरणार आहे" त्या गलित-गात्र वृद्ध सहप्रवाशानं माहिती दिली. मी कांहींच बोललों नाहीं. लास वेगासला कुणी ओळखीचं नव्हतं. एवढ्या प्रवासांत प्रथमच एका हॉटेलचा आसरा घ्यावा लागणार होता. पण त्या म्हाताऱ्याचा अगर त्या स्त्रीचा सहवास मला नको होता. एक संध्याकाळ व एक रात्र जितकं व जें बघतां येईल तेवढं मला बघायचं होतं.

दुपार उलटायच्या आंतच बसगाडी लास वेगासच्या वेशीपाशीं आली. " स्ट्रीपवर कुणाला उतरायचं आहे ? " ड्रायव्हरनं पृच्छा केली. उतारूंची गडबड सुरू झाली. वाळवंटाचं एकदम हिरवळींत रूपांतर झाल्यासारखं दिसूं लागलं. अंतराअंतरावर दुतर्फा मोठाल्या इमारती दिसूं लागल्या. दिमाखदार होटेल्स ! ' डेझर्ट इन् ' होटेलच्या दाराशीं बस येऊन थांबली. कांहीं उतारू तिथंच उतरले.

स्ट्रीपवरची होटेल्स महागाईचीं होतीं. एका खोलीला दिवसाचे बारा–पंधरा डॉलर्स. अर्थात् गांवातल्या गरीबशा होटेलांत मुक्काम करण्याचं मीं ठरवलं. रात्रीं केव्हांतरी स्ट्रीपवरच्या होटेलांत व जुगारी अड्ड्यांतून चक्कर मारली कीं झालं.

स्ट्रीपवरून बस निघाली व स्टेशनजवळच्या बस ऑफिसपाशीं येऊन थडकली. बसमधून सामान काढून उतरलों व जवळच्या वेगास गांवांत शिरलों.

सारं गांव म्हणजे होटेल्स व जुगारीचे अड्डेच होते. गांवाच्या प्रमुख पांचसहा रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना ओळीनं मोठालीं होटेल्स होतीं. वरच्या मजल्यावरून राहायची सोय. तळमजल्यावर जुगार, गुत्ते, जेवणघरं ! कसीनो, गोल्डन, नगेट, गॅम्लिंग हॉल, मिंट, नेवाडा क्लब. भर दुपारीसुद्धां सगळ्या रस्त्यावर गर्दी होती. लोक जुगारघरांत जात–येत होते.

सगळा नेवाडा प्रांत वाळवंटाचा आहे. लोकवस्ती कमी, उद्योगधंद्याचं साधन नाहीं, हिरवळ व पाणी नाहीं म्हणून विकासाचे मार्गहि नाहींत.

नेवाडानं मग वेगळीच युक्ति शोधून काढली. जुगार खेळणं कायदेशीर केलं व सर्व तऱ्हेच्या जुगारांना उत्तेजन द्यायला सुरुवात केली. रिनो, वेगास गांवीं जुगारांचे प्रचंड अड्डे सुरू झाले. जुगाराबरोबर इतर करमणुकीहि आल्या. बाहेरचे व्यापारी येऊन होटेल्स चालवूं लागले. बाहेरचं भांडवल आंत ओतलं जाऊं लागलं. अमेरिकेभरचे नि परदेशचे लोकहि थोड्या वेळांत नि शून्य श्रमांत श्रीमंत होण्याच्या लालसेनं नेवाडाची वारी करूं लागले. लाखों डॉलर्सची उलाढाल सुरू झाली. प्रवाशांच्या सुखसोयीसाठीं लांबवरून पाणी आणवलं. होटेलांनीं पोहण्याचे तलाव बांधले. टेलीव्हिजन तर आलंच, पण सिनेमा टेलिव्हिजनवर गाणाऱ्या–नाचणाऱ्या मुली प्रत्यक्ष होटेलांत येऊन करमणूक करूं लागल्या. दारूचीं पिपं रिकामीं होऊं लागलीं. जाहिरातीच्या शास्त्राला नवं क्षेत्र मिळालं. लास वेगास हें एक अद्‌भुत अन् आकर्षक जत्रेचं स्थान बनलं.

होटेलांत पथारी टाकून मी बाहेर पडलों व रस्त्यारस्त्यांनीं भटकूं लागलों. लकी स्ट्राईक, बिंगो, जॅक पॉट्स, मिंट-वेगवेगळ्या नांवांच्या भडक नि खूप मोठ्या पाट्या सर्वत्र दिसत होत्या. एका होटेलवर दारूची मोठी बाटली बांधली होती. दोन पुरुष उंच! एका होटेलवर एक लाकडाचा माणूस उभा केला होता. काऊबॉयचे कपडे घातलेला तो तरुण एक हात सारखा हालवून लोकांना बोलावीत होता. दोन्हीकडच्या रंगीबेरंगी पाट्या पाहून जत्रेंतल्या रहाटगाडग्यांत बसल्यासारखं भासत होतं.

जुगारघरांचीं दारं कांचेची होती आणि स्त्रीपुरुष आंत–बाहेर करीत होते. कुणालाहि कुठेंहि प्रवेश करायला परवानगी होती. लहान मुलांना मात्र आंत जाऊं देत नव्हते. जुगाराचं एवढं लोभन असूनहि लोक सिनेमा-गृहाशीं गर्दी करून होते. एका थिएटरला एल्वीस प्रिस्लेचं चित्र लागलं होतं म्हणून ही झिम्मड! मजा मारायला आलेल्या सगळ्यांचे कपडेहि भडक होते. स्त्रियांनीं चित्रविचित्र पेहेराव केले होते; अन् उन्हाळ्याच्या सबबीवर जितके कमी कपडे घालणें शक्य आहे, तेवढे घालण्याचा विक्रम अनेक जणींनीं केला होता.

जरा धीर केला, कपडे ठाकठीक केले व कांचेचं दार ढकलून एका 'कसीनो' मध्यें प्रवेश केला. पुढ्यांत मोठा बार होता. उंच व लांबलचक

टेबलापुढें गादीच्या खुंटावर बसून लोक मद्याचे प्याले रिते करीत होते. दारूच्या बाटल्या कपाटांतून काढून मार्टिनी, मॅनहटन् बनवण्याची दारू-विक्या तरुणींची लगबग सुरू होती. जुगार खेळून दमलेले लोक मद्याचा आश्रय घेत होते. कोपऱ्यांत छोट्या स्टेजवर दोन हवाईयन् मुली नृत्य करीत होत्या. गळ्यांत फुलांच्या माळा, केसांत नि कानांत भडक फुलं नि कमरेभोंवतीं फुलांचं नि पानांचं बनवलेलं वस्त्र. शरीरं घोळवीत वांकवीत त्या मादक संगीतांत नाचत होत्या. गळ्यांत गीटार अडकवून कोपऱ्यांत एकजण भसाड्या सुरांत गात होता. अन् समोर खुर्च्या टाकून बसलेले पाहुणे हंसून, टाळ्या वाजवून नाचगाण्याचा आनंद लुटत होते.

दुसऱ्या बाजूच्या प्रचंड दिवाणखान्यांत जुगारी खेळ चालले होते. सारी जागा एअरकंडीशन्ड होती व खूपसे दिवे लावून नटवली होती. गळ्यांत पिशव्या अडकवलेल्या व भडक कपडे केलेल्या लालचुटुक मुली जुगारी लोकांना हवी ती नाण्यांची मोड देत होत्या. ह्या 'चेंज् गर्लस्'चा सर्वत्र सुळसुळाट होता. दहा नि शंभर डॉलर्सची मोड त्या झटकन् पिशवींतून काढून हातावर ठेवीत. नवऱ्यांशीं, बब्यांशीं गुलगुल बोलत. जुगार खेळणाऱ्या व दारू वाटणाऱ्या मुलींचा मोठ्यानं मत्सर करीत.

दिवाणखानाभर हारीनं चकचकीत, कपाटासारखी, यंत्रं मांडलीं होतीं. जॅकपॉट्स असं त्यांना नांव होतं. छोट्या टेबलावर बसवलेल्या तिजोरी-सारख्या ह्या जॅकपॉट्समध्यें नाणीं भरलीं होतीं नि दर्शनी भागावर मासे, घोडे, फुलं असलीं चित्रं रेखलीं होतीं. नाणं टाकून बाजूला असलेला दांडा ओढला कीं तीं चित्रं अर्धा मिनिट गरगर फिरत. पुन्हां दर्शनी पट्टी थांबली व समोर तीन मासे किंवा तीन फुलं ओळीनं आलीं कीं टाकलेल्या नाण्याच्या दहापट नाणीं जॅकपॉटच्या खालीं लावलेल्या भांड्यांत पडत. दहापट द्रव्यलाभ केवळ दहावीस सेकंदांत. एक पेनीची, पांच सेंट्सची, दहा सेंट्सची नि पंचवीस सेंट्सची वेगवेगळी जॅकपॉटस्. एक पेनी टाकून दहा पेनी मिळवा. एक डाईम टाकून एक डॉलर कमवा. गुळाच्या खड्या-भोंवती माशा घोंघावत राहाव्यात तसे जॅकपॉट्सभोंवतीं जुगारी जमले होते. मुठींतलीं नाणीं मशीनच्या फटींत टाकीत होते व डाव्या हातानं व मोठ्या आशेनें दांडा खेचीत होते. बहुतेकांचीं नाणीं फुकट जात. दांडे ओढून

अनेकांचे हात अवघडले होते. एखाद्याचं भाग्य उदयास येई. बदबदा नाणीं भांड्यांत वाजत. 'जॅकपॉट' म्हणून चेंज गर्ल पुकारा करी. उंचावर, अंपायरसारखी खुर्ची टाकून बसलेला गुबगुबीत दलाल भिंतीवरच्या फलकावर जॅकपॉटचा नंबर व मिळालेल्या द्रव्याची नोंद मांडी. खूप पैसे वाटले जात आहेत असं वाटे, नि नव्या उत्साहानं लोक जुगार खेळत.

ह्या कसीनोमध्येंच नव्हे तर सगळ्या जुगारी अड्ड्यांतून जॅकपॉट्स खळखळत होते. कांहीं अड्डे तर केवळ जॅकपॉट्स्चेच होते. होतकरू लोक, विशेषतः स्त्रिया, ह्या पॉट्सभोंवतीं गर्दी करून होत्या. एका यंत्रांतून लाभ झाला नाहीं तर दुसऱ्याकडे जायचं.डाव्या हातानं दांडा ओढतांना उजव्या हातानं प्रियकराचा हात धरायचा.व्हिस्कीचा घुटका घेऊन; तरतरीत मनानं पुन्हां कौल लावायचा.

" गॅम्ब्लिग हॉल " मध्यें दारींतून शिरावं लागलं. एक उभं, भलं मोठं चक्र केलं होतं व त्यावर वेगवेगळ्या नोटा अडकवल्या होत्या. चक्र चालवणारा माणूस चक्राला गति देई. एक डॉलरपासून शंभर डॉलरपर्यंत पैसे लावले जात. एका विशिष्ट वेळीं चाक थांबे व लाल दिवा लागे. दिव्याजवळ जी नोट आली असेल त्याच किंमतीची नोट लावणाऱ्यांना दामदुप्पट द्रव्य मिळे. चाक फिरवणारीं माणसं सर्कशीच्या रिंगमास्टरसारखे पोशाख करून उभीं असत व जुगाऱ्यांना साद घालीत.

सिनेमांत बऱ्याचदां पहायला मिळतं तसं बिलीयर्डसारख्या टेबलावर फासे फेकून जुगार खेळले जात होते. लांब दांडीची लांकडी पळी घेऊन टेबलावरून खेचले जात. एवढ्या गर्दींत पैशाचा त्रास नको म्हणून लांकडाच्या चकत्या खेळ आटोपेपर्यंत वापरल्या जात होत्या.

बिंगो खेळानें तर जॅकपॉट्ससारखी लोकप्रियता मिळवली होती. छोटे, नंबरांच्या चौकटी असलेले, छापील कागद घेऊन खुर्च्यांवर स्त्री–पुरुष बसले होते व जाहीर होईल तो नंबर खोडीत होते. सगळे नंबर मिळवणारा माणूंस ' बिंगो ' म्हणून ओरडे व पैसे मिळवी. बिंगोंतहि नाना तऱ्हा चालू होत्या.

कापसावर, घोड्यावर, हवामानावर सट्टे खेळले जात होते. जुगाराचे जितके प्रकार कल्पितां येतील तेवढ्यांचीं दुकानं थाटलीं होतीं.

मिंट, नेवाडा क्लब, गोल्डन गेट, कसीनो, गोल्डन नगेट सलून, गॅम्ब्लिंग हॉल, लकी स्ट्राईक क्लब–सगळ्या जुगारी अड्डयांतून चकरा मारल्या. जुगारांत गुंगून गेलेले असंख्य स्त्री–पुरुष जवळून पाहिले. सिगरेटच्या धुरांत नि मदिरेच्या नशेंत शेंकडों डॉलर्स ते मिळवीत होते नि त्यापेक्षां अधिक घालवीत होते...चामड्याच्या थैलींतून नोटांचीं पुडकीं घेऊन बिंगो खेळत बसलेली ती स्पॅनिश युवती, फोनवरून ह्यूस्टनहून पैसे मागवणारा लठ्ठ म्हातारा, हताशपणें प्रत्येक जुगारांत कौल लावणारं तरुण जोडपं...

स्ट्रीपवरच्या जुगार घरांतून तेंच! फक्त जास्त सुखसोयीमुळें हॉटेल्स राहायला महाग. पोहण्याचे तलाव, प्रशस्त बार, जेवणाचे दिवाणखाने. शिवाय छोट्या थिएटरांत नाचगाण्याचे कार्यक्रम. 'डेझर्ट इन्' मध्यें तर त्या दिवशीं रोझमेरी क्लुनी येणार होती गायला!

दमलों. जेवण उरकलं. हॉटेलमध्यें जाऊन जरा झोंप घेतली.

जागा झालों तों रात्रीचे दोन वाजून गेले होते. खिडकीबाहेर पाहिलं. लाल निळ्या निऑन साईन्सचा सर्वत्र वणवा पेटला होता. तो प्रचंड लांकडी काऊबॉय चकाकत होता; लाल अंगठा दाखवून बोलावीत होता. बिंगो, मिंट, लकी स्ट्राईकच्या जाहिराती भडक उजेडांत फडफडत होत्या. संगीत सर्वत्र झरत होतं. लास वेगासला वेड लागलं होतं.

घाईघाईनें परत रस्त्यावर आलों. निद्रा त्या गांवांतून हद्दपार झाली होती. लोक पूर्वीच्याच हिरीरीनं पैसे हरत होते. जुगाराच्या नशेंत मद्याची नशा मिसळत होती. इतर प्रांतांत सहसा पहायला न मिळणाऱ्या डॉलर नाण्यांच्या चळती जास्तच चकाकत होत्या. कसीनोमधला हवाईयन नाच अधिक भडक नि मादक झाला होता आणि चित्रसुंदरी रोझमेरी आपल्या कर्णमधुर गाण्यांनीं 'डेझर्ट इन्' मध्यें स्वर्ग निर्माण करीत होती.

स्ट्रीप नि गांवांतले हमरस्ते सोडले तर बाजूच्या गल्ल्यांत बरीचशी शांतता होती. बहुतेक बारमधून लोक शांतपणें मद्यपान करीत होते.

क्वचितच अतिरेकी तरुण-तरुणी दंगा माजवीत होते. स्टेशनापुढच्या हिर-वळीवर कांहीं लोक हवा खात झोंपले होते. तारघरांतला टकल्या माणूस " लास् वेगास्चे लोक फुटकळ नोकऱ्याच करीत बसले आहेत. बाहेरचे लोक येऊन जुगारघरं चालवतात व पैसा कमावतात " म्हणून तणतणत होता. त्या घटस्फुटित पुरंध्रीनें कुणी मित्र पटकावला होता. त्याला घेऊन, बहुधा त्याच्या पैशानें, ती बिंगो खेळत होती. आणि त्या म्हाताऱ्या सह-प्रवाशाचा पत्ता नव्हता...

पहांट होईपर्यंत जुगारांत, दारूंत, प्रणयक्रीडेंत रमलेले असंख्य जीव पाहिले. क्षणभंगुर जीवन जणूं इथें चिरंजीव झालं होतं !

पहांट फुटली. चुरचुरत्या डोळ्यांनीं सामान बांधलं व पुढच्या प्रवासास प्रारंभ केला.

●●●

# १३ शवानो

तुला अस्सल इंडियन जमाती बघायच्या असतील तर ओक्लाहोमाला जा...जमल्यास आणिक दक्षिणेकडे जा. घाई असेल नि इंडियन गांवढ्याचा नमुना बघायचा असेल तर दीडदोनशें मैलावरच्या शवानो गांवीं जा. मिनॉमिनी नांवाचे इंडियनांचे कळप तिथें असतात. एखादा दिवस त्यांच्यांतहि राहतां येईल.

दोघांचौघां अमेरिकन स्नेह्यांनीं हा सल्ला दिला नि मग विश्वविद्यालयांत उच्च शिक्षण घेणाऱ्या शवानोच्या रेड इंडियन मुलीनें सहलीचा घाट जुळवूनच आणला, तेव्हां एका स्वच्छ शनिवारीं शवानोला निघालों. अमेरिकेंत इतके दिवस काढले, पण रेड इंडियन माणसाला अजून बघितलं नव्हतं. लहानपणापासून रेड इंडियनांबद्दल ऐकलेलं होतं. अमेरिकेंत आल्यावरहि कॉमिक पुस्तकांतून नि टेलिव्हिजनवरून ह्या लोकांबद्दल बरंच वाचायला, पहायला मिळालं होतं. पण आतां खरेखुरें रेड इंडियन, त्यांची कुटुंबं, घरं पहायला मिळणार म्हणून मी अगदीं खुलून गेलों होतों.

मध्यपश्चिम अमेरिकेंतल्या सगळ्या गांवांप्रमाणें शवानो गांवहि मोठं देखणं होतं. स्वच्छ, प्रशस्त, सुखसोयींनीं परिपूर्ण. फ्रेंच, स्विस व नॉर्वेजियन घराण्यांची सरमिसळ झालेली दिसत होती. दुधाचे, चीजचे, यंत्रांचे मोठे

धंदे काढणारे हे लोक मोठे धाडसी होते. टॅव्हर्न्स्, बोलींग ॲलीज् वगैरे-सारख्या करमणुकींतून आयुष्य रंगीबेरंगी करीत होते.

शवानोंत कांहीं तास मोठ्या मजेंत काढले नि मग एकाएकी मनावर खिन्नता साचूं लागली. 'रेड इंडियन लोकांची आजची अनुकंपनीय स्थिति म्हणजे लोकशाहीचा घोष करणाऱ्या सुसंस्कृत अमेरिकन राष्ट्रावर कलंक आहे' हे अनेक सभांतून निघालेले निष्कर्ष आठवले. ह्या लोकांची मूळची भूमि हिरावून घेऊन त्यांना हांकलीत, गुरासारखं पिटाळीत, कांहीं ठराविक ओसाड, पडीक जागांवर आणून ठेवलं आहे. आपल्याकडे गुन्हेगार जमाती सेटलमेंटवर राहातात तसे हे लोक रिझर्वेशनवर राहत आहेत. सगळेच्च दारिद्र्यानें, अज्ञानानें, कायद्याच्या काचानें जखडले आहेत. ओक्लाहोमा संस्थानांत पिटाळलेल्या जमातींना चुकून त्या जमिनींत तेल लागलं व ते गबर झाले. बाकीच्यांची परवडच आहे.

जवळजवळ प्रत्येक शहरांतल्या म्युझियममध्यें रेड इंडियनांचा वेगळा विभाग असतो. ह्या विभागांची सुरुवात बहुधा प्राचीनकाळीं रेड इंडियनांची वस्ती कुठें कुठें होती हें दाखवणाऱ्या नकाशांनीं होते. उत्तर व दक्षिण अमेरिका नि भोंवतालचीं बेटं ह्यावर ह्या रक्तवर्णीय, कडव्या लोकांचं अधिराज्य होतं. ह्यांचे कळप, लढाया, शेती करायची पद्धत-सारंच त्या काळाच्या मानानं सुधारलेलं वाटतं. प्रतिस्पर्ध्यांचा पराभव केल्यावर त्यांच्या नायकाचं मुंडकं छाटून आणायचं व तें उकळत्या पाण्यांत घालून, औषधी लावून वाळवायचं. मुंडकं मग आक्रसतं व मुठींत मावेल इतकं लहान होतं. नाक, कान, डोळे तसेंच शाबूत राहिलेल्या पण अगदीं बारीक आकार केलेल्या ह्या मुंडक्यांच्या माळा बनवून हे लोक आपल्या घरादारांवर लटकावीत. हीं छोटीं छोटीं पण खरीं मुंडकीं पाहिलीं कीं मन भोंवळतं. छोट्या मुंडक्याप्रमाणें मृत शरीर ' ममीज ' करून ठेवायचं शास्त्रहि रेड इंडियनांना अवगत होतं. जंगली औषधी वनस्पती त्यांना ज्ञात होत्या. अन्न शिजवणं, मुलं वाढवणं, वाद्यं वाजविणं—सुसंस्कृत व प्रगत समाजाचं कोणतं लक्षण त्यांच्यांत उणं होतं ?— पण पूर्वेकडून गोऱ्या लोकांच्या टोळधाडी तोफा बंदुका घेऊन आल्या नि ह्या वीर जमातींचा नायनाट झाला.

आज म्युझियममध्यें, सेटलमेंटवर, कॉमिक पुस्तकांतून ह्यांचं लज्जित अस्तित्व तेवढं उरलं आहे.

न्याहरी घेतांना हे सारे विचार मनांत येत होते. आमची जर्मन होस्टेस मला बजावीत होती कीं, 'इंडियनांच्या वस्तीवर जात आहेस. जपून रहा. ते लोक चोरटे असतात. मुली भुरळ पाडतात.' दहा मैलांवर राहाणाऱ्या आपल्या शेजाऱ्यांबद्दल ह्या सुशिक्षित व समंजस स्त्रीनें असं मत परक्याला सांगावं ह्याचं वाईट वाटलं. बाईंना म्हटलं, 'मी पण इंडियनच आहे' आणि मला न्यायला आलेल्या रेड इंडियनांच्या म्होर-क्याला भेटायला गेलों.

त्या बारीक पण तीक्ष्ण डोळ्यांच्या, रुंद जबड्याच्या व रुंद खांद्यांच्या, अस्वस्थ हालचाली करणाऱ्या इसमाचं नांव 'ऑनेस्ट जॉन' होतं. दोन्ही जाडजूड हातांनीं मला पकडून त्यानें अस्खलित इंग्रजींत माझं स्वागत केलं. 'ऑनेस्ट जॉन' नांव ऐकल्यावर मला पेंडशांच्या कादंब-रींतल्या 'अफाट बापू' ह्या नांवाची उगाचच आठवण झाली. दोघांत अर्थात् कसलंच साम्य नव्हतं.

"इथें आमची वस्ती पहायला म्हणून जगाच्या कानाकोपऱ्यांतून खूप लोक येतात. पाहुण्यांची करमणूक करायची हेंच आमचं आयुष्य होऊन बसलंय्—पण मला तुम्ही आलांत म्हणून खूप आनंद झाला. कारण तुम्ही इंडियन आहांत. खरें इंडियन!" ऑनेस्ट जॉन म्हणाला. मी खरा इंडियन, पण हा पुरा रेड इंडियन नाहीं असं त्याला निरखून पहातांना वाटूं लागलं. गालाचीं हाडं, कपाळ, चामडीचा रंग—बरीच भेसळ होती. फार थोडी रेड इंडियनांची कुटुंब शुद्ध राहिलीं आहेत. मिनॉमिनींच्या कळपांत बरेच फ्रेंच लोक जाऊन राहिले होते. फ्रेंच रक्त ह्या सर्वांच्या धमन्यांतून वहात असलं पाहिजे.

वाटेनं आमच्या बऱ्याच गप्पा झाल्या. शवानो गांव टाकून, जंगलांतून वाट काढीत आमची गाडी एका लाकूड गिरणीशीं आली. बाजूच्या एका मोठ्या, गराज्वजा हॉलशीं आम्हीं आलों.

छोटा स्वागत समारंभ झाला. रेड इंडियनांच्या मेळाव्यांत आलों आहों असं तितकंसं वाटेना. सगळ्यांचे कपडे साहेबी होते. पिसांचे टोप

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०७९६



नि कांतडी घायलेलं कुणींच नव्हतं. कांहीं म्हाताऱ्या मात्र पायघोळ, विचित्र झगे घालत गुडगुड्या ओढीत होत्या. आम्ही अमेरिकेच्या बाहेर दुसऱ्या देशांत आलों आहोंत, असा भास होत होता. सगळीकडे अंधार, अस्वच्छता. कुणी मोकळेपणानं हंसत नव्हतं, कीं बोलत नव्हतं.

ऑनेस्ट जॉन त्या अनौपचारीक सभेंत छोटं भाषण करतांना म्हणाला, " जगांतल्या दुसऱ्या नंबरच्या ह्या शवानो गांवीं तुमचं स्वागत असो ! "

मी चटकन् विचारलं " म्हणजे-पहिल्या नंबरचं गांव कुठलं ?–"

" अर्थात् पुणें ! " तो चटकन् म्हणाला.

जराशानं हॉल शेजारच्या दुसऱ्या एका मोठ्या सोप्यांत गेलों. संध्याकाळच्या जेवणाची तयारी झाली होती. भटारखान्यांत अन्न शिजत होतं. लांबलचक टेबलापुढें बांकडीं टाकलीं होतीं. क्यू करून सर्वजण आपलं अन्न घेऊन येत व टेबलाशीं बसून जेवीत. एखाद्या कम्यूनमध्यें असावं तसं सामुदायिक भोजन चालू होतं. अन्न बरंच तिखट नि झणझणीत होतं. उसळीचं लाल कालवण सर्वजण भुरकत होते. तिथल्या रिकोना, बलावे, टारगो, वगैरे कुटुंबांत गप्पा मारीत जेवण केलं. सगळीं नांव अगदीं वेगळीं होती. सगळ्यांना इंग्रजीहि येत नव्हतं. रेड इंडियनांची भाषा वेगळी आहे. त्यांतल्या प्रत्येक जमातीचीहि भाषा परत निराळी आहे. ह्या साऱ्या बोली भाषा. लिपी नाहीं–लिहिलेलं कांहींहि साहित्य उपलब्ध नाहीं.

रिकोनानं एक गम्मत सांगितली. गेल्या महायुद्धांत नाझी सेनापति अमेरिकन अधिकारी पकडीत व त्यांच्याकडून अमेरिकन सैन्याच्या सांकेतिक भाषेची माहिती काढीत. कोडिंगची पद्धति बदलली तरी ती गुप्त रहात नसे. अखेर अमेरिकन सैन्यानं शंभर हुषार रेड इंडियन जवान तयार केले व संदेश धाडण्याचं काम त्यांच्यावर सोपवलं. आपल्या भाषेंत ते बिनदिक्कत संदेश पाठवीत. ह्या शंभर लोकांखेरीज जगाच्या पाठीवर कुणालाहि ती भाषा अवगत नव्हती. अमेरिकन सैनिक शत्रूंच्या हातीं सांपडले तरी संदेशाची गुप्त भाषा फुटण्याची भीति राहिली नाहीं.

मिनॉमिनींची त्या दिवशीं सभा होती. सरकारनं देखरेख व सुधार समिती नेमली होती, त्याचे प्रतिनिधी सभा चालवीत होते. मिनॉमिनींचे कांहीं इंडियन लोकहि सभेच्या कामांत भाग घेत होते. वॅकिफ्राऊ नांवाची,

माझ्या शेजारी बसलेली बाई म्हणाली, ‘ हे फिफ्थ कॉलमिस्ट आहेत–’. त्या अशिक्षित स्त्रीला तो शब्द माहीत असावा ह्याचं मला नवल वाटलं. मीं म्हटलं, “ इतकी महत्वाची, त्रैमासिक सभा. तुमचे हक्क वाढवण्याबद्दल वॉशिंग्टनला पाठवण्याच्या अर्जाबद्दल विचार चालू आहे. अन् एवढे थोडे लोक हजर कसे ? ” वॉकेफ्राऊ म्हणाली, “ लोकांना सवड नाहीं. सगळेजण मासेमारींत दंग आहेत. माशांनीं पोट भरतं. सभेंत तोंड उघडलें कीं नांव ब्लॅकलिस्टांत जातं–”

आपल्या हक्काबद्दल उदासीनता. अमेरिकन लोकांबद्दल संशय व द्वेष. हेंच सर्वत्र आढळलं. सभेचा फार्स संपला व ऑनेस्ट जॉनकडे मुक्काम केला. तो माझ्यासारख्या परदेशी पाहुण्यापुढें अमेरिकनांची निंदा नालस्ती करायला टाळत होता. पण त्याच्या चर्चेत नि थट्टेतहि एकूण परिस्थितीबद्दल कडवटपणा दिसत होताच.

“आमची फुटबॉलची मॅच चालू होती–” ऑनेस्ट जॉन रंगांत येऊन गडद, काळी बीअर पीत सांगत होता, “आमची इंडियन टीम व कॅलिफोर्नियाची गोरी टीम. आमच्या गड्याची चूक नसतांना अंपायरनं त्याला थांबवलं नि पंधरा फूट मागं सरून चेंडू टाकायला सांगितलं. प्रेक्षकांत आमचा ब्याण्णव वर्षांचा विझेटी बसला होता. तो स्वतःशीं खुदकन् हंसला. अंपायरनें रागावून ‘हंसायला काय झालं ?’ म्हणून विझेटीला गुरकावलं. विझेटीची मुरकुंडी वळाली. तो म्हणाला, “गृहस्था, तुम्ही आमचा सगळा देश बळकावलांत. पंधरा लाख एकर आम्हाला दूर हटवलंत. आतां पंधरा फुटांसाठीं–” ऑनेस्ट जॉन स्वतःच हंसत सुटला.

ऑनेस्ट जॉनची बायको शेजारच्या केशाना गांवीं गेली होती. फोटोवरून ती शांत, रसरशीत व बरीचशी रेड इंडियन वाटत होती. छोटा आठ वर्षांचा रॉकी मात्र घरीं होता. मोठा गोंडस, गुबगुबीत छोकरा. रॉकी आपल्या मित्रांना जमवून खेळ खेळत होता तो पाहून मी चमकून गेलों. रॉकी नि त्याचे दोन दोस्त रेड इंडियन झाले होते. तोंडावर हात ठेवून चीत्कार काढल्यासारखीं हाळी देत होते. लुटपुटीच्या घोड्यावरून दौडत होते. उरलेले पांच सहा मित्र अमेरिकन गोल्ड रशर्स बनले होते.

दोन्ही बाजूंचं बाणांचं युद्ध जुंपलं नि मग त्यांत रेड इंडियन्स मरून पडले. रेड इंडियन मुलं लुटुपुटीच्या खेळांतहि हार स्वीकारीत होती !

ऑनेस्ट जॉनचं घर अमेरिकनासारखं रेडियो, टी.व्ही, वॉशिंग मशीन वगैरेंनीं सुसज्ज होतं. दुसऱ्या कांहीं जुनाट, गरीब कुटुंबांच्या घरांत मात्र अंधार, अस्वच्छता दिसत होती. स्वैपाकघरं व बसण्याची खोली बघवत नव्हती. वयस्करांच्या चेहेऱ्यावर अवकळा आली होती, तरुणांची कपाळं आठ्यांनीं भरलीं होतीं. संपलेल्या संस्कृतीची पडझड झालेल्या जमातीची अवशिष्ट सर्वत्र दिसत होतीं.

कोपऱ्यावरच्या 'पब'मध्यें अनेक तरुण तरुणी मद्यसेवन करीत होत्या. कांहीं अमेरिकन मुलं त्यांत बसलेलीं पाहून गंमत वाटली. संकरास सुरुवात अशीच होते ! कोपऱ्यांत दोन तरुण मुली शांतपणें पीत होत्या. टेलिव्हिज-नवर अस्सल रेड इंडियन तरुणी दिसाव्यात तशा त्या दिसल्या. धारदार, सतेज, अवघड, आत्यंतिक, लोलुप. काळेभोर, लांबसडक केस त्यांच्या उभट मुखड्याभोवतीं चोपून बसवलेले होते. जवळ जाऊन त्यांचे ग्लासेस भरले व मग फोटो घेतले. त्या दोघी विलक्षण लाजल्या तेव्हां त्यांच्या रासवट सौंदर्याला वेगळीच झळाळी आली.

लाकडाची गिरणी अवाढव्य होती. सरकारनं इथल्या लोकांना रोजगार मिळावा म्हणून ही गिरणी सुरू करून दिली होती. सरकारी पद्धतीनं ती चालवली जावी अशी खटपट सुरू होती. पण मिनॉमिनी-करांना त्या धंद्यांत स्वारस्य नव्हतंसं दिसलं. ऑनेस्ट जॉन त्राग्यानं म्हणाला, " सरकार भुकं मरून देत नाहीं ना—मग काम कशाला करायचं ? दिवस ढकलतां येतील तितके ढकलायचे नि एक दिवस नाहींसं व्हायचं, हीच सर्वांची वृत्ति झाली आहे—कुणाच्यांत उत्साह, ईर्षाच उरली नाहीं—"

लांबवर एक दगड होता तो वॅकेफ्राऊनं मला मुद्दाम दाखवला. त्याचं नांव ' स्पिरिट रॉक '. हा प्रचंड दगड झिजला, नाहींसा झाला, कीं मिनॉमिनीच रेड इंडियन्स निर्वंश होऊन नाहींसे होणार अशी दंतकथा तिनें सांगितली. दगड झपाट्यानं झिजत होता—नि त्याचा आकार कमी होऊं नये म्हणून बरेच म्हातारे त्याच्यावर पाईपमधली तंबाखू टाकीत होते.

• लंबर मिल व रिझर्वेशनबाहेरचा निसर्ग मात्र वेड लावणारा होता. सरळसोट वृक्षांनीं नुसती दाटी केली होती. पाईन, फर, यू ची बनं होतींच, पण कितीतरी अनोळखी वृक्षवेली निरनिराळ्या रंगांच्या व आकाराच्या पानाफुलांनीं नटल्या होत्या. छोटे ओढे कितीतरी होते. 'रेन्बो फॉल्स' नांवाचा छोटा धबधबा अगदीं निःशब्द होता. धबधब्याला आवाज नसावा ह्याचं नवल वाटलं. जणूं कांहीं धबधब्याचं चित्रच कुणी काढून तिथें उभं केलं होतं. धबधब्याचे तुषार अंगावर घेत रॉकी नि मी कितीतरी वेळ न बोलतां बसून होतो. मिनॉमिनी, वॉकेशा, वॉपॉन, वगैरे टोळ्यांच्या जुन्या झोपड्या, होडकी, गाड्या, लॉग केबिन्स ठिकठिकाणीं होत्या.

बाजूनें जाणाऱ्या हायवेवर रेड इंडियनांनीं चालवलेलं एक गिफ्ट शॉप होतं. ढोलकी, टोप, धनुष्यबाण, सपाता, बाहुल्या, डमरू इत्यादि रेड इंडियनांच्या सगळ्या वस्तू तेथें विक्रीला ठेवल्या होत्या. मण्यांची नि पोतीची केलेलीं खेळणी नि बाहुल्याहि होत्या. बाजूला एक म्हातारा रेड इंडियन आपला जुना, पिसांचा पोषाख घालून उभा होता. मोटारींतून जाणारीं माणसं तिथें थांबत व त्या म्हाताऱ्यासमवेत स्वतःचे फोटो काढून घेत. त्याचा टोप स्वतःच्या डोक्यावर चढवूनहि फोटो घेत. म्हाताऱ्याला थोडी बक्षिशी मिळे. त्याचे कपडे बघत लहान मुलं रेंगाळत. बायका त्याला सिगरेटी देत. नाकांत वेसण घालून नाचायला लावलेल्या अस्वलाची मला आठवण झाली त्या झूल घातलेल्या वृद्ध इसमाला बघून—

रात्रीं, दिव्यांच्या लखलखाटांत पिसांचे कपडे चढवलेले बरेचसे रेड इंडियन्स, शाळेच्या हॉलमध्यें जमले. आपला 'राष्ट्रीय' पोशाख त्यांनीं बासनांत गुंडाळून ठेवला होता,तो असा पाहुण्यांसाठीं काढला. रेड इंडियनांचा पोशाख आतां सिनेमा टेलिव्हीजनवर व करमणुकीच्या कार्यक्रमांतच दिसतो. कमरेभोंवतीं लपेटलेलीं भरजरी वस्त्रं, डोक्यावरचे पिसांचे उभट व टोकाशी लाल रंग लावलेले टोप, पोटऱ्यांना व पायांना बांधलेले रंगीत पट्टे, पायांत बांधलेले चाळ—सगळा साज दृष्टि खिळवून टाकतो. कितीतरी रंग, कितीतरी कापडांचे प्रकार त्या वेषभूषेत होते. पुन्हां तो युनिफॉर्म नव्हता; वीस पंचवीस जवानांचा पोशाख एक नव्हता; प्रत्येकाच्या वेषभूषेत वेगळे-

पणा होता. अन् तरीहि त्या सर्वांच्या पोशाखांतून एक संगती साधली होती. त्या रंगीबेरंगी वेषभूषेत छोटा रॉकी दृष्ट लागण्यासारखा दिसत होता.

तऱ्हतऱ्हेचीं वाद्यं घुमूं लागली व दीड दोन दिवस आलेली मनावरची खिन्नता विरून गेली. वाद्यांचा नाद वाढूं लागला. एक ओळ करून सर्वजण डुलूं लागले. पुढें सरकूं लागले. सर्पनृत्य सुरूं झालं. सर्पनृत्यानंतर मत्स्य-नृत्य. नंतर युद्धाचा नाच. सगळ्या नृत्यप्रकारांत पदन्यासाला महत्व. अति वेगानं पावलं आपटून, चाळ वाजवून, नाचतांना सारेजण भान विसरत होते. कुठल्याहि नृत्यांत स्त्रिया नव्हत्या. कुठल्याहि नृत्यांत संथ अगर नाजूक हालचाल नव्हती. सगळं राकट व प्रचंड आवाजाचं. पण त्यांतल्या जल्लोषानं भान हरपत होतं. अंगांतल्या चित्रविचित्र,भडक कपड्या-पिसांना घुंगरांचा व डमरूंचा नाद चिकटत होता व सगळ्या हालचाली लाल पिसांनीं व रंगीबेरंगी मण्यांनी तळपत होत्या. शतशतकांमागें दडलेली संस्कृति त्या लालपिसांच्या टोपांतून वर डोकावूं पहात होती. अनेक जमातींच्या आत्म्यांचा आक्रोश त्या विलक्षण वेगानें हालचाल करणाऱ्या पावलांतून घुमत होता....

नृत्याच्या धुंदींतच मिनॉमिनींना निरोप दिला. शवानो सोडलं. लाघट रॉकी, उमदा जॉन व चिडखोर वॉकेफ्राऊ. उदास जेवणघर व ओसाड गिरणी. निस्तब्ध धबधबा व खुषमस्कऱ्या म्हातारा. पबमधलीं गोरीं पोरं व झपाट्यानं झिजणारा स्पिरिट रॉक...मृत्युशय्येवरच्या जीवाला भेटून माघारीं वळावं तसं त्या नादधुंदींतहि मला परत खिन्न वाटूं लागलं.

# १४ नीग्रो

नीग्रो प्रश्नासंबंधीं खूप लिहिलं गेलं आहे, लिहिलं जात आहे. युनेस्कोच्या संशोधन विभागापासून तें कोपऱ्यांतल्या खेड्यांतल्या एखाद्या साप्ताहिकाच्या स्तंभापर्यंत! परदेशी लोकांनीं लिहिलं आहे. राजकारणीं व्यक्तींनीं लिहिलं आहे. अमेरिकेंतल्या गोऱ्या, निमगोऱ्या व काळ्या लोकांनीं लिहिलं आहे. अनेक लेखकांचा व विचारवंतांचा हा चिंतनाचा विषय आहे. विश्वविद्यालयांतूनहि या प्रश्नावर संशोधन, सर्व्हेज् चालू आहेत.

नेहमीं नेहमीं लिहिलं जातं त्यापेक्षां स्वतःच्या अनुभवाची कांहीं वेगळीं टिपणं करणं, एवढाच ह्या लेखाचा मर्यादित उद्देश आहे.

अनेक कुतूहलांची कोडी डोक्यांत घेऊन परदेशी पाहुणे अमेरिकेंत येतात. त्यांतलं एक महत्त्वाचं म्हणजे काळ्या लोकांचं! नीग्रोंचा छळ कसा होतो, त्यांना कसं वागवलं जातं, नीग्रो असतात, वागतात तरी कसे इत्यादि अनेक प्रश्न. भारतीय इसमाला अमेरिकेच्या ह्या समस्येंत एक छुपा आसुरी आनंद वाटतो. अस्पृश्यतेचा कलंक असलेल्या हिंदुस्थानला नांवं ठेवणाऱ्या ह्या गोऱ्या लोकांच्या लोकशाही राष्ट्राची काळ्या जनतेबाबतची करणी असते कसाबाची! नीग्रोंची बाजू घेऊन, नीग्रोंचा विषय उकरून

काढून, अमेरिकन माणसाला खालीं पहायला लावण्याचा बहुतेक सर्वजण यत्न करतात.

पण मी पाहिलं आहे—हे काळे भारतीय लोकसुद्धां नीग्रो लोकांचा संपर्क टाळायला बघतात. काळ्या, अस्पृश्यता न पाळणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांना काळ्या मुलामुलींबरोबर हिंडणं पसंत पडत नाहीं. एका गोऱ्या मुलानं आपल्या खोलींत मद्रासी विद्यार्थ्याला राहूं द्यायला नकार दिला. मग त्या मद्राशाला डबल रूम मिळाली, तिथें भागीदार आला तो नीग्रो! आधी अपमानानं दुखावलेल्या मद्राशाला नीग्रो पार्टनर घेणं जिवावर आलं.

एका हिंदी विद्यार्थ्यानें एक वेगळंच दुःख सांगितलं. त्याची मैत्रीण त्याला म्हणाली, ‘ मी तुझ्यबरोबर फिरायला येणार नाहीं. एखाद्या नीग्रो-बरोबर जाईन, पण तुझ्याबरोबर येणार नाहीं. नीग्रो निदान अमेरिकन असतो. तुम्ही काळे, अन् वर परदेशी ! ’

एका ड्रग स्टोअरच्या मालकानें वादविवादाच्या ऐन भरांत आम्हां हिंदी मुलांच्या टोळक्याला विचारलं, ‘ माझ्या मुलांना स्लमूमधल्या, वाईट संवयी जडलेल्या, निगर मुलांबरोबर शाळेंत धाडणं मला आवडणार नाहीं. तुम्ही धाडाल कां तुमच्या मुलांना ? अन् नंतर तुमची मुलगी डांबरी रंगाच्या, वायरवजा केसांच्या, जाड ओठांच्या नि राठ कातडीच्या मुलां-बरोबर हिंडूं लागली तर आवडेल तुम्हाला?’ आमच्यापैकीं कुणीच तात्काळ होकार देऊं शकलें नाहीं.

× × ×

अमेरिकेला ह्या विषयांत केवळ खिजवून भागायचं नाहीं. हा प्रश्नच फार घोटाळ्याचा, गुंतागुंतीचा आहे. अस्पृश्यतेचा प्रश्न यापुढें अगदीं क्षुल्लक, सहज सुटण्यासारखा आहे. नीग्रो हे वेगळ्याच वंशाचे आहेत. मानव इथून-तिथून सारखा खरा, पण वंशांचे, जमातींचे जन्मसिद्ध गुणदोष वेगवेगळे असतात हें अगदींच खोटं नाहीं. नीग्रो लोक बुद्धि-भावनेंत उणे नाहींत. पण त्या वंशानें पूर्वकालांत कुठल्याहि शास्त्रांत वैशिष्ट्य दाखवलं नाहीं—जसं आर्यन, पीतवर्णीय वगैरे लोकांनीं दाखवलं आहे. नीग्रो लोकांना दूर, दलित ठेवणें पाप आहे हें पटूनहि त्यांना घरांत घ्यायला मन कचरतं—

ह्यावर शिक्षण, तत्वज्ञान काय कपाळ करणार! ही सोयी समजुतीनें नि अत्यंत संथ गतीनें होणारी सुधारणा आहे......

लिटल रॉकमधल्या शाळेंत नीग्रोंना प्रवेश देण्यावरून गेल्या सालीं रण माजलं नि नीग्रो प्रश्न अधिकच ढवळून आला. आज अमेरिकेला जे अंतर्गत प्रश्न सोडवायचे आहेत, त्यांत हा प्रश्न प्रमुख होऊन बसला आहे.

जिथें विरोध लटका पडेल, नीग्रो–गोरा भेद लक्षांतच येणार नाहीं, अशा आघाड्यांवर हा प्रश्न प्रथम सोडवणं श्रेयस्कर? म्हणूनच बेसबॉल टीममध्यें काळा खेळाडू घेतला जातो, व क्रीडाप्रेमी लोक, नीग्रोद्वेष्टे असले तरी, गप्प राहतात. नाचगृहांत नीग्रो वादक येऊं शकतात ते म्हणूनच.

पण इतर आघाड्यांवर मात्र हा प्रश्न सोडवणं अवघड जात आहे. ऑफिसांत, गांवांत, शाळेंत, क्लबांत नीग्रोला सर्रास हिंडूं देणं हें नेहमीच साधतं असें नाहीं. साधतं तिथें चार इंच पुढें व दोन इंच मागें जाणाऱ्या सरड्याच्या गणितासारखं होतं.

दक्षिणेकडे जाणं मला जमलं नाहीं. पण मिसीसिपी, कॅरोलिना वगैरे विभागांत गेलेले मित्र सांगतात कीं तिथें नीग्रो लोकांना अजूनहि फार वाईट वागवलं जातं. सर्वत्र नीग्रोंसाठीं वेगळ्या मुताऱ्या, बसमध्यें मागें जागा, निराळीं हॉटेल्स, आहेत. नीग्रो शेतकरीहि वेगळे गट करून राहतात! त्यांच्या प्रश्नांसाठीं शेतकी खात्याचे स्वतंत्र अधिकारीहि आहेत. दक्षिणेकडचा नीग्रो अर्थात् सर्व दृष्टीनें मागासलेला आहे.

दक्षिणेकडून दरमहा पांचशे नीग्रो तरी उत्तरेकडे कायमचे रहायला येतात. ह्या स्थलांतरानें त्यांचे दक्षिणेशीं असलेले सर्व संबंध तुटतात. उत्तरेकडे आल्यावर नोकरी मिळतेच असं नाहीं. आणि जागेची तर फारच पंचाईत होते. ह्यांतूनच गुन्हेगारी प्रवृत्तींचा उगम होतो. कांहीं नोकऱ्यांत नीग्रोंची मिरासदारी असली तरी लेबर युनियन्स प्रथमपासूनच नीग्रोविरोधी आहेत.

न्यूयॉर्क, शिकागोसारख्या शहरीं नीग्रो सर्रास हिंडतात. कुठंहि येतात जातात. तरी पण बहुसंख्य नीग्रो बकाल वस्तींतच राहतात. घाणेरड्या गुत्त्यांतून आढळतात. मुताऱ्यांच्या बाहेर बूट पॉलिश करणारे, हमाली करणारे, वगैरे बहुधा नीग्रोच असतात. उत्तरेकडच्या खेड्यापाड्यांतून

नीग्रो औषधालाच मिळाला तर मिळतो. विश्वविद्यालयांत दुजाभाव नसतो. पण ह्याहि सर्व ठिकाणीं नीट पाहिलं तर नीग्रोंना दूर ठेवायचा अलिखित नियम आहे हें कळून चुकतं. कित्येक क्लबांत, पब्जमध्यें नीग्रो येत नाहींत. आले तर त्यांना अनुल्लेखानं, उपेक्षेनं वागवतात.

अमेरिकेंतल्या चौदा मोठ्या शहरांत एकूण लोकसंख्येचा तिसरा भाग भरला आहे. ह्या सर्व शहरांत नीग्रोंची भरती होते आहे. वॉशिंग्टन राजधानींत नीग्रो गोऱ्यांपेक्षां संख्येनें जास्त होत आहेत. न्यूयॉर्कमध्यें पुढील पंचवीस वर्षांत काळ्या गोऱ्यांचीं संख्या समसमान होईल. इतर दहा शहरांत नीग्रो तीस टक्के होतील. उत्तरेकडच्या नीग्रोंना मतदानाचा हक्क आहे. आणखी तीस वर्षांनीं होणाऱ्या निवडणुकींत काय काय घडेल ?

नीग्रो येतात व भरवस्तींत उतरतात. बाजारपेठा नीग्रोंनीं गजबजतात. नीग्रो शेजारी आले कीं गोरे दूर सरूं लागतात. अशा रीतीनें शहराच्या मुख्य वस्तींतून गोरे लोक उठतात व उपनगरांत जातात. उपनगरांतले खर्चिक आयुष्यमान नीग्रोंना परवडत नाहीं. उपनगरं वाढवलीं जातात. त्यांत नीग्रोंना जागा देणार नाहीं अशी अट घातली जाते. उपनगरांत नवे बाजार उघडतात. मोठीं ऑफिसें, बँका जातात. मुख्य शहरांत ( डाऊन टाऊनमध्यें ) नीग्रोंचं प्राबल्य होत आहे म्हणून उपनगरांची निराळी मुनिसिपालिटी बनवायचे डाव आतां सुरू झाले आहेत.

भांडणं—मारामाऱ्या मुख्यत्वें होतात त्या नीग्रो आणि त्यांचे गोरे शेजारी यांच्या. जागा ही एक वस्तू अमेरिकेंत सर्वांना विकत मिळूं शकत नाहीं. नीग्रो माणसाला घर मिळणं, राहायला जागा मिळणं फार फार कठीण आहे.

जुनाट घरांतून, गलिच्छ वस्तींतून, स्लम्समधून नीग्रो राहतात. शरीरावर व मनावर त्या गलिच्छ वस्तींचे परिणाम होतात. स्लम्समधून बाहेर पडलं पाहिजे हेंच आतां नीग्रो लोकांचे एक घोष वाक्य झालं आहे. 'आम्हांला गोऱ्यांच्या घरांत, वस्तींत राहायला नाहीं मिळालं तरी हरकत नाहीं. नकोच आहे. पण आम्हांला ह्या नरकवजा चाळींतून बाहेर काढा. स्वच्छ हवा, सूर्यप्रकाश द्या—' असं नीग्रो पुढारी म्हणतात.

नीग्रो मनुष्य घाणेरडा असतो असं सरसकट विधान केलं तर तें फार धाडसाचं होईल. पण मूठभर सुशिक्षित नीग्रो लोक सोडले तर हें विधान चुकीचं ठरणार नाहीं. पुरुषांच्या ह्या गलिच्छ वागणुकीवर नीग्रो स्त्रियांनीं वर्तमानपत्रांतुन नुकतीच केवढी झोड उठवली होती. नीग्रो पुरुष थोडासा क्रूर, बराच क्षुद्र व कमालीचा अस्वच्छ असतो असं त्यांच्या स्त्रियांचं म्हणणं ! नीग्रो कुटुंबांत मी राहिलों, पण तिथल्या स्त्री–पुरुषांत हा भेद मला दिसला नाहीं. दोघंहि सारखेंच अस्वच्छ संवयीचे होते !

शहरांत राहणारे श्रीमंत नीग्रो आपल्या गरीब बांधवांशीं फटकून वागतात, हें नीग्रो उद्धाराचें दृष्टीनें विपरित आहे. नाडलेला, पिळलेला नीग्रो शहरांत येतो, स्वातंत्र्य चाखतो, श्रीमंत होतो, नि मग बरेच वेळां ह्या गोष्टींचं त्याला अजीर्ण होतं. आपल्या श्रीमंतीचा गाजावाजा करण्याची लालसा त्याला होते. मिळालेलं स्वातंत्र्य टिकविण्यासाठीं, त्यांत गुंगून राहण्यासाठीं तो स्लम्स्मधल्या आपल्या बांधवांना टाळतो. असे नीग्रो हे खर्चिक, भडक कपडे घालणारे, नाईटक्लब्ज मधून हिंडणारे असतात. हे हमखास तांबडा टाय् घालतात, कॅडीलॅक मोटार घेतात, उंची मद्य पीत रात्र घालवतात.

अमेरिकन नीग्रो आणि आफ्रिकन नीग्रो यांच्यांतले साम्य रंगांत देखील दिसत नाहीं. गुलाम म्हणून अमेरिकेंत आलेल्या काळ्या लोकांचा मायभूमीशीं असलेला संबंध कधींच तुटला आहे. वंशानें, रंगानें हे वेगळे असले, तरी आहेत अमेरिकनच. त्यांची भाषा अमेरिकन, संस्कृति अमेरिकन, देश अमेरिका. ‘ आफ्रिकेकडे परत–’ अशी चळवळ सुरू करण्याचा प्रयत्न म्हणूनच अयशस्वी झाला. आफ्रिकेंतले देश स्वतंत्र झाल्यावर असंख्य अमेरिकन नीग्रोंना मात्र आनंद झाला. हारलेममध्यें घानाच्या एनक्रूमांचं झालेलं स्वागत अविस्मरणीय होतं. आफ्रिकेंतल्या स्वतंत्र देशांना इंजिनिअर्स, डॉक्टर्स, प्रोफेसर्स हवे आहेत–तिथें अमेरिकन नीग्रोंनीं जावं असा प्रचार आतां सुरू आहे.

संगीतासारखी नाजुक कला आणि मुष्टियुद्ध आणि इतर शक्तीचे खेळ ह्या परस्पर विरोधी गोष्टी नीग्रो माणसांत एकवटलेल्या आहेत ही गोष्ट अचंबा करण्यासारखी आहे. लुई आणि इतर अनेक नीग्रो वीर मुष्टियुद्ध,

कुस्ती आणि तत्सम क्रीडेंत प्रावीण्य मिळवून आहेत. सुप्रसिद्ध पॉल रॉबूसन, भारतांत दौरा करणारी मरिअम अँडरसन, सेंट लुईज् ब्लूचा कर्ता डब्ल्यू, सी. हँडी आणि तरुणांचा लाडका हॅरी बॅलाफोंटे हे सारे गायक नीग्रोच आहेत. जाझचं संगीत हें खास नीग्रोंचं. बहुतेक ठिकाणीं बरेचसे वादक नीग्रोच असतात.

संशोधनांत, महत्वाच्या खात्यांत अधिकारी म्हणूनहि कांहीं नीग्रो काम करीत आहेत. परराष्ट्रांत वकील म्हणून एक नीग्रो आहे, तर परवां अमेरिकन विमान वहातूक कंपनीनें प्रथमच एअर होस्टेस म्हणून एका नीग्रो मुलीला निवडलं आहे.

साठ वर्षांपूर्वी बुकर टी वॉशिंग्टन हा नीग्रो जनतेचा एकमेव पुढारी होऊन गेला. आज नीग्रो समाजाला एकच असा पुढारी नाहीं. एका दृष्टीनं ही चांगली व एका दृष्टीनें घातुक गोष्ट आहे. घातुक अशासाठीं कीं उलटसुलट विचार सरणींचे नीग्रो पुढारी आज बजबजपुरी माजवीत आहेत. पण अनेक आघाड्यांवर अनेक नीग्रो पुढारी तयार होत आहेत, ही आशादायक घटना आहे. थरगुड मार्शल, मार्टीन लुथर किंग, रॉय विल्किन्स, वॉल्टर व्हाईट हे कांहीं पुढारी लिट्ल रॉक प्रकरणानं प्रकाशांत आलेली डेझी बेट्स् ही पण पुढारीच म्हणायला हवी.

लेखकांत नीग्रोंनीं फारसा वाटा उचललेला दिसला नाहीं. नीग्रोवर ललित लेखन होतं त्यांत अंकल अगर आँटी ह्यांची विदुषक अगर कारुण्यमूर्ति हीच भूमिका नीग्रोंच्या वांट्याला येतें !

वॉशिंग्टन, न्यूयॉर्क वगैरे ठिकाणाहून खास नीग्रोंची दैनिकं, साप्ताहिकं निघतात. हीं वर्तमानपत्रं बहुधा भडक बातम्या भडक भाषेंत छापतात. शिकागोचं 'जॉन्सन पब्लिशिंग हाऊस' नीग्रोंसाठीं 'टॅन' व 'एबनी' हीं दोन मासिकं काढते. 'टॅन' हे ललित लेख, कथा वगैरे छापतं. ठराविक छापाच्या गोष्टी, फक्त कथेंतल्या व्यक्ति काळ्या. 'एबनी' मासिक 'लाईफ' मासिकाबरहुकूम काढण्याचा यत्न केला जातो. 'एबनी'तले लेख सौम्य, सखोल असतात. नीग्रो प्रश्नावर अनेक बाजूंनीं अभ्यासपूर्ण असे लेख त्यांत येतात. 'एबनी'तल्या जाहिराती पहाण्यासारख्या असतात. त्याच टूथपेस्टच्या, बीअरच्या जाहिराती. फक्त 'लाईफ'मध्यें गोरी तरुणी, गोरं कुटुंब असतं;

तर 'एब्नीं' तल्या जाहिरातींत काळी सुंदरी, काळं कुटुंब असतं. 'लाईफ'-मध्यें केस कुरळे कसे करावे, कातडी तांबूस कशी बनवावी, ह्यावरचे लेख; तर 'एब्नी'त कुरळे केस लांब सडक कसे करावेत, कातडी निमगोरी, फिकटरंगी कशी बनवावी- ह्यांची माहिती.

नीग्रो पुरुष हा गोऱ्या पुरुषापेक्षां जास्त शरीरसुख देऊं शकतो असा खराखोटा समज पसरलेला आहे. ह्या समजुतीवर आधारून अनेक इतर बातम्या फैलावतात. अनेक घटनाहि घडतात. शिकागोला नीग्रो पुरुष व गोऱ्या स्त्रिया ह्यांचा गुप्त क्लब आहे ही एक सर्वत्र उठलेली आवई. एखादी गोरी पोरगी नीग्रो मुलाशीं मैत्रीं ठेऊं लागली तर ती शरीरसुखाला हपापलेली आहे अशी टीका होते; तर हपापलेल्या गोऱ्या मुली नीग्रो तरुणाबरोबर नाचायफिरायची संधी शोधीत असतात.

बलात्काराच्या आरोपावरून अनेक नीग्रो तरुणांना कोर्टापुढें खेचलं जातं. नीग्रोंचं यावर असं म्हणणं आहे कीं, बलात्कार करणाऱ्यांत नीग्रो तरुणांचं प्रमाण गोऱ्या तरुणांपेक्षां कमी आहे.पण नीग्रोनं बलात्कार केला कीं त्याचा फार गाजावाजा केला जातो. नीग्रो नालायक आहेत, सभ्य समाजांत त्यांना मिसळून देऊं नये, वेगळे ठेवावेत, असा प्रचार सुरू होतो. पोलीस सगळे गोरे. ते नीग्रोंचा छळ करतात. वर्तमानपत्रंहि नीग्रोंना सतावणारींच असतात.

काळ्या गोऱ्यांच्या संकरापासून निर्माण झालेली संतति मात्र सुंदर असते. हें 'म्युलॅटो' अर्धे गोरे, पाव गोरे, पाऊण गोरे असे असतात. शिकागोच्या कुठल्याहि रस्त्यावरून हिंडलं तरी गोऱ्या वर्णाच्या पण जाड ओटाच्या, जरा बसकट नाकाच्या व धिप्पाड अंगाच्या मुलींपासून पातळ ओठ, लांबसडक केस, निळे डोळे पण काळा रंग अशा मुलींच्या अनेक परी पहायला मिळतात. काळ्या गोऱ्यांतल्या उत्कृष्ट गोष्टींचं मिश्रण झालेल्या ह्या तरुणी लोभनीय, कमनीय वाटतात. ब्लॉंड, ब्रुनेट् पोरीहि त्यांच्यापुढें सुमार वाटतात.

विस्मय वाटतो तो म्हणजे निमगोऱ्या नीग्रोंना आपल्या उजळ कातडीचा अभिमान वाटतो याचा. आपण शुद्ध नाहीं ह्याची त्यांना खंत वाटत नाहीं. निमगोरे नीग्रो काळ्या नीग्रोंना कमीहि लेखतात. नीग्रो कुटुंबांत

एखादं जरा उजळ मूल आढळतं, त्याचं जन्मरहस्य रंगामुळें जाहीर होतं, पण घरांत त्या मुलाचं उजळ कातडीचा म्हणून कौतुकच केलं जातं !

कायद्यांच्या कचाट्यांत अडकलेला, दलित, उपेक्षित, असा असूनहि नीग्रो समाज गेल्या कांहीं वर्षांत घोडदौड करीत आहे. साक्षरता आतां नव्वद टक्क्यांवर आली आहे. दीड लाख नीग्रो विश्वविद्यालयांत शिकत आहेत. सैन्यांतून काळा गोरा भेद काढून टाकला आहे. नीग्रो नोकरांचे पगार गेल्या वीस वर्षांत चौपट झाले आहेत. तीस टक्के कामगार नीग्रो आहेत, तर दहा लाख नीग्रो शेतीचे मालक आहेत. सगळ्यांत महत्त्वाचं म्हणजे, नीग्रो समाजांत मध्यमवर्ग Upper middle class निर्माण झाला आहे. हा वर्गच आपल्या समाजाला मार्गदर्शन करणार आहे.

कांहीं नीग्रो विद्यार्थ्यांशीं व एका नीग्रो कुटुंबाशीं माझे संबंध आले, त्यावरून मी चारपांच ढोबळ निष्कर्ष काढले ते असेः 'आमचा द्वेष करूं नकाच, पण आमची दयाहि करूं नका. मुख्य म्हणजे आमच्या उद्धाराची भाषा बोलत जाऊं नका. तो होणार आहे. जगांत काळे लोक बहुसंख्य आहेत. अमेरिका कोंवळा देश आहे, लोकशाहींत मुरलेला आहे, आणि इथेंच आम्ही सुखांत, समानतेनें राहणार आहोंत' हें नीग्रोंचं म्हणणं आहे. हा उद्धार मात्र कांसवगतीनें होणार आहे. नीग्रो माणूस हा साधारपणें अस्वच्छ संवयींचा व अकलमंद आहे. ह्याला बरेच अपवाद आहेत हें लक्षांत घेतलं, तरी सुशिक्षित नीग्रो, श्रीमंत नीग्रो हाच नीग्रो समाजाचा वैरी होण्याची भीति आहे. सगळेच गोरे नीग्रोंना थोडेफार टाळायला बघतात हें नीग्रोंनीं हेरलं आहे. एकूण प्रश्न गुंतागुंतीचा आहे व ही गुंतागुंत वाढत जाण्याचीहि धास्ती आहे. नीग्रो मुलगा मुलगी कशीहि असली तरी त्याच्याजवळ एक मोठा ठेवा मात्र आहे; भावनांनीं ओथंबलेलं मन !

●●●

*

*
*
*
*
*

# १५ विलासी लिंकन

अंधार पडूं लागतो. दिव्यांची आरास सुरू होते. वाऱ्याला वेगळाच वास येऊं लागतो. मन हुरहुरतं. कुठेंतरी दूर जावं, कांहींतरी अनुभवावं, ह्यासाठीं जीव आसुसतो. परदेशी माणूस अस्वस्थ होतो. घराची आठवण होते. त्यामुळं इथल्या तात्पुरत्या निवासस्थानांत बसणं जड वाटतं. इथें कसलींच बंधनं नाहींत हें ध्यानांत येतं. सगळं स्वातंत्र्य नि सगळं अनोळखी! चोरटेपणाची, संभावितपणाची जाणीव नाहींशी होते. आयुष्य भरभरून वहात असतं. पळांपळांनीं, दिव्यादिव्यांनीं, मद्याच्या पिपापिपांनीं फुलत असतं. प्रत्येक समाजाच्या, देशाच्या विश्रांतीच्या व विलासाच्या तऱ्हा वेगवेगळ्या! अमेरिकेसारखा सुधारलेला, संस्कृतीनें निराळा, स्वातंत्र्यप्रिय, गर्भश्रीमंत देश सूर्य बुडाल्यावर काय रंगेलपणा करतो ह्याचं सर्वांनाच असणारं कुतूहल जागं होतं. मावळतीनंतर एक वेगळं जग इथं निर्माण होतं हें कळून चुकतं! भटकणाऱ्या मनामागोमाग पाय धावूं लागतात.

आठवड्याअखेरच्या बऱ्याच सुट्टया खेड्यांत घालवल्या. ल क्रॉस, डेलावन, रॉकफर्ड, लेक जिनीव्हा, लॅनार्क, डल्फीन. इथल्या स्वच्छ, सुबक, सुखसोयींनीं परिपूर्ण गांवांनीं माझ्या मनावर मोहिनी घातली आहे. शह-

रांतला स्वैराचार किंवा विद्यापीठांच्या गांवांतली दंगल ह्या खेड्यापाड्यांत आढळत नाहीं. नाईट क्लब्ज् वगैरे सहसा सांपडत नाहींत. एखाद दुसरा दारूगुत्ता, एखादा नाचाचा कार्यक्रम ! बाकी सारं कसं शांत शांत...

लेक जिनीव्हाला एक शनिवार शेतीवाडी पहाण्यांत व गांवातल्या चर्चमधला ग्रंथसंग्रह चाळण्यांत घालवला. जिम कलबर्टसनच्या घरीं मुक्काम होता. संध्याकाळचं जेवण उरकलं. टेलीव्हिजनवरचे एकदोन सिनेमे पाहिले. रात्रीचे दहा झाले, पण झोंप येईना. मग मोटारमधून भटकायला बाहेर पडलों.

कष्टाचा वाघ मागे लागलेल्या शहरांतल्या लोकांना वीकएंडचं अप्रूप वाटतं, तसं गांवढ्यांतल्यांना वाटणं शक्य नसलं तरी आठवडा सरल्याची जाणीव सगळीकडे होती. सुपर मार्केट आज उशीरापर्यंत उघडं होतं व आठवड्याचा बाजार करून गृहिणी परतल्या होत्या. एका घरापुढच्या बागेंत सगळं कुटुंब खुर्च्या टाकून हंसत खिदळत आईस्क्रीम खात होतं. रस्त्याच्या कडेनं दोन म्हातारीं जोडपीं मुंगीच्या पावलांनीं कुठंतरी चाललीं होतीं. गांवाच्या टोकाला असलेल्या बीअरच्या गुत्त्यांत नेहमीपेक्षां जास्त गर्दी होती. भिंतीवर चित्र लावून नेमबाजी करण्यांत चारपांचजण रमले होते. बीअरच्या हौदांतून कांचेचे वाडगे भरले जात होते. गुत्त्यापलिकडे उभ्या असलेल्या स्टेशनवॅगनमध्यें कांहीं स्त्री-पुरुष मद्यपान करीत मूकपणें बसले होते. तर तळ्याकांठीं गाड्या उभ्या करून कांहीं जोडपीं नुसतीच विसावलीं होतीं गळ्यांत गळे टाकून ! तळ्यांत होडी लोटून दोन चार पोरं कालवा करीत होतीं. हायवेवरून तुफानी वेगानें मोटारी कुठून कुठें जात होत्या. बहुधा वेगाचं व्यसन असणाऱ्या तरुणांचा वीकएंड साजरा करण्याचा हा सोस ! गांवांतल्या बोलींग ॲलीमध्यें गर्दी होती. कम्युनिटी चर्चमधलीं कसलीशी सभा संपली होती व दाराशीं पांचसहाजण चर्चा करीत उभे होते. शेजारच्या गांवीं शाळेंतल्या फन फेअरला बरींचशीं कुटुंबं गेलीं होतीं.

हेंच बहुधा थोड्याफार फरकानं दर शनिवारीं ! आणि सगळ्या गांवांत ! माफक मद्यपान; छोटं पिकनिक; बोलिंग, स्केटिंग, फिशींग; नाचाचा कार्यक्रम ! मोटारमधून सुसाट सहल !

युनिव्हर्सिटी टाउन्समधल्या वीकएण्ड्सना वेगळा रंग भरतो. विद्यापीठ एखाद्या मोठ्या शहरांत असलं तर मुलं फार पांगतात व नव्या नि धोक्याच्या चैनी शोधूं लागतात. पण बरीचशीं विश्वविद्यालयं छोटेखानी शहराला लागून असतात. मग शहरांतल्या स्वैराचारी जीवनाचा मुलांवर परिणाम होऊं शकत नाहीं. कॉलेजवीरांच्या करमणुकी शहरीं चैनीला लाजवतील अशाहि असतात. सोमवार ते शुक्रवार अभ्यासाच्या घाण्याला जुंपलेलीं विद्यापीठांतली हजारों मुलं--मुली शुक्रवारची संध्याकाळ झाली कीं मोकाट सुटतात. रविवार पहांटेपर्यंत पिसाळल्यासारखी वागतात.

युनिव्हर्सिटीचं ' मेमोरिअल युनियन ' हें सगळ्या कार्यक्रमांचं केंद्रस्थान असतं. शुक्रवार–शनिवारीं तर कार्यक्रमांना उधाण येतं. सफरी, सहली, नाटकं, नाटिका, चित्रपट, अनुबोधपट, जेवणावळी ओपन हाऊसेस, बीअर पार्टीज, सभा, व्याख्यानं, चर्चा, वादसभा, प्रदर्शनं ! गाण्याचे, संघवादनाचे नाचांचे जुलूस ! डोंगर चढणीचे, स्केटिंगचे, मासेमारीचे, बोटिंगचे, पोहण्याचे, शर्यतीचे वनभोजनाचे बेत ! शुक्रवार व शनिवार युनियन नुसतं गजबजलेलं असतं. कुठें जाऊं, काय पाहूं असं होऊन जातं ! हें सारं विद्यापीठामार्फत आंखलेलं असतं. खेरीज विद्यार्थ्यांचे इतर कार्यक्रम असतात ते वेगळेच !

वीकएण्ड उधळायचा म्हणजे ' डेट ' हवी. जोडीदार अगर जोडीदारीण सोमवार मंगळवार पासूनच निवडलेली असते. मुलामुलींच्या जोड्या अगर टोळक्या मग शुक्रवार संध्याकाळपासून सर्वत्र दिसूं लागतात. बीअरचे गुत्ते गजबजतात. चित्रपटगृहांत चुंबनाचे प्रात्यक्षिक सुरू होतं. नदी अगर तळ्याकाठीं, बागेत अगर जंगलांत मुलंमुली भटकत राहतात.

यौवनांत पदार्पण करणाऱ्या मुलामुलींचं हें स्वैर वर्तन भारतीय मनाला अस्वस्थ करतं. सिगरेट मद्याच्या सान्निध्यांत कोंवळ्या मुलामुलींनीं असावं हें विचित्र वाटतंच, पण जरासा स्नेह जुळाला कीं चुंबना–आलिंगनांचे प्रकार सुरू व्हावेत ह्याचं आश्चर्य व उद्वेगहि वाटतो. सिनेमा थिएटरांत शेंकडो पोरं–पोरी मिठ्या मारून बसलेलीं पाहिलीं कीं सिनेमांतला आनंद लुप्त होतो. पहांटेपर्यंत भटकणाऱ्या मुली, मुलींच्या वसतिगृहाजवळ चाललेली दंगल, हें सारं अमेरिकन युवकाबद्दल वाईट मत बनवूं लागतं.

विद्यापीठांच्या मुलामुलींनीं केलेला 'कॅम्पस कार्निव्हल' हा एका रात्रीच्या करमणुकीचा कार्यक्रम पाहून मन असंच थिटून गेलं. प्रत्येक फ्रॅटर्निटी (मुलांच्या—) व सोरॉरिटींनीं (मुलींच्या देशव्यापी संघटनांनीं) आपापला कार्यक्रम रचला होता व हे सगळे 'वग' एकदम चालू होते. तिकिट काढून फिरत फिरत हे बघतां येत होते. कुठल्याच गटानें केलेल्या प्रयोगांत बुद्धीचा, कलेचा अगर नाविन्याचा भाग नव्हता. ("त्यासाठीं वेगळे कार्यक्रम—कार्निव्हल म्हणजे असाच आचरटपणा, उत्तानपणा व मजा हवी" कार्निव्हलचा सेक्रेटरी म्हणाला.) चांच्यांनीं पकडलेलं गलबत व चालवलेली लूट; हजामतीचें दुकान: आपल्या प्रेयसीकडून दाढी करा; अरब गुलामाचा बाजार व त्यांत स्त्रियांची विक्री; अंधारांत छोट्या रेलगाडींत प्रवास: जवळ एक तरुणी—असले वेगवेगळे कार्यक्रम! फिरत्या चक्रावर मुली बसवल्या होत्या. कागदी फुलांची माळ त्यांच्या गळ्यांत दुरून फेकायची. माळ गळ्यांत पडली तर त्या तरुणीचं चुंबन मिळे.

कॉलेज विद्यार्थ्यांच्या स्वैरवर्तनाची व विकृतीची सीमा 'पँटी रेड्स' ह्या जवळजवळ सगळ्याच युनिव्हर्सिटीज्मधून सुरू झालेल्या क्रीडेंत दिसते. उन्हाळ्याच्या सुरुवातीला वसंताचं स्वागत करायचं, कपड्यांचं ओझं टाकून पाण्यांत डुंबायचं, घरीं बसून राहण्याऐवजीं निसर्गांत भटकायचं, प्रेम लुटायचं, ह्या कल्पनेंतून एखादा वसंतोत्सव निर्माण करण्याऐवजीं एक दिवस एकाएकी सारीं मुलं शिमगा आरंभतात. एकमेकांवर—मुख्यतः मुलींवर पाण्याच्या बादल्या नि फवारे सोडतात. दंगल वाढते व विद्यार्थ्यांची टोळकीं विद्यार्थिनींच्या वसतिगृहाकडे मोर्चे वळवतात. खिडक्या खिडक्यांतून मुली मुलांना चिडवतात. उघडे पाय हालवीत बसतात. मुलं मग खवळतात. बेफाम होतात. नियम मोडून वसतिगृहांत घुसतात. मुलींच्यावर अत्याचार होत नाहींत. पण मुलांची मागणी असते ती मुलींच्या पँटीज्ची—आंतचड्ड्यांची! दारं ठोठावलीं जातात, मोडलीं जातात. हटवादी मुलींना आंघोळ घातली जाते. मुली भिऊन—नि बऱ्याचदां मजा वाटून—पँटीज् मुलांच्या स्वाधीन करतात. दंगल वाढते तशी पोलीसहि येतात. मोडतोड, मारामाऱ्या—आठवडाभर तरी वर्तमानपत्रांना व विद्यापीठाला काम मिळतं.

मोठ्या शहरांतून विलासी जीवनाला अगर विकृत वर्तनाला वीकएण्डच हवा असं नाहीं. मद्यशाळा, क्रीडागृहं, रात्रीचे क्लब्ज्, अंधार पडण्याआधींच स्वागताला सज्ज असतात, काळे व भेसळ लोक, काबाडकष्टानं अर्धमेले होऊन आयुष्यांत आनंद शोधूं पहाणारे रंगेल, चंगीभंगी, आयुष्यांत परवड होऊन शून्यमनस्क झालेले जीव–ह्यांनीं ही चैनीची स्थानं गजबजूं लागतात. स्लम्स्, नोंकरीसाठीं एकटे राहणारे स्त्री–पुरुष, कामगार वर्ग, सट्टेबाज ह्या सर्वांनीं अमेरिकन शहरावर पकड घातली आहे. ह्या सर्वांमुळें मोठ्या शहरांतलं जीवन अनीतिकारक, विलासयुक्त, विकृत झालेलं आहे.

डेट्राईट, इंडियनापोलीस, सॉल्ट लेक सिटी, डेनवर, सेंट लुई–कित्येक शहरं रात्रीचीं पालथीं घातलीं. उघड वेश्याव्यवसायाला बंदी आहे. संशयितांचे मागे पोलिसांचा ससेमिराहि असतो. तरी पण सर्रास स्वैराचार चालूं आहे, हें सहज ध्यानांत येतं. स्ट्रीट गर्ल्स सर्वत्र असतात. फूटपाथवर संथपणें चालणाऱ्या, दुकानांच्या कांचेच्या प्रदर्शनी विभागांत वस्तू पहात रेंगाळणाऱ्या, बस स्टॉपपाशीं उभ्या असलेल्या ह्या तरुणी तुमची पारध करूं इच्छितात हें सहज ओळखतां येतं. कॉल गर्ल्सचं जाळंहि सर्वत्र पसरलेलं असतं. सार्वजनिक बाथरूम्समध्यें अगर टेलिफोन बूथमध्यें आपलें टेलिफोन नंबर त्या लिहून ठेवतात व मग तो नंबर पाहून कुणी फोन करेल ह्याची वाट पहात ह्या मुली बसतात.

मद्यशाळेंतून स्त्रिया अशाच आढळतात. एकट्या दुकट्या. ह्या मुली बहुधा अल्कोहोलीक असतात. मद्यपी बनलेल्या असतात. आयुष्यांतल्या तीव्र निराशेनं अगर दुःखानं त्या मद्यशरण होतात. दारू घेतली नाहीं तर जगणं अशक्य होतं व दारूला पुरेसा पैसा नसतो. (कारण पुरेशी दारू ह्या शब्दप्रयोगाला त्यांच्या लेखी अर्थ नसतो–) मग केवळ व्हिस्कीच्या बाटलीसाठीं कुठल्याहि पुरुषाशीं शय्यासोबत करणं भाग पडतं. चैन नाहीं, विलास नाहीं, पैसा नाहीं–फक्त एकच प्याला हवा म्हणून !

सॉल्ट लेक सिटीच्या हमरस्त्यावरून, बगीच्यांतून बरेचसे म्हातारे भेटत. हलकेच जवळ येत. 'दिवसभर उपाशी आहे, एक डाईम् तरी द्या,' म्हणून याचना करीत. ह्या अजीर्णश्रीमंत देशांत भिकारी भेटावेत ह्याचं नवल वाटे. सेंट लुईला आम्ही हिंडत होतों. एका घराच्या दाराशीं उभ्या

असलेल्या स्त्रीनें माझ्या सोबत्याला हटकलं व काड्याची पेटी मागितली. त्यानें काडी शिलगवून त्या स्त्रीच्या ओठांतली सिगरेट पेटवायचा दोनदां यत्न केला. दोन्ही वेळां सिगरेट विझली. ती म्हणाली, 'वारा फार आहे–जरा आंतल्या अंगाला ये.' तो उंबरठ्याआड गेला. चार चौघांसारखं घर होतं. बाजूला चारपांच मुलं खेळत होतीं. सिगरेट पेटतांच खूष होऊन त्या स्त्रीनं माझ्या सोबत्याला प्रेमाचं आलिंगन दिलं. सोबती दचकला, अन् तेव्हांच त्याच्या लक्षांत आलं कीं खिशाला धोका आहे. तिचे हात हिसडून तो बाहेर आला. जरा लांब गेल्यावर आम्हांला कळलं कीं तेथल्या चार पांच घरांतून अशी वाटमारी होते. मिठी मारून पाकिट उडवलं जातं. बाजूला खेळणारी मुलं पाकीट उचलून धूम ठोकतात. तुम्हाला पाकीट गेल्याबद्दल ओरडहि करतां येत नाहीं. शिवाय तुम्ही त्यांच्या घरांत असतां! इंडियनापोलिसच्या ग्रेहाऊंड बसच्या स्टेशनांत कितीतरी जुगाराचे खेळ मांडून ठेवले आहेत. मुलं–मुली, गुळाला मुंगळे लागावेत तशा स्लॉट मशीन्सजवळ घोंघावत असतात. जुगारानं शहरांतल्या कोंवळ्या जीवांना कीड लागली आहे. रॉक अँड रोल, टी. व्ही. आणि स्लॉट मशीन्स हीं तीन भुतं उगवत्या पिढीच्या मानगुटीस बसलीं आहेत.

फिलॅडेल्फिया, वॉशिंग्टन ( डी. सी. ), लॉस एन्जेलीस वगैरे गांवीं चोऱ्या-दरोड्यांचं व खुनांचं प्रमाण अधिक आहे, असं म्हणतात. ह्या तिन्ही शहरीं रात्रीं एकटं हिंडतांना धास्ती वाटत असते. केव्हां कुणी चाकू अगर पिस्तुल दाखवील ह्याचा नेम नसतो म्हणे! पैशासाठीं अडवलं तर समजण्यासारखं आहे, पण गंमत म्हणून खून केला जातो. माणूस मरतांना, मेलेला पाहण्यांत सैतानी आनंद लुटणारे विकृत लोक ह्या शहरांतून आहेत–वगैरे वाचलं कीं अंगावर शहारे येतात. ह्या टोळ्या न्यूयॉर्क शिकागोला अधिक आहेत असं सांगितलं जातं.

वॉशिंग्टन ( डी. सी. ) मध्यें नीग्रो व पोर्टोरिकन लोकांचं प्रमाण फार आहे. एकदां रात्रीं फिरतां फिरतां काळ्या जमातीच्या वस्तींत घुसलों. सगळी अस्वच्छता! फूटपाथ, घरं, दुकानं बुरसटलीं होतीं. घरापुढें बसून माणसं हंसत खिदळत होतीं. कसल्याशा चर्चमधली सभा संपली होती व शेंकडों नीग्रो कुटुंबं बाहेर पडत होतीं. एका बारमध्यें गेलों. खुंटावर बसून

लोक बीअर पित होते. आंतल्या अंगाला मोठ्या हॉलमध्यें नृत्य रंगांत आलं होतं. हैदोस धुल्ला चालला होता. सगळ्या जमावांत एकहि गोरा माणूस नव्हता. बाहेर आलों तों झिंगलेल्यांची टोळकी भेटलीं. अचकट विचकट बोलत व गाणीं म्हणत तीं चालली होतीं.

लॉस एन्जेलीसला हाच प्रकार गोऱ्यांच्यां वस्तींत व वरच्या पातळीवर आढळला. सनसेट् बुलेवार्ड वाईन बुलेवार्डला छेदून जातो, तिथल्या निशा-गृहांत आम्ही गेलों. एका नृत्य संस्थेचं संमेलन सुरू होतं. ही नृत्यसंस्था म्हणजे तरुण तरुणींनी एकत्र यायचं संकेतस्थान एवढंच नव्हतं, तर चित्र-पट व टेलिव्हिजन निर्मात्यांना सौष्ठव व सौंदर्य शोधण्याचं स्थळ होतं. तसंच मुलींना भुलवून युरोपांत नेणाऱ्या एका टोळीची ती मोर्च्याची जागा होती. हें सारं उघडपणें चालू होतं म्हणे!– नृत्यसंस्थेचं संमेलन म्हणजे नुसती मोफत दारू पिणं, कुणाहि स्त्रीला हटकून नाच करणं, तिची तयारी असेल तर मागच्या बगीच्यांत जाणं–एवढंच! उत्तर रात्रीपर्यंत दोनशें एक पुरुषांनीं व तीनशें एक स्त्रियांनीं काय धुमाकूळ केला असेल ह्याची कल्पनाच केलेली बरी—

वॉशिंग्टनला अनेक सरकारी व खाजगी कंपन्यांच्या कचेऱ्या आहेत. त्यांत काम करायला म्हणून देशभरच्या तरुणतरुणी येतात. घरदार सोडून राजधानींत एकटं रहायचं, द्रव्यार्जन करीत संसार दूर ढकलायचा–ह्याचा तरुण पिढीवर फार ताण पडत आहे. हातांत पगार, वडिलधाऱ्यांचा दाब नाहीं व खाणावळींत राहणं ह्यामुळें स्वैरवर्तनाला ऊत न आल्यासच नवल! लॉस एन्जेलीसला रुपेरी पडद्याच्या लोभानं अशीच देशभरचीं तरुण मुलं-मुली प्रत्यहि येतात. सिनेमाच्या नादापायीं आयुष्याची परवड करून टाक-तात. फॅशन परेड, बॅलेज्, नृत्यशाळा वगैरेसाठीं मुली शेकड्यांनीं लागतात. इथल्या कॅफे व बार्ससाठींहि मुलीच हव्या असतात. लॉस एन्जेलीसला मुलींची बेसुमार संख्या आहे. ह्या सुंदरी पैसा मिळवण्यासाठीं मग अनेक समस्या निर्माण करतात...

सर्व शहरांत मला सॅन फ्रॅन्सिस्कोचं निशाचरी जीवन सुसंस्कृत वाटलं. फ्रिस्को मधले बरेचसे नाईट क्लब्ज नमुनेदार आहेत. बिंगो, ब्लॅकहॉक, स्कायरूम, गे नाईन्टीज्, फॉरबिडन सिटी–कुठल्याहि नाईट क्लबमध्यें जा,

तुम्हाला आदबशीर वागणूक व बहुढंगी करमणूक आढळेल. 'जाझ शॉप'मध्यें जाझ बँडचे सगळे नमुने ऐकायला मिळतील. 'पर्पल ओनियन'मध्यें ताज्या घडामोडीवर आधारलेलीं नाट्कलीं व असंबद्ध भाषणं ऐकायला मिळतील. बहुतेक ठिकाणीं तिकिट नाहीं—फक्त माणशीं अमुक डॉलरचं मद्य घेतलं कीं झालं. एक प्याला घेऊन तासतास बसलांत तरी चालतं. रात्रभर हिंडलांत तरी कोणी अडवणार नाहीं. Where to sin in San Fransisco? (सॅन फ्रॅन्सिस्कोंत पाप कुठें करावं?) म्हणून ग्रंथच मिळतील तुम्हाला ! जॉईंटस्, नाईट क्लब्ज्, फ्लोअर शोज् ह्या सर्वांचा आदर्श फ्रिस्को नगरांत दिसतो. कित्येक ठिकाणीं स्त्रीपुरुषांचा संमिश्र समाज प्रेक्षक म्हणून आढळतो. कित्येक फ्लोअर शोज्मध्यें काम करणारे टेलिव्हिजन अगर सिनेमांत ख्याती पावलेले कलावंत असतात. वॉशिंग्टन, लॉस एन्जेलीसचे 'नाईट लाईफ्' पहायला खास बसेसची व्यवस्था केली आहे. पण बसमधून व एकटं दुकटंहि रात्रींचं हिंडावं तें सॅन फ्रॅन्सिस्कोलाच ! कोलंबस अव्हेन्यूवरच्या पाणसुंदरी पहाव्यांत, हाईड स्ट्रीटवरच्या कार्नेजी जाझ हॉलमध्यें जावं, चायना टाऊन तर सगळा पालथा घालावा...

विकृत आणि विलासी जीवनाचा निशाचरी अतिरेक आढळला मात्र शिकॅगोला ! शिकॅगो शहर आधींच गुन्हेगारी व अनीतिपायीं जगभर ख्याति पावलेलं आहे. शिक्षण, शास्त्र, चांगल्या करमणुकी, प्रदर्शनं अनेक चांगल्या गोष्टी ह्या नगरांत आहेत. नुसता सायन्स म्युझियम पाहिला तरी खूप आहे. पण शिकॅगोच्या रंगेल रात्री डोळ्याआड होत नाहींत. शिकॅगोला येणारा प्रत्येक जण स्कीडरो व कॅलमेट् सिटीला विसरूं शकत नाहीं.

डाऊनटाऊन शिकॅगोंत अनेक नाईट क्लब्ज आहेत. ह्यांना सरसकट 'जॉईंट' म्हणूनहि संबोधलं जातं. हीं बाजारी विलासघरं बाहेरून एखाद्या फोटो स्टुडियोसारखी दिसतात. दाराच्या दोन्ही बाजूला कांचांमागें तरुणींचे अर्धनग्न फोटो लावलेले असतात. निरनिराळ्या खेळांत कोण कोण काम करणार त्याची सचित्र माहितीहि मिळते. रात्रीं दाराशीं एखादा काळा शिद्दी अगर रंगवलेल्या पोरी उभ्या राहतात व पांथस्थांना पाचारण करतात.

बाहेरून झगमगाट केलेलीं हीं निशागृहं आंतून मंद उजेडांत लपेटलेलीं असतात. बहुतेक ठिकाणीं प्रवेश फी नसते. आमचा खेळ फुकट बघा–असा आव असतो. दाराशीं तुमचा वरकोट ठेवायला कोठी असते व त्याच्या भाड्यांत प्रवेश फी वसूल केली जाते. टेबलाकडे न्यायला बहुधा प्रौढ स्त्री येते व सोयीची जागा पाहून तुम्हाला बसवते. खुर्चीवर बसून मद्यपान करीत खेळ बघितलात तर टिप् वगैरे देण्यांत पैसे जास्त जातात. बरेचसे मुरब्बी लोक बारपुढच्या खुंटावर बसतात. मद्य देणारा पुढ्यांतच पेला भरून देतो व टिप् वगैरे द्यावी लागत नाहीं. अधिक मुरब्बी व रंगेल माणसं भिंतींतून पाखं काढून केलेल्या जागीं बसतात. स्टेज लांब पडतं व पैसे बरेच जातात–पण मग स्टेजवर काम नसणाऱ्या मुली जवळ येतात, मद्यपान करतात, माफक प्रेम दाखवतात.

ह्या सगळ्यां स्ट्रीप्टीज् ! सुंदर तरुणींनीं प्रेक्षकांपुढें येऊन अंगावरचीं वस्त्रं उतरवण्याचा खेळ. मध्यवर्ती छोटेखानी स्टेज्वर मंद पण मादक उजेड. बाजूला वाद्यवृंद. बाजूच्या खोलींतून एक तरुणी येते. भरपूर कपडे घातलेली. खूप नटलेली. वाद्यं गरजूं लागतात. ती युवती पावलं टाकीत व डोळे मिचकावीत नाचूं लागते; बाजूच्या खांबाला मिठी मारते. नाचतांना एकेक वस्त्र फेकून देते. अखेर नाममात्र, पोलिस पकडणार नाहींत इतपत, चिंधी ठेवून नाच पुरा करते. नाचांत कला नसते. शरीराचं उत्तान प्रदर्शन, शृंगाराचे चाळे, ह्यासाठीं हालचाल असते एवढंच ! जमलेले आंबटशोकी प्रेक्षक टाळ्या पिटीत, दारू ढोशीत, त्या स्त्रीला उत्तेजन देतात. नाच संपला कीं एखादं गाणं, एखादं वाद्यवादन–मग परत दुसरी मुलगी ! मुली वेगवेगळ्या रूपाच्या, वयाच्या, बांधणीच्या व जातींच्याहि आणून कार्यक्रमाला विविधता आणली जाते.

आपल्याकडील तमाशांत असतो तसा सोंगाड्या ह्या कार्यक्रमांतहि असतो. तो काम करणाऱ्या तरुणीची तारीफ करतो. अश्लील (व कधीं बुद्धीची चमक दाखवणाऱ्या) कोट्या करतो. माईक घेऊन उड्या मारतो. प्रेक्षकांना सवाल टाकतो. प्रयोगाची रंगत टिकवायला धडपडतो. चवल्या पावल्या टाकण्याची पद्धत मात्र आढळत नाहीं.

स्टेजवर काम नसलेल्या मुली प्रेक्षकांत हिंडतात. एखाद्याशीं लाडांत येऊन मद्याची मागणी करतात. मद्याचा पेला तेवढ्यांत पुढें येतोच व रिकामाहि होतो. पुन्हां मद्य मागवलं जातं व लगेच संपतंहि. तुम्हाला कांहीं कळायच्या आंत तुमच्या खिशाला गळती लागते. मुलींना छोटेखानी पेल्यांत तें दिलं जातं नी तें मद्य नसतंच—नुसतंच रंगीत पाणी असतं. बऱ्याच वेळां 'खास' प्रेक्षकांसाठीं आणिकहि 'खेळ' खेळले जातात.

गर्लीज, क्रॉस रोड्स, बबलबाथ—सगळ्या जॉइंट्समध्यें हा प्रकार चालतो. आठदहा मुली रोज व रात्रभर अंगप्रदर्शनं करतात. ह्या जॉइंटस् भोंवतींच वेश्याव्यवसायाचं जाळं पसरलेलं असतं. एखादी सुंदर मुलगी ह्या चिखलांतून एकदम चंदेरी पडद्यावर जाते. बहुतेक अधःपाताच्या गर्तेंत नाश पावतात.

न्यूयॉर्क म्हणजे ह्या सगळ्या करमणुकींचं केंद्रस्थान! किळसवाण्या आणि रंगेलहि! उत्कृष्ट नाट्यगृहं, सिनेमा, चित्रपटगृहं, बॅलेज, नाचांचे हॉल्स, दिमाखदार हॉटेल्स व त्यांतल्या मद्यशाळा, नाचघरं, फ्लोअर शोज्, स्ट्रीप्टीज, जॉइंटस, टॅव्हर्न्स व जुगारी अड्डे, आणि चोरटी व उघडी वेश्यावस्ती! रॉकेफेलर सेंटरवरचा रेडियो सिटी म्युझिक हॉल आणि हार-लेमच्या वेशीवरचं चोरटं, भुयारी करमणूकघर!

रेडियो सिटीचा म्युझिक हॉल नेत्रदीपक व भव्य आहे. दिवस कलत जातो तशी प्रवेश फी वाढत जाते. तिकिटासाठीं सदैव रांगा लागलेल्या असतात. कार्यक्रमांत एक संपूर्ण सिनेमा, वाद्यवृन्द, फ्लोअर शो, नाच, गाणीं, नाटिका इत्यादि बहुरंगी करमणूक असते. सुरुवात होते तेव्हां शंभरचेवर असलेल्या वादकांचा ऑर्केस्ट्रा सबंधच्या सबंध जमिनींतून वर येतो. ऑपेराचे वेळेला मुली आपल्या नजीक, अधांतरीं येतात. जमिनीं-तून रोपटं वर यावं तसं स्टेजमधून माईक्स उगवतात. प्लास्टिकच्या पडद्याचा कांहीं भागच, लुगड्याचें ओचें वर घ्यावेत, तसा, वर उचलला जातो. पावसाच्या धारा प्लास्टिकच्या तंतूवर प्रकाशझोत पाडून दाखवतात. प्रकाश योजनेचे स्तिमित करणारे प्रयोग पहायला मिळतात. सुप्रसिद्ध कलावंताचं इथंच दर्शन होतं...हार्लेमनजीकचं बंदिस्त निशागृह हें दुसरं

टॉंक ! इथला पत्ता काढणं व प्रवेश मिळणं मुष्कील असतं. पोलिसला चुकवूनच हें बाजारी क्रीडागृह चालवलं जातं. आंत जायला मिळालं, तरी सतरा चौकशा, सतरा अडथळे असतात. एवढं करून आंतल्या तळघरांतल्या मोठ्या हॉलमध्यें शेंकडों प्रेक्षक दाटीवाटीनें बसलेले असतात. नीग्रो, पोर्टोरिकन, मेक्सिकन, इटालियन, अमेरिकन—सर्व तऱ्हेचे लोक. संगीत व दारूला महापूर येतो. चटक चांदण्या भिरभिरत असतात. घाऊक शृंगार सुरू असतो. स्टेजवर सुरू असलेली करमणूक कमालीची किळसवाणी असते. विकृतीचा अर्क, पशुतेचं प्रदर्शन साक्षात् उभं असतं !

उज्ज्वल, उत्तुंग, आदरणीय अशा अमेरिकन समाजचित्राची दुसरी बाजू इतकी कमित्र, किळसवाणी, भयानक असावी...उद्योगप्रियता, कल्पकता, उमदेपणा व मानवता ठायींठायीं दिसणाऱ्या ह्या देशांत मदिरा व मदिराक्षीनं असा धुडगूस घालावा—ह्याचं सखेदाश्चर्य वाटतं. वॉशिंग्टन, जेफर्सन, लिंकनच्या देशांत नाईट क्लब्ज्, रॉकरोल व टेलिव्हिजन हीं दैवतं व्हावींत हें ठीक वाटत नाहीं. हालेमच्या शृंगारवाटिकेच्या दाराशीं तर लिंकनचं तैलचित्र लावलं होतं !

ही अस्वस्थता, भयानक परिस्थितीची ही जाणीव, असंख्य अमेरिकनांना आहे. सगळींच क्रीडागृहं कळकट, किळसवाणीं नाहींत. कित्येक करमणुकीचीं स्थानं रसरशीत, रंगेल, निर्भर व आयुष्यांतला आनंद दाखवणारीं आहेत. कुरूपता कापून काढून जीवनांतला, यौवनांतला अर्थ शोधणाऱ्या चंदेरी चैनी वाढवणं, हाच एकूण अधोगतीवर उपाय आहे.

● ●●

*

*

*

*

*

## १६ निरोप

मॅनहटनमधून मी पिसाटासारखा हिंडत आहे. ब्रुकलिन ब्रिजवरून डोकावून पहात आहे. नदीखालच्या भुयारी मार्गानं वाटचाल करीत आहे. ब्रॉडवेवरून चकरा मारीत आहे. हेलन हेज थिएटरासमोर उभा आहे. रिव्हरसाईड ड्राईव्हनें हार्लेममध्यें घुसत आहे. ग्रँट सेंट्रल स्टेशनावर अमेरिकेभर जाणाऱ्या आगगाड्या पहात आहे. शिकागो, मिनेसोटा, सॅनफ्रॅन्सिस्को, न्यू मेक्सिको, सिनसिनाटाय, डल्लास, मिआमी...सर्चलाईटचा झोत फिरावा तसा माझा मनाचा स्मरणदीप फिरत आहे. निरनिराळ्या गांवीं काढलेले सारे क्षण कृपणासारखे हृदयाशीं धरीत आहे. ओळखीचे चेहरे, हास्य व हस्तांदोलनं, लाघव, स्नेह—उराच्या तिजोरींत भरून ठेवीत आहे. ह्या देशांत घालवलेले तीनशेऐंशी दिवस स्मरणसांखळी सारखे चाळवीत आहे. आजची रात्र संपली कीं उद्यां मी हा देश सोडणार. हिंदुस्थानला, माझ्या घरीं परतणार.

मी बदललों आहे का ? अनुभवांचा, विचारांचा नवा पल्ला गांठला आहे का ?...माझे कपडे अमेरिकन आहेत. उच्चार अमेरिकन होऊं पहात आहेत. घामाला गोमांसाचा वास येत आहे. ड्राय मार्टिनीनें मी घशाची कोरड कमी करूं पहात आहे. गोळा केलेलीं कांहीं चित्रं, कांहीं क्यूरिओज्, बॅगेत

कोंबत आहे. खरेदी करायच्या सामानावर रेघा ओढून झाल्या आहेत. निरवानिरव नि आवराआवर. इथें येतांना झाली तशी गडबड व गोंधळ. तसेच कागदपत्रं, फॉर्म्स, तिकिटं जमा झालीं आहेत. उम्या वर्षाकडें पाठ करून आतां घराकडे मोहरा वळवीत आहे. कांहीं चेहेरे अगदीं जवळून दिसत आहेत. कांहींचा अंधुकपणा जातच नाहीं. पुण्याच्या हवेचा विवक्षित वास नाकाशीं येत आहे. टिळकरोड, खोदादाद सर्कल, कॉनॉट प्लेस-सगळं एकदम दिसत आहे. कुणीं मित्र खांद्यावर हात ठेवीत आहे. स्वतःच्या घरीं आरामखुर्चीवर बसलों आहे, असा भास होत आहे.

घरीं परतायची आतुरता आहेच—पण इथून पाय काढणं अगदीं जिवावर आलं आहे. मॅनहटन, ब्रॉडवे, माय फेअर लेडी...फार्म जर्नल...वॉशिंग्टनचा हार्टनेट हॉल...सेंट लुई, सॉल्ट लेक सिटी, डेनवर...लॉस एंजेलीसचे रोमहर्षक दिवस व फ्रिस्कोचा स्वर्ग ..मॅडीसन ! मॅडीसन !...सगळ्या वास्तु आठवत आहेत. अन् मग मी एकाएकी फोन उचलतों व एक एक नंबर आठवून लॉंग डिस्टन्स कॉल्स करीत आहे. डिक डेव्हीड्स, सुझान ग्रानिस, आयलीन कीथ, मार्ज बेटझर, रिचर्ड पॉवर्स...धांपा टाकीत, सुचेल तें बोलत आहे. मॅडीसनला, सेंट लुईला, सॅन फ्रॅन्सिस्कोला-साऱ्या अमेरिकेभर माझा शब्द जात आहे.

हें सारें स्नेहबंध तोडून व इथलं नेटकं आयुष्य सोडून मी नेहमींच्या जुन्या चाकोरींत मिसळून जाईन तेव्हां मला कितपत जड जाईल? युरपमध्यें, अमेरिकेमध्यें राहून हिंदुस्थानांत परतलेल्या कांहीं प्रगल्भ मनाच्या व प्रौढ वयाच्या मित्रांचा झालेला कोंडमारा मी पाहिला होता. हिंदुस्थानांतल्या आडमुठ्या, गलिच्छ, दरिद्री व वखवखलेल्या जीवनांत परत आल्यावर हे लोक मनीं कष्टी असत. परदेशांतल्या चैनीची चटक त्यांना होती असं नाहीं, पण पाश्चात्य देशांतल्या सुधारणा व सुसंस्कृतपणा अनुभवल्यावर हिंदुस्थानांतल्या क्षुद्र वातावरणांत मिसळून जाणं त्यांना अवघड झालं होतं. कित्येकांचं शिक्षण, ज्ञान, अनुभव वांया चाललं होतं. स्वप्न, ईर्षा कोलमडत होती. ‘ I wish I hadn't come back ’ ह्या शीर्षकाखालीं अनेकजणांनीं आपली व्यथा वर्तमानपत्रांत प्रकट केलेली वाचली होती. माझं असंच होईल कां? माझ्या शिक्षणाचा ठेवा गंजून जाईल? सहकाऱ्यांच्या

हेव्यादाव्यांत कोंडमारा होईल? जातीय, राजकीय तेढीचा बळी होईन? इथें प्रवासांत, दुकानांत, कचेऱ्यांत जें सौजन्य दिसतं तें तिकडे दिसणारच नाहीं का?

हार्वर्ड विद्यापीठानें भारतीय विद्यार्थ्यांचा अमेरिकेंत वास व त्यांच्यावर होणाऱ्या प्रक्रिया ह्या विषयावर संशोधन केलेलं आहे. अमेरिकेंत नुकताच पाय ठेवणारा भारतीय विद्यार्थी स्वतःला आपल्या देशाचा वकील समजतो. भारताच्या परराष्ट्रीय धोरणाबद्दल, नेहरू, काश्मीर, मेनन वगैरेबद्दल विचारलं कीं आक्रमक बचावानं बोलूं लागतो. अमेरिकनांच्या अज्ञानामुळें तो वाद जिंकतोहि. पण मग दोन चार महिन्यांत भारताबद्दल सारखं बडबडून तो कंटाळून जातो. एव्हांना अभ्यासाच्या वेगवान् धारेंत, इतर विद्यार्थ्यांच्या स्पर्धेंत, तो सांपडलेला असतो. त्याची घराची ओढ वाढते व अमेरिकन संस्कृतीवर तो टीकाहि करीत रहातो. आठ दहा महिन्यांत हेंहि कमी होत जातं. इथें आपण मोकळे आहोंत, सगळी स्वतंत्रता आहे हें त्याला उमगतं. कुतूहल कमी होतं, घराच्या आठवणी तेवढ्या ठळक राहात नाहींत. आपल्या आणि इथल्या दोन्ही चालीरीतींत समान काय आहे हें तो शोधीत राहतो. दोन चार वर्षांत त्याचा मूळचा वकीली पेहराव पूर्ण जातो व तो स्वतःबद्दलच विचार करीत राहतो. भारतांत परत गेलं तर जुने मित्र मला जवळचे वाटतील का? माझ्या गुणांप्रमाणें, शिक्षणास साजेशी नोकरी मिळेल का? इथेंच राहिलों तर? संसार थाटायचा तो अमेरिकन मुलीशीं? डोरीस किंवा मेरी किंवा लिंडाशी लग्न केलं तर मुलांचं स्थान काय राहील?...मला वाटतं, अमेरिकेहून भारतांत परतणाऱ्या विद्यार्थ्यांबद्दल असंच एखादं संशोधन करायला हवं!

हार्वर्डच्या प्रबंधाकडे पाहिलं तर मी वर्ष सरतांच परततों आहे हें चांगलंच आहे! तरीपण जाणं जिवावर आलंय्. अजून वर्ष तरी इथें राहायला हवं! आतां कुठें इथल्या जीवनाची ओळख होत आहे! कांहीं मित्र, कांहीं कुटुंबांचे स्नेह जडले आहेत. अजून पाहायचं तर कितीतरी आहे! फ्लोरीडाच्या फळबागा, टेक्सासच्या रेंजेस्, यलोस्टोन पार्क, न्यू मेक्सिकोंतलीं अरण्यं! न्यू ऑर्लिन्सच्या बाजारपेठा, लिटल रॉकची शाळा, रीडर्स डायजेस्टचं ऑफीस, माऊंट रशमोरचं बर्फ! मी यायच्या आधींच

एक महिना कॅथरीन ॲनी पोर्टर ही थोर कथालेखिका आमच्या विद्यापीठांत येऊन गेली. फ्रॅंक लॉईड राईटला भेटलों, त्याचा स्टुडियो व शाळा पाहिली, पण त्याच्याशीं गप्पा मारण्याचा कार्यक्रम राहिलाच !...

तरी पण समाधान एवढंच कीं थोड्या वेळांत व तुटपुंज्या बजेटांत जेवढं पहातां, हिंडतां येणं शक्य आहे तेवढं मी सोडलं नाहीं. एका नीग्रो कुटुंबांत व वीसएक गोऱ्या कुटुंबांत राहिलों. बरेच मित्र जोडले. हॉलीवुड पाहिलं. रेड इंडियन पाहिले. शिकागोच्या नाईटक्लबांतली हाणामारी ह्याची देहीं, ह्याची डोळां पाहिली. पत्रमैत्रिणींची भेट झाली. फार्म जर्नल व लाईफ मासिकांत कांहीं दिवस घालवले. रेड रॉक माऊंटनमधलं निसर्गानें किमया करून बनवलेलं थिएटर पाहिलं. धुंद नियागारा पाहिला. अविस्मरणीय सॅन फ्रॅन्सिस्कोंत अविस्मरणीय शंभर तास घालवले !

माझा प्रोफेसर, डॉ. ब्राय कर्ल ही एक आयुष्यांत भेटलेली फार आदरणीय व्यक्ति ! प्राथमिक शाळेंतल्या शिक्षकाबद्दल त्या कोवळ्या वयांत त्या काळीं जेवढा आदर वाटला तेवढा आतां ब्राय कर्लबद्दल वाटतो आहे. विद्वत्तेचा व अधिकाराचा तोरा तर नाहींच, पण माझी बॅग उचलण्यापासून ब्रायनीं माझं सगळं केलं. विद्यार्थी व शिक्षक हे श्रेष्ठ कनिष्ठ नातं ठेवलं नाहीं. त्यांच्याबद्दल साऱ्यांचं हेंच मत आहे. गंमत अशी कीं जशी व्यक्ति असेल तसे ब्राय लहान, पोक्त, खेळकर, भांडखोर, विनोदी व विद्वद्जडहि होतात.

ब्राय कर्लप्रमाणेंच प्रो. डिक पॉवर्स (व त्याची पत्नी) यांनीं मला पहिल्या दिवसापासून लोभ दाखवला. फार्म जर्नलचा डिक डेव्हीडस् असाच उमदा गृहस्थ. ज्या बेट्झर कुटुंबाचा मी एक घटक बनून राहिलों त्या कुटुंबानं माझ्यावर निर्व्याज प्रेम केलं. आजारांत अन् अभ्यासांतहि मार्जोरी बेट्झरनें मला मदत केली व छोट्या कॉनीनें मला भातुकलींत घेतलं. (कॉनी जॅक्स् नांवाचा खेळ खेळायची तो म्हणजे आपले सागरगोटे !—एका गोलार्धांतल्या मुली जो खेळ खेळतात तीच घरगुती करमणूक दुसऱ्या गोलार्धांतल्या मुली खेळतात हें पाहून मी चकित झालों.) फ्रिस्कोला सौ. ग्रानिसमजबरोबर अपरात्रींपर्यंत हिंडत राहिली व आपल्या वर्तनानं तिनं भार-

तीय साध्वींच्या कहाण्या फिक्या पाडल्या. सेंट लुईच्या पत्रमैत्रिणी वीस वर्षांच्या वियोगांनंतर भेटल्या व आयुष्याला एक परीस स्पर्श होऊन गलो.

ह्या सगळ्यांचं काय ऋण होतं? गेल्या जन्मींचे लागेबांधे तर नव्हते? पण बहुतेकांना हाच अनुभव येतो. अमेरिकन व्यक्ती भेटतांक्षणींच दोस्त होते. कुटुंबांत गेलं तर आपलेपणानें, कुटुंबाचा घटक म्हणूनच मानतात. अमेरिकन जीवनांतल्या ह्या अनौपचारिकतेची मला सर्वांत मोहिनी वाटते. आपल्याकडे आदरातिथ्य, पाहुणचार सारा नाममात्र उरला आहे. अमेरिकन स्त्रीला प्राधान्य असते, त्यामुळें पाहुण्या विद्यार्थ्याला आणायला पोंचवायला, हिंडवायला गृहीणीच येते. घरांत नौकरचाकर नसल्यानं ती पाहुण्याला थेट स्वयंपाकघरांत नेते. घरकाम करायलाहि लावते. पाहुणा पाहुणा उरतच नाहीं.

इतक्या कुटुंबांत राहून मला हें जाणवलं कीं पतिपत्नीचे संबंध आपल्या सारखेच असतात. घरवाली सगळं बघते, पण मालक पुरुषच असतो. एकेरी नांवानं हांक मारली तरी स्त्री आपल्या नवऱ्याला फार मान देते. भितेहि. सोंवळेपणा, असूया, संशय, अधिकाराचा तोरा--पतिपत्नी नातंच असं आहे कीं कुठलीहि सुधारणा अगर कुठलाहि समाज तें बदलूं शकणार नाहीं. तिकडच्या पतिपत्नी नात्याबद्दल जसे गैरसमज तसे विभक्त कुटुंबपद्धतीबद्दलहि. आमची एकत्र कुटुंबपद्धति श्रेष्ठ, अमेरिकेंत मुलं मोठीं झालीं कीं त्यांना वडिलधाऱ्यांबद्दल कांहीं वाटत नाहीं, वृद्धांची अनुकंपनीय स्थिति पहावत नाहीं, वगैरे सांगितलं जातं तें तितकसं खरंहि नाहीं. आपल्याकडील एकत्र कुटुंबपद्धति आतां मोडकळली आहे. चार दोन संसारी भाऊ भाऊ एकत्र राहातात तिथें खर म्हणजे सहकारी (को--ऑपरेटिव्ह) कुटुंबपद्धति असते. अन् तीहि नाईलाजानं, धुसफुसत चालवलेली असते. आजच्या जमान्यांत विवाह होतांच नवपरिणीतांनीं वडिलधाऱ्यांपासून विभक्त राहणं हा एकच उपाय आहे. इथें बरींच जोडपीं आपल्या आईवडिलांच्या घराजवळच बिऱ्हाड करून राहतात. मी वृद्धांशीं बोललों, त्यांची ह्या विषयांतलीं मतं वाचलीं, तेव्हां मला असं आढळलं कीं म्हातारी माणसंच तरुणांबरोबर एका घरांत राहायला तयार नसतात. मुलं शेतीवाडी बघूं लागलीं

कीं म्हातारा-म्हातारी शहरांत घर करतात हें सर्व्हेज् काढून सिद्ध झालं आहे. म्हातारपणीं छोटं बिऱ्हाड करायचं, आठ वेळेला खायचं, टेलि-व्हिजन पहात वेळ काढायचा, फोनवरून तासन् तास परगांवच्या मुला-मुलींशीं बोलायचं, तीं गांवांतच असलीं तर दुपारीं, संध्याकाळीं त्यांच्याकडे जायचं-हें वृद्धावस्थेंतलं स्वप्न असतं अनेकांचं! अर्थात् अनेक म्हातारीं माणसं बगीचांत, प्रवासांत भेटतात तीं एकाकी, दुःखी असतात. पण अमेरिकन माणसालाच ज्या एका पोकळीनं ग्रासलं आहे त्याचा तो भाग आहे.

स्त्री–स्त्री ! इथें पाय ठेवल्यापासून वर्षांत मी इतक्या स्त्रियांशीं बोललों आहे कीं उभ्या आयुष्यांत एवढ्या स्त्रियांशीं बोललों नसेन. प्रवासाचीं, थिएटरचीं, कॅफेटेरियाचीं तिकिटं द्यायला मुली; हॉटेलांत,दुकानांत मुली; कॉलेजांत, कचेऱ्यांत कारकून मुली...संवय नसलेल्या भारतीय मनाला भोंवळ येते. गोरखनाथासारखं होतं. स्त्री ही नुसती 'स्त्री'नसते, ती चांगला मित्र होऊं शकते हेंहि हळूहळूं जाणवूं लागतं. समान दर्जानं वागवल्या जाणाऱ्या स्त्रिया कांहीं रीतिरिवाजांत आपले खास हक्क वसूल करतात ह्याचा मात्र अचंबा वाटतो.

आपलं काम शक्य त्या सचोटीनं करायचं व धंद्यांत श्रेष्ठ कनिष्ठ भाव ठेवायचा नाही, हे फार थोर गुण ह्या समाजांत आढळतात. अधिकारी अगर मुकादम नसतांना दिलेलं काम तत्परतेनं व निर्दोष करणारे कामगार, कारकून पाहिले कीं आश्चर्य वाटतं. मिळणाऱ्या पगारांत भारंभार श्रम करण्यास सगळेच तयार असतात. आणि तें काम अध्यापनाचं आहे कीं झाडण्यालोटण्याचं आहे ह्याचा विधिनिषेध नसतो. त्या कामाचा व समा-जांतल्या स्थानाचा तितकासा संबंध नसतो. भेदभाव असतात ते सूक्ष्म, न बोंचणारे असतात. झाडूवाला, झाडूवाला म्हणूनच ओळखला जात नाहीं. उद्यां तो परिश्रमांनीं प्राध्यापकहि होतो. बऱ्याच यशस्वी, थोर, धनाढ्य अमेरिकनांनीं आपला पहिला डॉलर वर्तमानपत्रं विकून मिळवलेला असतो ह्या मागचं हेंच रहस्य आहे. संधि मिळणं, प्रगति शक्य असणं हेंच समाज सुधारण्याचं मुख्य कारण आहे. आपल्या आवडत्या व्यवसायासाठीं पडेल ते कष्ट करणारे व आपल्या आवडत्या छंदासाठीं चांगली नोकरी

सहज फेकून देणारे कितीतरी तरुण भेटतात. एखादा शिक्षणक्रम घेण्यासाठीं देशाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोंकाला लोक जातात. मग पोक्त वयांतहि लहानसहान वाटणाऱ्या गोष्टी शिकत असतात. नोकर महाग पडतात म्हणून घर बांधण्यापासून कित्येक जरूरीच्या गोष्टी अमेरिकन माणूस करतो. तरुणतरुणींना अनेक हरहुन्नरी गोष्टी येतात. आपल्याकडे फ्यूज बसवणं, रेडियो ठीक करणं, मासे पकडणं, घोड्यावर बसणं, ट्रॅक्टर चालवणं, खुर्च्या व टेबलं बनवणं किती तरुणांना येतं ?

हें सगळं उन्हांत नि थंडींत चालतं. हवेची सबब आपण सांगतो. उकाड्यामुळें उमेद राहात नाहीं, काम होत नाहीं, अमेरिकेंतल्या शीत हवेमुळें ते लोक फार काम करतात, वगैरे गप्पा मारून आपला आळशीपणा आपण गौरवतो ! तीव्र उन्हाळा, सगळं गोठवून टाकणारी थंडी, निबिड अरण्यं, भयानक वाळवंट—प्रतिकूल हवामान व निसर्ग असूनहि अमेरिकनांनीं भगीरथ कष्ट केले आहेत. हवामान पालटायचा, यंत्रं निर्माण करून हवामानाचा त्रास कमी करायचा यत्न केला आहे. अरण्यांत नंदनवनं वसवलीं आहेत.

आश्चर्य वाटतं तें वेगवेगळ्या देशांतील आधाशी लोकांच्या बनलेल्या ह्या कोंवळ्या राष्ट्रानें एकतेची भावना खोल रुजवली आहे त्याचं ! इथल्या नीग्रो, रशियन, जर्मन—सगळ्यांना आपण अमेरिकन आहोंत असा अभिमान आहे. शाळेच्या वर्गांत व खेळाच्या मैदानावर राष्ट्रीय निशाण लावूनच ही भावना रुजली आहे असं नाहीं...

माझं आयुष्य सगळं शहरांत गेलेलं ! खेड्याबद्दल मला ओढ नाहीं. आपलीं खेडी म्हणजे दारिद्र्य, अज्ञान, आडमुठेपणा, आळशीपणा, हेवेदावे, सूड व फसवणूक. हीनदीन बनलेलीं भारतीय खेडींपाडीं पाहिल्यानंतर इकडच्या खेड्यांत पाऊल टाकलं कीं मन चकित होतं ! इथली सारींच छोटीं छोटीं गांवं किती स्वच्छ, टापटीपीची, सुखसोयींनीं परिपूर्ण आहेत ! रेडियो, टेलिव्हिजन, टेलिफोन व वर्तमानपत्रं ह्यांच्यामुळें खेड्यांत राहणं म्हणजे धांवत्या जगाच्या मागं जाणं असं मुळींच वाटत नाही. पोहण्याचे तलाव, क्रीडागृहं, थिएटरं, मद्यपानगृहं, नमुनेदार शाळा प्रार्थनामंदिरं, बगीचे, तळीं सगळं सगळं इथं असतं. अन् तेंहि शहरांतलं'

राक्षसी गर्दी–गोंधळ टाकून !...ह्या गांवांतून साप्ताहिक अगर द्विसाप्ताहिकं चालवतात व त्यायोगें गांवांतले व मूळचे गांवांतले पण नौकरीनिमित्त दूरदूर पांगलेले लोक एकत्र बांधले जातात. 'गांवपत्रें' हा अमेरिकन जीवनांत महत्त्वाचा व मोलाचा घटक आहे. अमेरिकन वर्तमानपत्रं खालच्या दर्जाची वाटतात. सनसनाटी बातम्यांनीं व जाहिरातींनीं भरलेलीं, उथळ व सुमार अभिरुचीचीं असतात. पण हीं छोटीं वृत्तपत्रं आपल्या परीनं नमुनेदार कार्य करीत असतात.

. इतकं सगळं असून ह्या देशाला अनेक दुःखं आहेत.नव्या नव्या समस्या निर्माण होत आहेत. माझ्या वास्तव्यांतच दोन अरिष्टं घडलीं. लिटल् रॉकला नीग्रो लोकांवर जुलूम सुरू झाला व वर्णद्वेषाचं जहर उफाळून आलं. काळ्या प्रश्नाचा हा कॅन्सर सारा देश पोखरीत आहे व त्यामुळें विचारवंत विवंचनेंत आहेत. त्यांतच रशियानें स्पुटनिक अंतराळांत सोडला. कम्युनिझमशीं चालू असलेल्या चढाओढींत अमेरिका मागें पडली.स्वतःचं सामर्थ्य,शास्त्रीय शोधांतलं प्रभुत्व ह्यावरचा विश्वास डळमळला. सगळं शिक्षण, सैन्यव्यवस्था बदलायचा घोष सुरू झाला. अमेरिकेबद्दल इतर राष्ट्रांचं मन अधिक कलुषित होत आहे.ह्या देशाचे राजकारणाचे डावपेंच कांहीं असोत-सामान्य माणसाचा त्यांत कांहीं भाग नाहीं. सर्वसाधारण अमेरिकन माणूस व राजकीय पुढारी ह्या दोन वेगळ्या व्यक्ती आहेत. सामान्य माणसाला राजकारणांत गम्य नाहीं. आपल्याकडचा पानपट्टीवाला देखील संयुक्त महाराष्ट्रावर तासभर चर्चा करील, पण इथला साधारण शिक्षित मनुष्य अमेरिकेच्या कुठल्याच राजकीय प्रश्नावर फारसा बोलूं शकायचा नाहीं.

ह्यांतच वाढाळू मुलामुलींची समस्या ! तसं पाहिलं तर तरुण पिढीची समस्या सर्व जगापुढेंच उभी राहात आहे. अमेरिकेंत त्यावर ज़ास्त संशोधन, जास्त चर्चा चालू आहे एवढंच ! पण उगवती पिढी अधःपाताच्या गर्तेत चालली आहे ही कल्पनाहि भयानक आहे...आणि मग कोंवळीं मुलंमुलीच नव्हे, पण आजचा मानवच वाट चुकला आहे काय असा खेदकारक विचार सतावीत आहे...मला स्वतःलाच इतक्या अमेरिकनांचं लाघव व मोकळेपणा पाहून वाटायला लागलं कीं हें सारं वरवरचं असेल कां? नुसताच चांगुलपणा ? सगळं हाऊ फाईन्, हाऊ नाईस्, वंडरफुल् ! कुणी

कशाबद्दल वाईट बोलत नाहीं. तीव्र द्वेष, चीड, लोभ, प्रेम, निरीच्छा नाहींच कां ह्या नव्या देशांत, नव्या मानवांत ? सगळ्यांच्याच भावना झिजल्या आहेत काय ?...

ह्या देशानं मला खूप दिलं, दाखवलं. मला जें हवं होतं, पाहायचं होतं, शिकायचं होतं तें मला मिळालं !—हा प्रचंड देश आंधळ्यानें हत्ती चांचपावा तसाहि मी आकुंचित दृष्टिकोनांतून पाहिला असेल. पण मिळालेल्या अनुभवाचा अमोल ठेवा घेऊन मला आतां परतायला हवं ! मला मैत्रीचं धन देणारे, नवं ज्ञान पाजणारे—साऱ्यांचं ऋण वागवून निरोप घ्यायला हवा...फ्रिस्कोच्या टेलिग्राफ हिलवर काढलेली संध्याकाळ व नियागाराचे सोनेरी तुषार, मुतारीच्या दाराशीं बूट पॉलीश करणारीं नीग्रो मुलं व नाईट क्लबच्या बाहेर शून्य बसलेली म्युलॅटो मुलगी, फ्रॅंक लॉईड राईटचा जबडा व फ्यूनरल होममधल्या शवपेट्या, पुलमनमधील प्रवास, मॅडीसनमधले दिवस... सारं सारं... सगळ्या वर्षाचं, सगळ्या अनुभवांचं पारणं आज न्यूयॉर्कमधल्या उरलेल्या आठबारा तासांत फेडायचं आहे. सामान आवरायचं आहे. फोनवरून पुन्हां निरोप घ्यायचे आहेत. मॅनहटनभर मोकाट भटकायचं आहे. अखेरचं ! कारण उद्यां विमान निघणार ! कांहीं तासांत युरोप, कांहीं दिवसांत परत पुणं !

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०७९८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम २५८२३ वि: ४२-१-५१
क्रमांक २५० नों: दि: १८-११-५१

# आमचीं प्रकाशनें

| ग्रंथाचें नांव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| **◇ कादंबरी** | | |
| पाऊलवाट | श्रीधर देशपांडे | ४ |
| क्रांतिकाल | व. ह. पिटके | ४ |
| झुंज | शं. गो. साठे | ३ |
| सहकार | रमा बखले | ५ |
| बंड | सदानंद रेगे | २ |
| जयदेव | मृणालिनी देसाई | १। |
| **◇ कथा** | | |
| उपायन | मनोहर म. केळकर | २॥ |
| मा थेन् थेन् व इतर गोष्टी | संकीर्ण | ३ |
| कमलाक्षीची कहाणी | चंद्रमा यत्नशील | ।= |
| टालडुप्पो वाँगीमाऽऽड् | अ. वा. वर्टी | ३ |
| आंबटगोड | अच्युत बर्वे | २ |
| गुन्हेगारांच्या जगांत | द. पां. खांबेटे | २ |
| झुंजुमुंजु | योगिनी जोगळेकर | २॥ |
| कै. कुमारी कल्पना चित्रे | श्रीधर देशपांडे | ३ |
| जंबूकाका | सुरेश शर्मा | ॥= |
| समाजचित्रें भाग १ ला | गिरिजाबाई केळकर | ४ |
| दर्शन | भा. र. आठवले | २॥ |
| तृणपुष्पें | सौ. आनंदीबाई शिर्के | २॥ |

| ग्रंथाचें नांव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| देवालय | आनंद रेगे | २॥ |
| कोंकणीं ग वस्ती | मधु मंगेश कर्णिक | २॥ |
| मनांतलें चांदणें | वि. ग. कानिटकर | २॥ |

◆ नाटक

| | | |
|---|---|---|
| मऱ्हाठियेचिया नगरीं | शं. गो. साठे | ।= |
| घरंदाज | ना. बा. पराडकर | १। |
| ब्रह्मघोळ | गो. ल. आपटे | ॥= |
| हीच मुलीची आई | गिरिजाबाई केळकर | ।॥॰ |
| कला-जीवन | वसंत म. केळकर | ।॥॰ |
| परित्यक्ता | ना. बा. पराडकर | १। |
| मंदोदरी | गिरिजाबाई केळकर | ।॥॰ |

◆ लेखसंग्रह

| | | |
|---|---|---|
| वादळी वारे | द. के. केळकर | ४ |
| काव्यविहार | डॉ. माधवराव पटवर्धन | ४ |
| आमच्यापुढील प्रश्न | संकीर्ण | २॥ |
| विज्ञानविहार | डॉ. श्री. द. लिमये | २॥ |
| तुम्हीच ज्योतिषी व्हा भाग १ला | ना. बा. केळकर | ३ |
| तुम्हीच ज्योतिषी व्हा भाग २रा | ना. बा. केळकर | ४ |

◆ इतर

| | | |
|---|---|---|
| संस्कृति आणि विज्ञान | द. के. केळकर | ९ |
| उद्यांची संस्कृति | ,, | ६ |
| काव्यालोचन | ,, | ६ |
| स्मरणसांखळी | कमलाबाई देशपांडे | ६ |

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

| ग्रंथाचें नांव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| गांवरान गीता | न. चि. केळकर | २ |
| हंसरा निर्माल्य व चिमण्या | कमलाबाई देशपांडे | १।। |
| अपौरुषेय वाङमय अर्थात् स्त्री-गीतें | कमलाबाई देशपांडे | ३ |
| मंगलाक्षता | डॉ. सरोजिनी बाबर | २ |
| नरसिंह केळकर | वि. उ. वैद्य | १। |
| विमान फिरतें अधांतरीं | सदानंद चेंदवणकर | -।।।- |
| संस्कृत काव्याचे पंचप्राण | के. ना. वाटवे | ६ |
| Location of Lanka | M. V. Kibe | 2 |
| तिसऱ्या महायुद्धाच्या छायेंत | य. न. केळकर | ५ |
| हिंदी हीच आमची राष्ट्रभाषा | शं. दा. चितळे | ३ |
| हिंदी क्रिकेट | र. गो. सरदेसाई | ५ |
| गोकुळच्या गौळणी | महादेवशास्त्री जोशी | २ |
| एकेकाचा स्वभाव | वा. शि. आपटे | २ |
| नवकाव्यसमीक्षा | स. वा. दीक्षित | -।।- |
| नवे अलंकार | रा. अ. काळेले | १।। |
| आयुष्यमान् भव | म. ग. गोरे | १।। |
| सुलभ पाकशास्त्र | गिरिजाबाई केळकर | २ |
| नाटककार कोल्हटकर | ना. बा. पराडकर | २।। |
| अमेरिकेस पहावे जाऊन | अरविंद गोखले | ३ |
| द्रौपदीची थाळी | गिरिजाबाई केळकर | २।। |
| थॉमस जेफर्सन | मनोहर म. केळकर | २ |

**मनोहर ग्रंथमाला : टिळक रोड, पुणें २**

REFBK 0010798
REFBK-0010798